# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ शनिवार २१ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## राज्य मंत्रिमंडळातील ९ मंत्री भोंदूबाबा अशोक खरातचे नियमित भक्त

### संजय राऊत यांचा दावा

**मुंबई/प्रतिनिधी** :: राज्य मंत्रिमंडळातील ९ मंत्री भोंदूबाबा अशोक खरात याचे भक्त असल्याचा दावा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी (दि.२०) केला. हे मंत्री भोंदूबाबाकडे जाऊन अत्यंत घृणास्पद विधि करत होते, असा खळबळजनक आरोप राऊत यांनी केला. या प्रकरणी कारवाईचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते, हे कौतुकास्पद असल्याचे संजय राऊत म्हणाले.



त्यांनी या संपूर्ण घडामोडींची तुलना आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या 'एपस्टिन फाइल्स' प्रकरणाशी केली. 'जगात एपस्टिन फाइल्स आणि महाराष्ट्रात खरात फाइल्स,' असे वक्तव्य त्यांनी केले. खरात प्रकरणाची पाळमुळे उखडून काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गृहखात्याच्या माध्यमातून जी मोहिम राबवली , त्यासंदर्भातील माहिती आता समोर येत आहे. या महाराष्ट्राल कलंकित करणारी, बदनाम करणारी अशी कृत्य, त्याचे सूत्रधार आणि त्यांना राजकीय, सामाजिक प्रतिष्ठा देणारे राजकीय नेते, मंत्री या सगळ्यांचे धाबे मुख्यमंत्र्यांच्या कारवाईमुळे दणाणलेले दिसत आहेत. आम्ही मुख्यमंत्र्यांवर नेहमी टीका करतो, कालही आम्ही याप्रकरणात त्यांच्यावर टीका केली. पण जसजशी माहिती समोर येत आहे की, गेल्या १५ दिवसांपासून अत्यंत गुप्तपणे मुख्यमंत्र्यांनी खरात फाईल्स संदर्भात कारवाईचे आदेश दिले होते, असे संजय राऊत म्हणाले. पोलिसांची पथके काम करत होती, ते ऑपरेशन यशस्वी झाले, असे म्हणत राऊतांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्र्यांनी याबाबत साफसफाई सुरू केली असेल तर ते कौतुकास पात्र आहेत, असे ते म्हणाले.संजय राऊत म्हणाले की, अशोक खरात हा फडणवीसांच्या कॅबिनेटमधील अनेक मंत्र्यांचे ☞(पान २ वर)

# भोंदूबाबाच्या नादी लागल्याने दोन्ही पदं गमावली

## रुपाली चाकणकरांचा महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

### राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार



**मुंबई/प्रतिनिधी** : शेकडो महिलांचा लैंगिक छळ केल्याचा आरोप असलेल्या नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातमुळे रुपाली चाकणकर चांगल्याच अडचणीत आल्या आहेत. अशोक खरातसोबत व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओमुळे चाकणकरांना राजीनामा द्यायची वेळ आली आहे. या प्रकरणात दबाव वाढल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याकडे त्यांनी राजीनामा सादर केला. तर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही चाकणकरांना राजीनामा द्यावा लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.

अशोक खरात प्रकरणामुळे आरोप होत असलेल्या रुपाली चाकणकर यांनी राजीनामा द्यावा अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिल्याची माहिती समोर आली. परंतु, चाकणकरांच्या राजीनाम्याचा निर्णय हा राष्ट्रवादी काँग्रेसचाच असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राष्ट्रवादीकडून शुक्रवारी सकाळीच महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा अशी सूचना रुपाली चाकणकरांना करण्यात आल्याची माहिती आहे. त्यानुसार रुपाली चाकणकर यांनी आधी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार असल्याची माहिती समोर येत आहे. भोंदूबाबामुळे रुपाली चाकणकरांवर दोन्ही महत्त्वाच्या पदांचा राजीनामा द्यायची वेळ आल्याची चर्चा आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर निर्णय**

शेकडो महिलांच्या लैंगिक छळाचा आरोप असलेल्या अशोक खरातचे रोज नवनवीन कांड समोर येत आहेत. गुंगीचं औषध प्यायला लावून, त्यांना संमोहित करून खरातने अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्याचे दोन व्हिडीओही समोर आले आहे. अशोक खरातचे असे १०० हून जास्त व्हिडीओ, दोन लॅपटॉप पोलिसांच्या हाती लागले आहेत.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा अशोक खरातसोबतचा एक व्हिडीओ व्हायरल झाला. त्यामध्ये रुपाली चाकणकर या अशोक खरातची पाद्यपूजा करताना दिसत आहेत. ☞(पान २ वर)

## अकोला जिल्ह्यात १३ सरपंच व १२६ सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर

### २८ एप्रिल रोजी मतदान

**अकोला /प्रतिनिधी** : राजीनामा, निधन, अनर्हता आदी कारणांमुळे रिक्त झालेल्या ग्रा. पं. सदस्य, थेट सरपंच पदांच्या निवडणुकांसाठी कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. त्यात अकोला जिल्ह्यातील ७६ ग्रामपंचायतीतील १३ थेट सरपंच पदे व १२६ रिक्त सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक होणार आहे.



या अनुषंगाने आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन व्हावे व निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत.


कार्यक्रमानुसार, तहसीलदारांनी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करण्याची तारीख ३० मार्च आहे. नामनिर्देशनपत्रे दि. ७ ते १३ एप्रिल या काळात (शनिवार व रविवार वगळून) स. ११ ते दु. ३ या वेळेत सादर करता येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी दि. १५ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. पासून होईल. दि. १७ एप्रिल रोजी दु. ३ वा. पर्यंत नामनिर्देशन पत्र मागे घेता येईल. निवडणूक चिन्ह नेमून देणे, तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी दि. १७ एप्रिलला दु. ३ नंतर प्रसिद्ध करण्यात येईल. आवश्यक ☞(पान २ वर)

## विदर्भाला अवकाळी पावसाचा येल्लो अलर्ट!

### पुढच्या ४८ तासात 'या' जिल्ह्यांना गारपीट आणि वादळी वाऱ्यांची शक्यता

**नागपूर/प्रतिनिधी** : :विदर्भात सध्या हवामानात मोठे बदल होत असून, हवामान विभागाने पुढील काही दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या कालावधीत विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**४८ तासांत बदलणार हवामान** - हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, विदर्भातील बहुतांश भागात सध्या ढगाळ वातावरण निर्माण झाले असून, पुढील ४८ तासांत मेघगर्जनेसह



पावसाची शक्यता आहे. काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाची गारपीटही होऊ शकते.

विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये आज दुपारी ४ नंतर पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

विशेषतः नागपूर, गोंदिया आणि अमरावती जिल्ह्यांत काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपीट होऊ शकते.

तसेच बुलढाणा, अकोला, चंद्रपूर आणि भंडारा येथे ताशी सुमारे ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज असून, विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. वर्धा, गडचिरोली, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा इशारा ☞(पान २ वर)

## अशोक खरातचे आक्षेपार्ह व्हिडीओ बाहेर काढणारा नीरज जाधव सापडला?

**मुंबई/प्रतिनिधी** : नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली आहे. त्याच्या केबीनमध्येच त्याने अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली. खरात याचे आक्षेपार्ह व्हिडीओ बाहेर काढणारा ऑफिसबॉय नीरज जाधव याच्या मागावर नाशिक पोलिस आहेत. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने व्हिडीओ बाहेर काढून खंडणी उकळण्याचा आणि महिलांना ब्लॅकमेल करण्याचा धक्कादायक प्रकार तपासात समोर आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, नीरज जाधव हा अशोक खरात याच्याकडे ऑफिसबॉय म्हणून काम करत होता. याच काळात त्याने खरात यांचे महिलांसोबतचे काही आक्षेपार्ह व्हिडीओ आपल्याकडे घेतले. यानंतर त्याने सर्वात आधी अशोक खरात याला हे व्हिडीओ दाखवून मोठ्या रकमेची खंडणी मागितली. मात्र, खरात याने ही खंडणी देण्यास स्पष्ट नकार दिला.

**महिलांना ब्लॅकमेल करण्यास सुरुवात**- खरात याच्याकडून पैसे मिळत नसल्याचे पाहून नीरजने आपला मोर्चा व्हिडीओतील पीडित महिलांकडे वळवला. त्याने या महिलांना त्यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ दाखवून त्यांना त्रास देण्यास आणि ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. व्हिडीओ सोशल मीडियावर ☞(पान २ वर)

## सामान्य पेट्रोलच्या दरात वाढ नाही, प्रीमियम पेट्रोल ३ रुपये महाग

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**- पश्चिम आशियातील संकटामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने ऊर्जा पुरवठा, नागरी सुरक्षा आणि साठेबाजीविरोधातील कारवाई तीव्र केली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही, असे सरकारने म्हटले आहे. तथापि, प्रीमियम पेट्रोलच्या दरात वाढ झाली आहे. एलपीजी उत्पादनात ४० टक्क्यांनी वाढ झाली असून, पुरवठ्यावर दबाव कायम आहे. गॅसच्या काळाबाजाराला आळा घालण्यासाठी ४,५०० छापे टाकण्यात आले असून, लोकांना घाबरून न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितले की, पेट्रोलच्या दरात झालेली वाढ केवळ प्रीमियम श्रेणीपुरती मर्यादित असून, त्यात प्रति लिटर २ ते ३ रुपयांची वाढ झाली आहे. रेग्युलर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झालेली नाही. या दरवाढीचा सर्वसामान्य जनतेवर परिणाम होणार नाही, असेही त्यांनी सांगितले. एकूण विक्रीमध्ये प्रीमियम पेट्रोलचा वाटा केवळ ३-४ टक्के असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एलपीजीबाबत त्यांनी सांगितले की, त्याचे उत्पादन ४० टक्क्यांनी वाढवण्यात आले आहे. रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत, देशांतर्गत ग्राहकांना पुरवठा सुरू आहे आणि कुठेही तुटवडा नाही.

तथापि, परिस्थिती पूर्णपणे सामान्य नाही आणि आयातीवरील अवलंबित्व हे एक मोठे आव्हान आहे, हे त्यांनी मान्य केले. भारत ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण

### केंद्र सरकारची माहिती

नाही आणि त्यामुळे प्रत्येक शक्य स्रोताकडून एलपीजी आणि एलएनजीची खरेदी केली जात आहे, असे त्यांनी सांगितले. पुरवठा सुनिश्चित करणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. इराणकडून तेल खरेदी करण्यावर भाष्य करण्यास त्यांनी नकार दिला. सहसचिवांनी पुढे सांगितले की, सरकारने साठेबाजी आणि काळाबाजारावरची कारवाई तीव्र केली आहे.

१९ मार्च रोजी देशभरात ४,५०० हून अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आले. जवळपास ४,००० गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले. राज्यांना कडक देखरेख ठेवून कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यांनी असेही सांगितले की, घाबरून बुकिंग



करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. १३ मार्च रोजी ८९ लाख बुकिंग झाली होती, जी आता कमी होऊन सुमारे ५५ लाखांवर आली आहे. ऑनलाइन बुकिंगचा वाटा ९३ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. सरकारने जनतेला संयम बाळगण्याचे आणि अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

दुसरीकडे, एलपीजीवरील ताण कमी करण्यासाठी पीएनजीचा वेगाने विस्तार केला जात आहे. अलीकडेच, १३,७०० नवीन पीएनजी जोडण्या देण्यात आल्या आहेत. ७,३०० ग्राहकांनी एलपीजीवरून पीएनजीकडे स्विच केले आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि रुग्णालये यांसारख्या क्षेत्रांना प्राधान्य दिले जात आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, २८ फेब्रुवारीपासून पश्चिम आशियातून जवळपास ३ लाख भारतीय परतले आहेत. रियाधमध्ये एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. एकूण सहा भारतीयांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे.

**२२ भारतीय जहाजे सुरक्षित**

नौवहन मंत्रालयाने सांगितले की, होर्मुझच्या ☞(पान २ वर)






## नवी दिल्ली येथे महिला शासकीय अधिकाऱ्यांचे साहित्य संमेलन

### संमेलनाध्यक्षपदी लीना मेहेंदळे यांची निवड

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**- नवी दिल्ली येथे आयोजित महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवृत्त सनदी अधिकारी लीना मेहेंदळे यांची एकमताने निवड करण्यात आल्याची घोषणा संमेलनाच्या निमंत्रक आर. विमला तसेच स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी यांनी शुक्रवारी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली.

सरहद, पुणे आणि नवीन महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने हे दोन दिवशी संमेलन ११ आणि १२ एप्रिलला आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्नुषा आणि



छत्रपती राजाराम महाराज यांच्या पत्नी छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीचे औचित्य साधून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय प्रशासकीय सेवेतील १९७४ बॅचच्या लीना मेहेंदळे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे झाला. त्या महाराष्ट्र राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव सामान्य प्रशासन या पदावरून सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांनी गोवा राज्याच्या मुख्य माहिती अधिकारी पदाची जबाबदारीही सांभाळली आहे. महसूल, प्रशासन, प्रशासकीय कायद्याची अंमलबजावणी, विकास प्रशासन, कार्यालयीन कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असे विविध महत्वाचे विषय त्यांनी हाताळले आहेत. त्यांनी राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

लीना मेहेंदळे यांचे विविध विषयांवर ५०० पेक्षा अधिक लेख आणि २४ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी कवी कुसुमाग्रजांच्या ☞(पान २ वर)

## ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथोनी अल्बानीज यांना

## कुत्रा म्हणून संबोधले, गेट आऊट म्हणत मशिदीबाहेर काढले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**- ईदनिमित्त मशिदीत गेलेले ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथोनी अल्बानीज यांच्यासोबत मशिदीच्या परिसरात धक्कादायक प्रकार घडला आहे. अल्बानीज हे शुक्रवारी सिडनीतील मशिदीत गेले असताना जमावाने त्यांच्याविरोधात मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी केली. तसेच गेट आऊट अशा घोषणा देत त्यांना मशिदीबाहेर काढले. एवढंच नाही तर जमावाने ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांना कुत्रा म्हणून संबोधले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार आज ईदच्या नमाज निमित्त ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथोनी अल्बानीक आणि गृहमंत्री टॉनी बर्क हे मशिदीत गेले होते. मात्र ते मशिदीत पोहोचल्यानंतर



१५ मिनिटांच्या आतच जमाव संतप्त झाला. त्यांनी गेट आऊटच्या घोषणा देण्यास सुरुवात केली. तसेच पंतप्रधानांचा उल्लेख नरसंहाराचे समर्थक असाही केला. ऑस्ट्रेलियन पंतप्रदानांनी गाझामधील युद्ध आणि इस्त्राइलबाबत घेतलेल्या भूमिकेवरून जमावाने या माध्यमातून संताप व्यक्त केला. एवढंच नाही तर एक इसम ऑस्ट्रेलियन ☞(पान २ वर)




# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २१ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अखेर तेल्हारा 'साई' वर पडला यंत्रणेचा 'प्रकाश'


## आयपीएस निखिल पाटील यांच्या पथकाने घेतली झाडाझडती

■ विशेष प्रतिनिधी ■

*अकोला : तेल्हारा तालुक्यातील गाडेगाव मार्गावरील एका मंगल कार्यालयात साई क्रीडा व मनोरंजन मंडळाच्या नावावर सुरू असलेल्या क्लबची अकोटचे एसडीपीओ आयपीएस निखिल पाटील यांच्या पथकाने आकस्मिक भेट देत झाडाझडती घेतली. यावेळी तेथे तब्बल ३० ते ४० जणांच्या जवळपास लोक आढळले असल्याची प्राथमिक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. तर तेल्हारा शहर पोलिसांच्या नाकाखाली सुरू असलेल्या या क्लबची अकोट एसडीपीओ आयपीएस निखिल पाटील यांच्या पथकाने झाडाझडती घेतल्याने शहर पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.*

तेल्हारा शहरातील गाडेगाव मार्गावरील जगन्नाथ मंगल कार्यालय येथे साई क्रीडा व मनोरंजन मंडळाच्या वतीने विविध उपक्रम राबविणे सुरू असून तसा फलक सुद्धा मंडळाच्या वतीने दर्शनी ठिकाणी लावण्यात आला आहे. त्यामध्ये रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, खेळ, स्पर्धा, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ, रमी, प्लेइंग कार्ड आणि सार्वजनिक वाचनालय आदींचा समावेश आहे. या मंडळाची सूत्रांकडून सखोल माहिती प्राप्त केली असता याठिकाणी रमी, प्लेइंग कार्ड यासाठी लागणाऱ्या 'कार्ड रुम' करिता मात्र कुठल्याही प्रकारची परवानगीच नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तर हे सुरू करण्यासाठी सर्वात आधी संबंधित पोलिस ठाण्याकडून स्थळ निरीक्षण अहवाल ही प्रक्रिया पार पाडावी लागते ती सुद्धा पार पाडली नसल्याची धक्कादायक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. परिणामी याठिकाणी सुरू असलेली ' कार्ड रूम ' ही अधिकृत कशी ? असा फार मोठा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. त्यातच भर म्हणून शुक्रवारी अकोट एसडीपीओ निखिल पाटील यांच्या पथकाने सदर मनोरंजन मंडळाच्या क्लबला आकस्मिक भेट देत झाडाझडती घेतली. यावेळी मंडळ संचालकांचे चांगलेच धाबे दणाणले असल्याची माहिती मिळाली आहे, तर याठिकाणी कोणाही जवळ रोख रक्कम आढळली नसली तरी मात्र 'कार्ड रूम' सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली आहे. याठिकाणी तब्बल ३० ते ४० जण आढळले असल्याची माहिती मिळाली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया शनिवारी सकाळी सदर मंडळाची कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर करण्यात येणार असल्याची माहिती आहे. याप्रकरणी तेल्हारा शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रकाश तूनकलवार यांना प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### 'कार्ड रूम' च्या परवानगी बाबत यंत्रणेला साशंकता



तेल्हारा येथील सुरू असलेल्या मनोरंजन मंडळाची झडती घेण्यात आली आहे. याठिकाणी कुठल्याही प्रकारची रोख रक्कम आढळली नाही. शनिवारी सकाळी मनोरंजन मंडळाची सर्व कागदपत्रे व परवान्याची प्रत मागविण्यात आली आहे. या सर्व कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार.

**आयपीएस निखिल पाटील,** एसडीपीओ अकोट

### मध्यस्थीचा प्रयत्न ? चर्चेला उधाण

तेल्हारा येथे क्रीडा मंडळाच्या नावाखाली सुरू असलेल्या या क्लबची अकोट एसडीपीओ निखिल पाटील यांच्या पथकाने झाडाझडती घेतली असता याठिकाणी एका स्थानिक अधिकाऱ्याने झडती घेणाऱ्या पथकाची दिशाभूल करीत मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा यानिमित्ताने रंगली आहे. या प्रकरणात कोणत्या स्तरावरून हस्तक्षेपाचा प्रयत्न झाला, याबाबतही आता चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे.

# पातोंडा शिवारात पतीकडून पत्नीची निर्घृण हत्या

## नववर्षाच्या सुरुवातीलाच हादरवणारी घटना

■ प्रतिनिधी | अकोट ■

नववर्षाच्या सुरुवातीलाच अकोट तालुक्यातील पातोंडा शिवारात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसर हादरला आहे. मेंढपाळ व्यवसायासाठी वास्तव्यास असलेल्या पतीने पत्नीची निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली असून, यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दहीहांडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या पातोंडा गावाजवळील शेतशिवारात ही घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित दाम्पत्य काही दिवसांपासून मेंढपाळ व्यवसायासाठी या परिसरात तात्पुरते वास्तव्यास होते. दरम्यान, किरकोळ




कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. हा वाद हळूहळू तीव्र होत गेला आणि संतापाच्या भरात पतीने पत्नीवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात पत्नीचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच दहीहांडा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. आरोपी पतीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून अधिक चौकशी सुरू आहे. दरम्यान, या गंभीर घटनेची दखल घेत उपविभागीय अधिकारी निखिल पाटील यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी संबंधित पोलिस व महसूल अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन तपास जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या घटनेमुळे पातोंडा परिसरात एकच खळबळ उडाली आहे. कौटुंबिक वादातून अशा प्रकारे जीव घेण्याच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

अशा प्रकारच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## मालेगावात भव्य 'हिंदू संमेलन'ची हाक

**मालेगाव :** शहरातील शिव चौक परिसरात येत्या २३ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजेदरम्यान भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित या संमेलनातून हिंदू समाजात एकता, संस्कृतीची जपणूक आणि धर्मजागृतीचा संदेश दिला जाणार आहे.

या संमेलनात समाजातील विविध घटकांना एकत्र आणत 'धर्म रक्षित, राष्ट्र रक्षित' या विचाराला अधोरेखित केले जाणार असून, हिंदू संस्कृती, पर्यावरण, सामाजिक समरसता व राष्ट्रभक्ती यावर मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिषेक मुंदडा (युवा उद्योजक) असणार आहेत. तर प्रमुख वक्ते म्हणून राजेंद्र ताजणे (शिवांशी), यवतमाळ, जयश्री संतोष जोशी (बजरंग दल मातृशक्ती कार्यकर्त्या) आणि संदीपजी घुगे (जिल्हा कार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वाशीम) हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

# वाशिमच्या विकासाच्या मार्ग होणार प्रशस्त

## मुख्यमंत्र्यांची घेतली भेट; आ. शाम खोडे व नगराध्यक्ष केंदळे यांचा पुढाकार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**वाशिम शहराच्या विविध रस्त्याच्या कामाच्या निधी सोबत विकासाचे अनेक प्रश्न घेऊन वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार श्याम खोडे यांच्या नेतृत्वात नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी पुढाकार घेत राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी भेट घेऊन शहराच्या सर्वांगीण विकासाकरिता व रस्त्या करिता निधीची मागणी केली आहे मुख्यमंत्री फडवणीस यांनी तात्काळ सर्व कामासाठी निधी उपलब्ध करून देऊन विकासाचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी दिले.**

त्यामुळे वाशिम शहराच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग प्रशस्त झाला आहे. आमदार शाम खोडे यांच्या नेतृत्वात वाशिम मंगरूळपीर विधानसभा क्षेत्रामध्ये विकास कामाला मोठे प्राथमिकता दिल्या जात आहे कोट्यावधी रूपाचा निधी त्यांनी त्यांनी इथून आणला असून ठीक ठिकाणी विकासाचा श्री गणेशा केलेला आहे जनतेने विकासाकरिता



भाजपाचे अनिल केंदळे यांना मोठ्या मताधिक्याने नगराध्यक्षपदी विजयी केले. त्यामुळे नगराध्यक्ष केंदळे यांनी वाशिम शहराच्या चेहरा मोहरा बदलण्यासाठी पुढाकार घेतला असून जनतेला दिलेल्या सर्व आश्वासनाची पूर्तता करण्याच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण पाऊल पुढे टाकत आहे आमदार खोडे व नगराध्यक्ष केंदळे यांच्या जोडीने वाशिम शहराचे संपूर्ण रस्ते व विकासाच्या दृष्टिकोनातून सर्व बाबी पूर्ण करण्याकरिता पुढाकार घेतलेला आहे त्याच दृष्टिकोनातून त्यांनी मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निधीची मागणी केली आहे वाशिम शहराच्या विकासाकरिता व मतदार संघाच्या विकासाकरिता मुख्यमंत्री स्वतः सकारात्मक असून त्यांनी यावेळी आमदार खोडे व नगराध्यक्ष केंदळे यांचे अभिनंदन केले आहे. लवकरच मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार असल्याच चित्र दिसत आहे. यावेळी आमदार शाम खोडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्यासमवेत सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी , प्रदीप देशमुख व वैभव वायचाळ उपस्थित होते. विकासासाठी पुढाकार घेणाऱ्याचे स्वागतच.. आ. श्याम खोडे...... वाशिम शहराच्या विकाससंदर्भात व विविध प्रश्न संदर्भात कोणतेही पक्ष व सामाजिक संघटना , पदाधिकारी समाजसेवक यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून विकासाकरिता आवाज बुलंद केला तर आपण त्या सर्वांचे स्वागतच करतो विकासासाठी कुणीही पुढाकार घेतला तर त्याचा आपण सत्कार करू असे स्पष्ट भूमिका वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार शाम खोडे यांनी व्यक्त केली आहे. वाशिम मंगरूळपीर मतदार संघाचा आपल्या कार्यकाळात कायापलट करण्याचा आपला मानस असून त्याकरिता आपण प्रयत्नशील आहे आतापर्यंत कोट्यावधी रुपयाचा विकास निधी मतदार संघाच्या विकासाकरिता उपलब्ध करण्यात आलेला आहे. विकासाकरिता आपण कोणतेही पक्षभेद न मानता सर्वांनी एकत्रितपणे येऊन याला गती द्यावी अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. विकास कामाचे श्रेय कोण घेतो यापेक्षा आपण काय प्रयत्न केले याला महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून विकासाचा मोठा निधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# रोप्य महोत्सवी वर्षात अकोलेकरांना दिलासा द्या

## निलेश देव यांचा अर्थसंकल्पावर 'धडाका'



■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिकेच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त सादर होणारा अर्थसंकल्प हा केवळ औपचारिक नसून अकोलेकरांना प्रत्यक्ष दिलासा देणारा आणि शहराच्या विकासाला गती देणारा असावा, असा ठाम आग्रह वंचित बहुजन आघाडीचे गटनेते तथा स्थायी समिती सदस्य निलेश देव यांनी व्यक्त केला. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अर्थसंकल्पीय बैठकीत त्यांनी आक्रमक भूमिका मांडत प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला.

देव म्हणाले, महानगरपालिकेला २५ वर्षे पूर्ण होत असताना हा उत्सव साजरा करण्याचा क्षण असला तरी नागरिकांच्या अडचणी सोडवण्याची ही मोठी संधी आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या पाणीपट्टी वसुलीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरासरी १ हजार रुपयांत तडजोड योजना जाहीर करावी, अशी ठोस मागणी त्यांनी केली.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना करमाफी किंवा विशेष सवलत देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. त्याचबरोबर सौरऊर्जा वापरणाऱ्या घरांना करात सवलत देऊन पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना द्यावी, असेही त्यांनी सुचविले. पत्रकारांना मालमत्ता करातून दिलासा देण्याचा निर्णय घ्यावा, तसेच शहर स्वच्छतेत नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी घंटागाडी शुल्क माफ करण्याची योजना लागू करावी, अशी मागणीही त्यांनी केली. शहरातील मूलभूत सुविधांवर बोट ठेवत स्वच्छ पाणी, स्वच्छ परिसर आणि सक्षम वीजपुरवठा या बाबींवर तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता त्यांनी मांडली. यासोबतच स्वातंत्र्य सेनानींचा इतिहास जतन करण्यासाठी 'स्पंदने स्वातंत्र्याची' उपक्रमांतर्गत त्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन व जीवनकार्याचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

रोप्य महोत्सवी वर्षात अकोलेकरांना दिलासा देणारे निर्णय, विकासाला गती देणाऱ्या योजना आणि ऐतिहासिक वारशाचे जतन करणारे उपक्रम अर्थसंकल्पात दिसून यावेत, अशी अपेक्षा व्यक्त करत निलेश देव यांनी प्रशासनावर प्रभावी दबाव निर्माण केला.

# मुंडगाव ग्रामपंचायतीत लाखोंच्या अपहाराचा आरोप ; पोलिसांत तक्रार

## कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव ग्रामपंचायतीत आठवडी बाजाराच्या लिलावातून लाखो रुपयांचा अपहार व विविध कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करत अखेर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. उबाठा शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख विलास दशरथ ठाकरे यांनी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात ही लेखी तक्रार दिली असून, यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

तक्रारीनुसार, २३ सप्टेंबर २०२४ रोजी ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत आठवडी बाजाराचा लिलाव करण्यात आला. हा लिलाव २ लाख ११ हजार रुपयांत झाला; मात्र ही रक्कम ग्रामपंचायतीच्या सामान्य निधी खात्यात जमा करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी संगनमताने निधीचा अपहार केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

यापूर्वीही नागरिकांनी गटविकास अधिकारी, अकोट यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र, या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. यामुळे संबंधितांची हिम्मत वाढून मोठ्या प्रमाणावर अफरातफर झाल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या प्रकरणी यापूर्वीही २८ जानेवारी २०२५ रोजी अकोट ग्रामीण पोलिसांकडे तसेच १७ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रारी देण्यात आल्या होत्या. तरीही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर १७ मार्च २०२६ रोजी पुन्हा लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, मुंडगाव ही तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत असून येथे कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीच्या प्रती जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार तसेच राज्याच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासह विविध यंत्रणांना पाठविण्यात आल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणात अकोट ग्रामीण पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांनी योग्य ती चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे सांगितले आहे.

### कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा

दरम्यान, या प्रकरणात प्रशासनाने तत्काळ कारवाई न केल्यास ६ एप्रिल २०२६ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा विलास ठाकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिला आहे. या उपोषणात विलास ठाकरे यांच्यासह शेख रहेमान, दिलीप उजीळे, सुनिल नागोलकार, वासुदेव गावंडे, नवलकिशोर नहाळे व शेख अफसर सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उत्साहात

■ प्रतिनिधी | कारंजा ■

राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' टप्पा क्रमांक १ अंतर्गत उंबर्डा बाजार येथे आयोजित करण्यात आलेले शिबिर मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. दि. २० मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता श्री समर्थ गजानन महाराज संस्थान, उंबर्डा बाजार येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या शिबिराचे अध्यक्षस्थान उपविभागीय अधिकारी कारंजा श्री आकाश वर्मा (भा.प्र.से.) यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी श्री कैलास देवरे उपस्थित होते. यावेळी तहसीलदार श्री रवी महाले, तालुका कृषी अधिकारी श्रीमती अश्विनी भोसले, नायब तहसीलदार श्री अनिल वाडेकर, श्री विनोद हरणे, श्री लक्ष्मण बनसोडे, सब-रजिस्ट्रार श्री धनंजय देशपांडे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व मान्यवरांची उपस्थिती लाभली.

उंबर्डा बाजारचे सरपंच श्री राज चौधरी, उपसरपंच श्री रघुनाथ भगत, गजानन महाराज संस्थानचे अध्यक्ष श्री वसंतराव श्रीराव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष श्री शेषराव दिघडे, तसेच श्री देवेंद्र राऊत, नांदगावकर मॅडम, अखिलेश रंगे, दीपक बांडे आदी मान्यवरांनीही कार्यक्रमास हजेरी लावली.


शिबिरात विविध शासकीय योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ९ लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली, तर श्रावण बाळ योजनेचे १६ लाभार्थी लाभान्वित झाले. याशिवाय शिधापत्रिकेचे ३७, घरकुल पंचायत अंतर्गत ४०, तसेच जन्म-मृत्यू नोंदणीचे ९ प्रमाणपत्र देण्यात आली. महसूल विभागामार्फत सातबारा फेरफारचे ८ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून एकूण १९७ दाखले नागरिकांना वितरित करण्यात आले.

# मालेगाव शाखा संचालकपदासाठी तिरंगी लढत

### जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूक

**मालेगांव :** दि, अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती को-ऑ बँक लि अकोला शाखा मालेगांव संचालक पदासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची बुधवार, १८ मार्च ही अंतिम तारीख असताना अंतिम तारखेला मालेगाव शाखा संचालक पदासाठी दोन जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहे त्यामुळे आता बँकेच्या संचालक पदासाठी नितीन दिलीप जाधव, गोपाल पाटील राऊत व प्रकाश पाटील कुटे या तिघा उमेदवारांचे अर्ज कायम राहिल्याने मालेगाव शाखा संचालक पदाची निवडणूक ही अखेर तिरंगी ठरली आहे.

मालेगाव तालुका राजकारणात जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह बँक निवडणूक ही अतिशय महत्त्वाची ठरली असून, होणारी ही निवडणूक अटीतटीची व काट्याच्या लढतीची होणार ही शक्यता असताना या



निवडणुकीकरिता मालेगाव शाखा संचालकपदाकरिता एकूण पाच उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. अर्ज मागे घेण्याची आजची १८ मार्च ही अंतिम तारीख असताना अंतिम तारखेला ॲड., रवींद्र गवळी, राजू चंदू जाधव या दोघा उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहे. त्यामुळे आता या निवडणुकीत नितीन दिलीप जाधव, गोपाल पाटील राऊत, तसेच प्रकाश पाटील कुटे या तिघा उमेदवारांचे अर्ज कायम राहिले असल्याने निवडणूक रिंगणात आता तिन्ही उमेदवार एकमेकांविरुद्ध उभे ठाकले आहे. त्यामुळे होणारी ही निवडणूक तिरंगी ठरली आहे. मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीचे मतदान रविवार, २९ मार्च रोजी असून या निवडणूक प्रचाराला आता वेग आला आहे तर उमेदवारांसह त्यांचे समर्थक, कार्यकर्ते तसेच राजकीय नेते मंडळीही जोमाने प्रचाराला भिडली आहे. या निवडणुकीत साम, दाम, दंड या भेदनीतीचा वापर केल्या जात असून निवडणुकीकरिता आर्थिक उलाढाल होण्याची शक्यता असून तशी चर्चाही तालुक्यात सुरू झाली आहे. त्यामुळे निवडणुकीकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. मागच्या पंचवार्षिक मध्ये माजी संचालक प्रकाश पाटील कुटे व विद्यमान संचालक दिलीप जाधव हे एक मेकाच्या विरुद्ध असताना यामध्ये दिलीप जाधव दोन मताने निवडून आले होते, यावेळी माजी संचालक प्रकाश पाटील कुटे, तसेच विद्यमान संचालक दिलीप जाधव यांनी आपल्या मुलास नितीन दिलीप जाधव यांना उमेदवारी दिली असून, तसेच तिसरे उमेदवार म्हणून गोपाल पाटील राऊत हे उभे आहेत या तिरंगी लढतीमध्ये संचालकासाठी उभे असलेले तिन्ही उमेदवाराचा दांडगा संपर्क असून सर्वच उमेदवारांनी तालुक्यातील ८८ मतदारांना भेटले असून संपर्कात आहेत उमेदवार येणाऱ्या २९ तारखेला मतदान झाल्यानंतर कोणाच्या गळ्यात विजयाची माळ पडेल हे चित्र, ३० मार्च ला असलेल्या मतमोजणी नंतरच स्पष्ट होईल, याकडे सर्व तालुक्यातील जनतेचे लक्ष लागलेले आहे

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११३ ■ शनिवार, २१ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आज साजरी होणार रमजान ईद

### ‘चाँद नजर आ गया... रोजे रखने वालों की है ईद, ईद मुबारक

**वर्धा जनमाध्यम :** शुक्रवारी सायंकाळी आकाशात चंद्रकोर झळकताच संपूर्ण परिसरात आनंदाचा जल्लोष उसळला. ‘चाँद नजर आ गयाष्ठ ईद मुबारक’ अशा शुभेच्छांचा वर्षाव करत मुस्लिम बांधवांनी एकमेकांना मिठ्या मारत सणाचा आनंद व्यक्त केला. पवित्र रमजान महिन्याच्या उपवासानंतर अखेर ईद-उल-फितरचा आनंदोत्सव साजरा करण्याची वेळ आली आहे.

चंद्रदर्शनाच्या प्रतीक्षेत दिवसभर उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सायंकाळी चंद्र दिसताच मशिदींमध्ये विशेष नमाज अदा करण्याची तयारी सुरू झाली. शहरातील बाजारपेठा दिवसभर गजबजलेल्या होत्या. कपडे, फळे, खजूर, मिठाई आणि विशेषतः सेवई खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. घराघरांत साफसफाई, सजावट आणि स्वादिष्ट पदार्थांची तयारी सुरू असून ‘शीरखुर्मा’सारख्या पारंपरिक पक्वान्नांचा सुगंध दरवळू लागला आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांमध्ये ईदचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत



आहे. ईदच्या निमित्ताने बंधुभाव, प्रेम आणि ऐक्याचा संदेश दिला जातो. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येत आनंद साजरा करावा, हीच या सणाची खरी ओळख आहे.

### खर्चाचा डोंगर, प्रवाशांचा ओसाड...

## वर्धा-कळंब पॅसेंजर ‘तोट्याच्या रुळावर’!

### रिकामी धावणारी रेल्वे... जनतेच्या पैशांची उघड उधळपट्टी

**वर्धा । रवींद्र लाखे :** खर्चा रुपया आणि आमदानी अठन्नी ही म्हण सध्या वर्धा रेल्वे स्थानकावर अक्षरशः जिवंत झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मोठ्या अपेक्षांनी सुरू करण्यात आलेली वर्धा-कळंब पॅसेंजर गाडी आज अक्षरशः प्रवाशांच्या प्रतीक्षेत धापा टाकताना दिसत आहे. देवळी, भिडी, आणि कळंब परिसरातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरण्याची अपेक्षा असलेली ही रेल्वे आज ‘रिकाम्या डब्यांची धाव’ बनली आहे.

सध्याची स्थिती अशी की, कळंबपर्यंत अवघे दोन-चार प्रवासीच प्रवास करताना दिसतात. अख्खी ट्रेन जवळपास रिकामीच धावत असल्याने रेल्वे विभागाचा आर्थिक तोटा दिवसेंदिवस वाढत आहे. सुरुवातीला ही गाडी वर्धा येथून सकाळी ८ वाजता सुटून ११ वाजता परत येत होती आणि वर्ध्यातच मुक्काम करत होती. मात्र ट्रॅकच्या अडचणीमुळे आता ही गाडी कळंब येथे मुक्कामी ठेवण्यात आली आहे.




या बदलामुळे चालक आणि गार्ड यांची मोठी गैरसोय झाली आहे. त्यांना वर्धा ते कळंब आणि परत येण्यासाठी खासगी वाहनाची व्यवस्था करण्यात आली असून, यासाठी दरमहा तब्बल २५ ते ३० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च रेल्वेला सहन करावा लागत आहे. सकाळी चालक-गार्ड खासगी वाहनाने कळमला जाऊन गाडी वर्ध्याकडे आणतात, आणि पुन्हा कळंबला पोहोचल्यानंतर त्याच वाहनाने वर्ध्याला परत येतात. परिणामी, ‘खर्चाचा फुगवटा आणि उत्पन्नाचा दुष्काळ’ अशीच अवस्था निर्माण झाली आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिकांमध्येही या गाडीबाबत नाराजी वाढत आहे. ही गाडी यवतमाळपर्यंत वाढवली तरच काही अर्थ आहे, अन्यथा सध्या तरी स्थगिती द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

यातच विशेष म्हणजे, खासदार अमर काळे यांनी संसदेत विविध मुद्दे मांडले असले तरी या तोट्यात चालणाऱ्या गाडीबाबत अद्याप कोणताही ठोस प्रश्न उपस्थित केला नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जे प्रवासी नाहीत, त्यांच्यासाठी गाडी का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. विरोधकांनीही या विषयावर ठोस भूमिका घ्यावी, अन्यथा ‘रिकाम्या गाडीवर राजकारण कशासाठी असा प्रश्न जनतेतून केला जात आहे. एकूणच, वर्धा-कळंब पॅसेंजर सध्या ‘तोट्याच्या रुळावर’ भरधाव धावत असून, प्रशासनाचे डोळे कधी उघडणार? हा खरा प्रश्न उपस्थित होत आहे.

## आष्टी बाजार समितीच्या विभाजन मसुद्यावर हरकती व सुचना आमंत्रित

**वर्धा जनमाध्यम :** सद्या एकत्रित अस्तित्वात असलेल्या आष्टी कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करुन स्वतंत्र आष्टी व कारंजा कृषि उत्पन्न बाजार समितीची निर्मिती करण्यासाठी मसुदा करण्यात करण्यात आलेला आहे. या मसुद्यावर समितीच्या सदस्यांना हरकती किंवा सुचना असल्यास मसुदा निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसात सादर करावे, असे आवाहन सहकारी संस्थेच्या जिल्हा उपनिबंधकांनी केले आहे. सद्या अस्तित्वात असलेली कृषि उत्पन्न बाजार समिती, आष्टी ही बाजार समिती आष्टी व कारंजा (घाडगे) अशा दोन तालुक्याची एकच बाजार समिती असून एक तालुका एक बाजार समिती या शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, आष्टी या बाजार समितीचे कृषि उत्पन्न बाजार समिती, आष्टी व कृषि उत्पन्न बाजार समिती, कारंजा (घाडगे) अशा दोन बाजार समितीत विभाजन करण्यात येणार आहे. तसेच या दोन्ही स्वतंत्र तालुक्यातील कृषि उत्पन्नाचे योग्य नियमन करणे, स्थानिक शेतकऱ्यांना अधिक दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांचे पणन विषयक प्रश्न स्थानिक पातळीवरच सोडविण्याच्यादृष्टिने कृषि उत्पन्न बाजार समितीचे, विभाजन करुन आष्टी व कारंजा (घाडगे) अशा दोन तालुक्याच्या स्वतंत्र बाजार समित्या निर्मितीच्या दृष्टीने मसुदा आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

### रस्त्याची दुर्दशा की प्रशासनाची उदासीनता

## गोपुरी-साटोडा मार्गावर जनआक्रोश उसळला

### ठिय्या आंदोलन करत नागरिकांचा एल्गार; आता तरी जागे व्हा असा प्रशासनाला इशारा

**वर्धा जनमाध्यम :** गेल्या साडे-दोन वर्षांपासून रखडलेल्या गोपुरी-साटोडा मार्गाच्या कामाविरोधात अखेर जनतेचा संयम सुटला! खड्ड्यांनी भरलेला, धुळीच्या ढगात हरवलेला आणि अपघातांना आमंत्रण देणारा हा रस्ता आता नागरिकांच्या जिवावर उठला असून शुक्रवारी या मार्गावर संतप्त नागरिकांनी ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले.

गोपुरी चौक ते साटोडा चौक दरम्यानचे रस्त्याचे काम अडीच वर्षांपासून कासवगतीने सुरू होते, पण सध्या ते पूर्णपणे ठप्प झाले आहे. वाढत्या वाहतुकीमुळे या मार्गाचे महत्त्व अधिकच वाढले असताना, रस्त्याची दयनीय अवस्था नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. दुचाकी, चारचाकी, ट्रक आणि ट्रॅक्टरची सततची वर्दळ असलेल्या या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. रस्ता नाही, मृत्यूचा सापळा



अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. धुळीच्या ढगामुळे श्वसनाचे त्रास वाढले असून, खड्ड्यांमुळे रोजच लहान-मोठे अपघात घडत आहेत. अनेक वेळा निवेदन देऊनही प्रशासनाने कानाडोळा केल्याने अखेर जनतेने रस्त्यावर उतरून आवाज बुलंद केला. शुक्रवारी सकाळी ९ वाजता आलोडी येथील मोठ्या पुलाजवळ डॉ. बाळकृष्ण माऊसकर यांच्या नेतृत्वात नागरिकांनी एकत्र येत ठिय्या आंदोलन छेडले. या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा आधार घ्यावा लागला.

आंदोलनाची तीव्रता लक्षात येताच तालुका प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या, मात्र आश्वासनांपलीकडे काही ठोस होणार का? हा प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहे.

या आंदोलनात बिपीन कठाणे, अजय जानवे, गौरव गावंडे, गणेश ढवले, संदीप मारवाडी, महेश कन्नाके, प्रवीण ढाले यांच्यासह शेकडो नागरिकांचा सहभाग होता.

## देवळीत आरक्षणाची घंटा वाजली : प्रवाशांच्या हालअपेष्टांना अखेर ब्रेक

### खा.अमर काळे यांच्या पाठपुराव्याला यश; २१ मार्चपासून सुविधा सुरु

**वर्धा जनमाध्यम :** देवळीकरांच्या संयमाचा अखेर विजय झाला, वर्षानुवर्षे केवळ साधारण तिकीटांवर समाधान मानणाऱ्या प्रवाशांना आता आरक्षणाची दिलासा देणारी बातमी मिळाली आहे. देवळी रेल्वे स्टेशन येथे आरक्षण सुविधा अधिकृतपणे मंजूर झाली असून २१ मार्च २०२६ पासून ती प्रत्यक्षात सुरू होणार आहे.

वर्धा-नांदेड रेल्वे मार्ग सुरू झाल्यापासून देवळी येथे आरक्षणाची सुविधा नसल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत होती. तिकीट काढण्यासाठी कधी पोस्ट ऑफिसचा आधार, तर कधी नेटवर्कच्या अडचणींमुळे थेट वर्ध्याची वाट धरावी लागत होती. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, पोस्ट ऑफिसमधील सुविधा देखील कमी वापर या कारणावरून बंद करण्यात आली.

यामुळे देवळी तालुक्यातील प्रवाशांसमोर वर्धा गाठा किंवा प्रवास सोडा असा पर्याय उभा राहिला होता. मात्र, जनतेच्या या व्यथा ऐकून खासदार अमर काळे यांनी हा प्रश्न थेट रेल्वे विभागाच्या दारात नेला. २९ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या पत्रानंतर त्यांनी सातत्याने पाठपुरावा करत विषय जिवंत ठेवला. अखेर रेल्वे प्रशासनाने या मागणीची गंभीर दखल घेत प्रस्ताव मंजूर केला.

रेल्वे विभागाच्या १७ मार्च २०२६ च्या पत्रानुसार, देवळी रेल्वे स्टेशनवर आरक्षण खिडकी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत सुरू राहणार आहे. या निर्णयामुळे आता देवळीकरांना आरक्षणासाठी वर्ध्याला धाव घेण्याची गरज उरणार नाही. स्थानिक पातळीवरच सुविधा उपलब्ध झाल्याने प्रवाशांचा वेळ, पैसा आणि त्रास तिन्हींची बचत होणार आहे.

नागरिकांनी या निर्णयाचे जोरदार स्वागत करत खासदार अमर काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे कौतुक केले आहे. मोठा मतदारसंघ सांभाळतानाही स्थानिक प्रश्नांकडे लक्ष देणारा नेता अशी प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे.

## सेलू-धानोली मार्गावर अवैध खनिज वाहतुकीवर कारवाई

### -महसूल विभागाने केले दोन टिप्पर जप्त; चालक पसार

**सेलू जनमाध्यम :** सेलू ते धानोली मार्गावरील भगत ले-आउट परिसरात अवैध खनिज वाहतुकीविरोधात महसूल विभागाने धडक कारवाई करत दोन टिप्पर जप्त केले. (दि.२०) सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात खनिज वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, MH 34 AB 0996 क्रमांकाचा ट्रक रेती वाहतूक करत असताना महसूल विभागाच्या पथकाने छापा टाकून तो जप्त केला. तसेच MH 32 AJ 6491 क्रमांकाचा टिप्पर झांबरे यांच्या मुरूम खदानीतून नियमबाह्य पद्धतीने मुरूम भरून येत असताना अडविण्यात आला. दोन्ही वाहने ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी सेलू तहसील कार्यालयात जमा करण्यात आली आहेत. ही कारवाई महसूल निरीक्षक भोले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात नायब तहसीलदार किरसान, महसूल निरीक्षक अभिषेक शुक्ला, महसूल निरीक्षक लडके, तलाठी वैभव घोडके आणि तलाठी श्याम भट यांचा समावेश होता. अधिकाऱ्यांनी साठा केलेल्या रेतीच्या ढिगावरून भराव सुरू असतानाच छापा टाकल्याने वाहन चालकांना



पळ काढावा लागल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान वाहन चालकांकडे आवश्यक रॉयल्टी अथवा कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे आढळून आले. कारवाईची चाहूल लागताच चालकांनी वाहन सोडून चावी घेऊन घटनास्थळावरून पलायन केल्याचे तलाठी वैभव घोडके यांनी सांगितले.

या कारवाईवर वाहन मालक वैभव वाघमारे (रा. सेलू) यांनी आक्षेप नोंदवला आहे. माझ्याकडे रेतीची वैध रॉयल्टी असूनही महसूल विभागाने चुकीची कारवाई केली, असा दावा त्यांनी केला आहे. मात्र, अधिकाऱ्यांनी घटनास्थळी कोणतीही कागदपत्रे सादर करण्यात आली नसल्याचे स्पष्ट केले.

सध्या तहसीलदार शकुंतला पाराजे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, या प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे.

## सोन्याच्या नावाखाली ‘विश्वास’ वितळला २२ कॅरेटला २४ चा शिक्का, ग्राहकांची लूट

### -सराफा बाजारावर संशयाची सावली; वर्ध्यातील मोठ्या शोरूमवरही प्रश्नचिन्ह

**वर्धा । पुलगाव । जनमाध्यम :** सराफ झाले मालामालष्ठ ग्राहक झाले कंगाल ही म्हण आता वास्तवात उतरते आहे. पुलगावात उघडकीस आलेल्या एका धक्कादायक प्रकरणाने सराफा व्यवसायाच्या प्रामाणिकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

२४ कॅरेट म्हणून विकलेले सोने प्रत्यक्षात २२ कॅरेट निघाल्याने ग्राहकांची फसवणूक उघड झाली आहे.

रसुलाबाद येथील अमित मसराम (३१) यांनी दोन वर्षांपूर्वी पुलगावातील सराफा व्यावसायिक संजय बदनोरे यांच्याकडून १० ग्रॅम वजनाचा गोफ ६४ हजार रुपयांना खरेदी केला होता. त्यावेळी तो २४ कॅरेट असल्याचे सांगत बिलही देण्यात आले होते.




दरम्यान, फेब्रुवारी २०२६ मध्ये सोन्याचे दर तब्बल १ लाख ५८ हजार रुपयांपर्यंत झेपावले. पैशाची गरज भासल्याने अमित मसराम गोफ विकण्यासाठी त्याच दुकानात गेले. मात्र, व्यापाऱ्याने केवळ १ लाख ३९ हजार रुपये देण्याची तयारी दर्शवली.

आजचा बाजारभाव लक्षात घेता किमान १ लाख ५० हजार रुपये द्या, अशी मागणी अमित यांनी केली. पण व्यावसायिकाने स्पष्ट नकार दिला. संशय आल्याने त्यांनी दुसऱ्या दुकानात तपासणी केली असता तो गोफ २२ कॅरेटचा असल्याचे स्पष्ट झाले.

यामुळे संतप्त झालेल्या अमित मसराम यांनी पुलगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### सभागृहाला बगल, निविदेचा खेळ उघड

## देवळी नगर परिषदेत चारचाकी वाहन प्रकरणावरून खळबळ

**देवळी जनमाध्यम :** देवळी नगर परिषदेत सध्या सत्ताधाऱ्यांमध्येच संघर्षाची ठिणगी पेटली असून प्रशासनातील निर्णय प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सभागृहाला डावलून चारचाकी वाहनासाठी निविदा काढल्याच्या आरोपांमुळे संपूर्ण नगर परिषद वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, १७ फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत आगामी आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी विविध विभागांच्या कामांसाठी एकूण १५ निविदांना मंजुरी देण्यात आली होती. मात्र, या मंजूर विषयांमध्ये चारचाकी वाहन भाड्याने घेण्याचा कोणताही मुद्दा नव्हता. तरीही ४ मार्च रोजी प्रसिद्ध झालेल्या निविदा जाहिरातीत चालकासह, इंधनासह चारचाकी वाहन पुरविण्याचा मुद्दा समाविष्ट करण्यात आल्याचे उघड झाले. यामुळे सभागृहाची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप नगराध्यक्ष किरण ठाकरे यांनी केला असून त्यांनी थेट जिल्हाधिकारी वामन्थी सी. यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. सभागृहाचा अधिकार डावलून घेतलेला निर्णय हा लोकशाही व्यवस्थेचा अपमान आहे, असा संताप व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

## हेलिपॅड चमकले, पण हिशोब काळा : ‘पीएम’च्या दौरा मागचा काळाबाजार उघडकीस?

### -अहवाल येताच फुटणार बॉम्ब, अभियंते-कंत्राटदारांच्या संगनमताचा पर्दाफाश

**वर्धा जनमाध्यम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वर्धा दौऱ्याच्या निमित्ताने करण्यात आलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. ‘पीएम दौरा’च्या नावाखाली शासनाच्या निधीचा अक्षरशः खेळ मांडला गेल्याचा आरोप होत असून, या सर्व कामांचे ‘पोस्टमार्टम’ करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या त्रि-सदस्यीय तज्ज्ञ समितीने शुक्रवारी स्वावलंबी विद्यालयाच्या मैदानावर धडक देत प्रत्यक्ष पाहणी केली.

या तपासणीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागात खळबळ उडाली असून, चौकशीअंती अनेकांचे ‘पितळ’ उघडे पडणार, अशी जोरदार चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे तत्कालीन कनिष्ठ अभियंता यांच्यावर गंभीर आरोपांची सरबत्ती होत असून, अहवाल सादर झाल्यानंतर त्यांची अडचण वाढणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

**नियम धाब्यावर; कामे कागदावरच ‘पूर्ण’**

तक्रारदाराने सादर केलेल्या पुराव्यांनुसार, स्वावलंबी विद्यालयाच्या मैदानावर करण्यात आलेल्या कामांमध्ये प्रचंड अनियमितता झाल्याचे स्पष्ट होत आहे.

पी.एम. विश्वकर्मा योजनेच्या उद्घाटनासाठी उभारण्यात आलेल्या हेलिपॅड, रस्ते व मैदानाच्या कामात दर्जाहीन साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप आहे. रस्त्यावरील बिटुमेनचा थर केवळ १५ मिमी ठेवण्यात आला, तर जीएसबीची जाडी नियमांपेक्षा कमी ठेवली गेली. याहून गंभीर बाब म्हणजे बीएमचे काम पूर्ण न करताच लाखोंची देयके काढण्यात आल्याचा आरोप तक्रारीतून करण्यात आला आहे.

यामुळे ‘कामे प्रत्यक्षात झाली की फक्त कागदावरच पूर्ण दाखवली असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**सावंगी-पालोती-वडद मार्गावरही ‘घोटाळ्याची चादर**

एएमसी अंतर्गत करण्यात आलेल्या सावंगी-पालोती-वडद रस्त्याच्या कामातही मोठा ‘गौडबंगाल’ झाल्याचे समोर आले आहे.



रस्त्याच्या साईड शोल्डरमध्ये मुरूम न टाकणे, साफसफाई न करणे, तसेच जीवघेणे खड्डे तसेच ठेवूनच १५ ते २० लाखांचे बिल काढण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या प्रकारामुळे ‘कामे प्रत्यक्षात झालीच नाहीत, मग पैसे कोणाच्या खिशात गेले?’ असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**‘मलिदा’ वाटपाचा खेळ? कंत्राटदार-इंजिनियर संगनमत**

या सर्व प्रकरणात काही कंत्राटदार एजन्सींनी विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून शासनाच्या निधीवर डल्ला मारल्याचा संशय बळावत आहे.

संदीप कन्स्ट्रक्शन (हिंगणघाट), गजराज कन्स्ट्रक्शन (वर्धा), नक्षत्र कन्स्ट्रक्शन, पी.के. कन्स्ट्रक्शन, नयन एंटरप्रायझेस, जैन कन्स्ट्रक्शन (नागपूर) यांच्यासह काही एजन्सींची नावे चर्चेत असून, या ‘मलिदा वाटपाच्या खेळा’त कोण-कोण सामील होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात दिवसभर या घोटाळ्याचीच चर्चा रंगली होती.

### चौकशी अहवाल ठरणार टर्निंग पॉइंट

त्रि-सदस्यीय तज्ज्ञ समितीने प्रत्यक्ष स्थळी पाहणी करून कामांची बारकाईने तपासणी केली असून, आता सर्वांचे लक्ष अहवालाकडे लागले आहे.

हा अहवाल कार्यकारी अभियंत्यांकडे सादर होताच, संबंधितांवर कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता आहे.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने व कार्यकारी अभियंत्यांच्या निर्देशानुसार प्रत्यक्ष स्थळी पाहणी करण्यात आली आहे. अहवाल लवकरच सादर केला जाईल.

**दिलीप हनुमंते,** उपविभागीय अभियंता, सा.बा. समुद्रपूर

### जनतेचा प्रश्न

‘पीएम दौरा’च्या नावाखाली जर भ्रष्टाचार झाला असेल, तर जबाबदारांवर कठोर कारवाई होणार का? की हा घोटाळाही फाईलमध्येच गाडला जाणार हे पाहणे गरजेचे आहे,

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मुनगंटीवारांच्या घोषणेने भाजप वर्तुळात खळबळ



**चंद्रपूर**-जिल्ह्यात भाजपमध्ये पुन्हा एक नवा वाद उफाळून आलाय. याला कारण ठरले सुधीर मुनगंटीवार यांचे एक वक्तव्य. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर चंद्रपूर विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाला आणि सुधीर मुनगंटीवार यांना बल्लारपूर मतदारसंघात जावे लागले. तोपर्यंत मुनगंटीवार हे सलग तीनदा चंद्रपुरातून निवडून आले होते. चंद्रपूर मतदारसंघात सध्या भाजपचेच किशोर जोरगेवार हे आमदार आहेत. मात्र २०२७ ला नव्याने पुनर्रचना झाल्यावर मी चंद्रपुरात परत येईन, अशी घोषणाच मुनगंटीवार यांनी केल्याने भाजप वर्तुळात खळबळ उडाली आहे. असे झाले तर जोरगेवार कुठे जातील, असा प्रश्न निर्माण झालाय. मी पुन्हा येईन, असे फडणवीस म्हणाले होते, याची आठवण मुनगंटीवार यांनी करून देतानाच माझे यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी बोलणे झाले असून, त्यानंतर चंद्रपूरच्या विकासाचा झंझावात निरंतर राहील, असेही मुनगंटीवार म्हणाले.

## सातार्‍यात नाट्यमय घडामोडी

# एका मताने जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा



**सातारा**-सातारा जिल्हा परिषदेवर अखेर भाजपचा भगवा फडकला आहे. अवघ्या एका मताने प्रिया शिंदे अध्यक्षपदी आणि राजू भोसले उपाध्यक्षपदी निवडून आले. विशेष म्हणजे नवनिर्वाचित अध्यक्षा प्रिया शिंदे या शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेश शिंदे यांच्या पत्नी आहेत. दरम्यान ही निवडणूक प्रचंड तणाव आणि पोलीस बंदोबस्तात झाली. जिल्ह्यातील सर्वच मातब्बर नेत्यांनी ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली होती. यात अखेर भाजपला यश आलं असून राष्ट्रवादी आणि शिवसेनेला पराभवाचा धक्का बसला आहे. भाजपच्या उमेदवाराचा विजय झाला असला तरी जिल्हा परिषद आवारात अजूनही गोंधळ सुरू असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या काही सदस्यांना मतदान न करू दिल्याचा आरोप केला जात असून मंत्री शंभूराज देसाई जिल्हा परिषद इमारतीत तळ ठोकून असल्याचे समजते. अध्यक्षपदाच्या निवडीच्या आदल्या रात्री जिल्हा परिषद सदस्यांच्या अपहरणासंदर्भात तक्रारी दाखल झाल्या. याप्रकरणी राष्ट्रवादीच्या सदस्यांना ताब्यात घेण्यासाठी पोलीस आले होते. ते सदस्य सभागृहात हजर राहू शकले नसते तर भाजपाला सहज विजय मिळवणे शक्य झाले असते. अशावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई आक्रमक झाले. त्यांनी सायरन लावून आपल्या गाडीतून सदस्यांना थेट जिल्हा परिषदेच्या आवारात आणले. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या उमेदवार प्रिया शिंदे यांना ३३ तर मनीषा फडतरे यांना ३२ मते मिळाली. अवघ्या एका मताने त्या विजयी झाल्या. उपाध्यक्षपदाचे उमेदवार राजू भोसले यांनाही ३३ मते मिळाली. निवडीच्या वेळी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तिन्ही पक्षाचे झाडून सगळे नेते जिल्हा परिषदेत दाखल झाले होते. भाजपविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना एकत्र निवडणूक रिंगणात उतरली. राष्ट्रवादीकडून अध्यक्षपदासाठी मनीषा फडतरे तर उपाध्यक्षपदासाठी शिवसेनेच्या अशोक पाटील यांनी अर्ज दाखल केले होते. त्यांचा एका मताने पराभव झाला. जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीच्या निमित्ताने महायुतीत सत्ता संघर्ष निर्माण झाला. तसेच नेत्यांमधील संबंध देखील ताणले गेले आहेत.

# संकट काळात तरी शासनाने संवेदनशीलता दाखवावी-जयंत पाटील



**मुंबई**-महाराष्ट्रातील अनेक भागांना सध्या अवकाळी पाऊस व गारपिटीने झोडपले आहेत. त्यामुळे अक्षरश: काढणीला आलेली रब्बी पिके आडवी झाली आहेत. अनेक फळबागांचेही नुकसान झाले असून त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी केली आहे.

'संपूर्ण राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उभ्या पिकांचे, फळबागांचे तसेच काढणीस आलेल्या पिकांचेही नुकसान होऊन शेतकरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आणि योग्य ती आर्थिक मदत जाहीर करावी. मदत देताना कोणत्याही प्रकारची अट न ठेवता शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे या संकटाच्या काळात शासनाने संवेदनशीलता दाखवत त्वरित निर्णय घ्यावा', अशी मागणी जयंत पाटील यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून केली आहे.

## संक्षिप्त

### रुपयाची ऐतिहासिक घसरण



**मुंबई**-जागतिक बाजारातील घडामोडी आणि आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाच्या हिंदुस्थानच्या चलनाला मोठा फटका बसला आहे. शुक्रवारी सकाळी बाजारात व्यवहार सुरू होताच रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ऐतिहासिक निचांकी पातळीला पोहोचला. रुपयाच्या इतिहासात पहिल्यांदाच डॉलरने ९३ रुपयांचा टप्पा ओलांडला असून आता रुपयाचा भाव ९३.२४ वर पोहोचला आहे. इस्रायल आणि इराणमधील वाढत्या संघर्षाचा परिणाम जागतिक बाजारपेठेवर झाला असून, सुरक्षित गुंतवणूक म्हणून डॉलरकडे कल वाढला आहे. क्रूड ऑईलच्या किमती प्रति बॅरल ११५ डॉलरच्या वर गेल्या आहेत. या सगळ्याचा थेट परिणाम रुपयावर झाला आहे तसेच शेअर बाजारातून परकीय गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात पैसा काढून घेतल्यामुळे रुपयावर दबाव वाढला आहे.

### चारधाम यात्रेकरीता ऑनलाईन नोंदणी

**मुंबई**-चारधाम यात्रा १९ एप्रिलपासून सुरू होणार आहे. यात्रेकरिता भाविकांनी ऑनलाईन नोंदणीला सुरुवात केली आहे. यात्रेच्या ऑनलाईन नोंदणीला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून फक्त १२ दिवसांत ७ लाखांपेक्षा अधिक भाविकांनी नोंदणी असून केली आहे. २०२५ मध्ये ५१ लाख भाविकांनी नोंदणी करून नवा विक्रम केला होता. या वर्षी तो विक्रम मोडला जाऊ शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे.१९ एप्रिलला यमुनोत्री आणि गंगोत्री मंदिरांचे दरवाजे उघडणार आहेत. त्यानंतर २२ एप्रिलला केदारनाथ धाम, २३ एप्रिलला बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे आणि २३ मे रोजी शिखांचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या हेमकुंड साहिबचे दरवाजे खुले होणार आहेत. या चारधाम यात्रेच्या दर्शनासाठी पर्यटन विभागाने ६ मार्चपासून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे.यात्रा सुव्यवस्थित करण्यासाठी राज्य सरकारने ७० टक्के ऑनलाईन आणि ३० टक्के ऑफलाईन नोंदणीचा कोटा निश्चित केला आहे. ऑफलाईन नोंदणी १७ एप्रिलपासून सुरू होईल. हरिद्वार, ऋषिकेश, नयागाव आणि हर्बर्टपूर ही मुख्य केंद्रे असतील. गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि भाविकांच्या लांब रांगा टाळण्यासाठी प्रशासनाने या वेळी केंद्रांची संख्याही वाढवण्यात आली आहे.

# गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.० मुळे राज्यात जलसाठा क्षमतेत वाढ



**मुंबई**- राज्यातील जलसुरक्षा बळकट करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार उपक्रमाला राज्यभरात प्रचंड प्रतिसाद मिळत असून या योजनेमुळे हजारो जलसाठ्यांची क्षमता वाढली आहे. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.० अंतर्गत मोठ्या प्रमाणावर गाळ उपसा करून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत आहे.

राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील सुमारे ३,२६८ जलसाठ्यांमधून आतापर्यंत ७.७३ कोटी घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ७७ लाख पाण्याच्या टँकर इतकी जलसाठवण क्षमता पुनर्संचयित झाली असून ११ हजार ५८३ गावांतील सुमारे १ कोटी ३९ लाख नागरिकांना त्याचा लाभ झाला आहे. सुमारे ६९ हजार शेतकऱ्यांनी गाळ आपल्या शेतात नेला, त्यापैकी ९१ टक्के शेतकरी वंचित घटकांतील आहेत.२०२५-२६ या आर्थिक वर्षात योजनेला अधिक गती मिळाली असून १,३९८ जलसाठ्यांमधून २.६९ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. यामुळे जवळपास २६ हजार शेतकऱ्यांना फायदा झाला. भंडारा आणि जळगाव जिल्ह्यांत अनुक्रमे ३२ लाख आणि १६ लाख घनमीटर गाळ मंजूर करण्यात आला असून मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ३०० टक्के वाढ झाली आहे.

तसेच गोंदिया आणि गडचिरोलीसारख्या आदिवासी जिल्ह्यांतही योजनेच्या कामांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यभरातील ४०० पेक्षा अधिक स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती आणि स्थानिक समुदायाच्या सहभागातून ही योजना राबविण्यात येत असून जलसाठे पुनरुज्जीवित करण्यास मदत होत आहे.

राज्यातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने जलसाठा वाढविणे आणि भूजल पुनर्भरण मजबूत करण्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.

संभाव्य एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसुरक्षा बळकट करण्यासाठी या उपक्रमाची अंमलबजावणी शासनाकडून पुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे.

## कार चालकाला डुलकी लागली अन् घात झाला

# उज्जैन दर्शनावरुन परतताना नागपूरच्या मामा-भाच्याचा दुर्दैवी अंत



**नागपूर**- उज्जैन येथे देवदर्शनासाठी गेलेल्या भाविकांच्या कारचा मध्य प्रदेशातील ढाकना गावाजवळ भीषण अपघात होऊन कामठी आणि नागपूरातील मामा-भाच्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. या अपघातात अन्य दोघेजण गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे कामठी आणि नागपूर परिसरात शोककळा पसरली आहे. मृतांमध्ये शुभम जयस्वाल (२८, रा. रनाळा, कामठी) याचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर त्याचा मामा पारस कनोजिया (३५, रा. मानकापूर, नागपूर) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातात अमन जयस्वाल (२६) आणि जतिन कनोजिया (३४) हे दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी भोपाळ येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमन, जतिन, पारस आणि शुभम हे चौघेजण उज्जैनजवळील नलखेडा परिसरातील बगलामुखी मंदिराचे दर्शन घेऊन नागपूरकडे परतत होते. गुरुवारी सकाळी बैतूल आणि हरदा जिल्ह्यांच्या सीमेवरील ढाकना गावाजवळील हरई परिसरात त्यांच्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्यावर पलटी झाले.

# राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याकरीता मुदतवाढ

**मुंबई**-माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका मागविण्याचा अंतिम १५ मार्च, २०२६ असा होता. सदर पुरस्कारांसाठी प्रवेशिका मागविण्याकरीता ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील स्पर्धकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. तसेच अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही आहेत.

# खरात प्रकरण एपस्टीन फाईल्सपेक्षाही भयंकर

## खासदार संजय राऊत यांची टीका



मुंबई-अशोक खरातचे प्रकरण हे एपस्टीन फाईल्सपेक्षा भयंकर आहे. मुख्यमंत्री कान, तोंड, डोळे बंद करून बसले आहेत. या भोंदूबाबाकडे कोण जात होतं, अघोरी कृत्य कोण करत होतं, ते मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या गुप्तचर यंत्रणेकडून जाणून घ्यावं, असे शिवसेना नेते-खासदार संजय राऊत म्हणाले.

महाराष्ट्राने अंधश्रद्धा निर्मूलन कायदा मंजूर केला आहे. मग असे असतानासुद्धा शासनातील मोठ्या पदावरील बसलेल्या व्यक्ती मग त्यात महिला आयोगाच्या अध्यक्षा असू देत किंवा मंत्री, आमदार हे सगळे अंधश्रद्धेने त्या बाबाची पूजा करत आहेत. कोणी जादूटोण्याला बसले आहे, त्यांच्यासोबत ज्यांची ज्यांची छायाचित्रे आली आहेत, त्यांच्यावर देवेंद्र फडणवीस यांनी अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याप्रमाणे गुन्हे दाखल केले पाहिजेत, अशी मागणी संजय राऊत यांनी केली.

महिला आयोगाच्या अध्यक्षांचे काम काय आहे की महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर आवाज उठवणे, अशा गुन्हेगारांवर कारवाई करणे. मंत्री, नेते जर अशा लोकांच्या पायाजवळ बसत असतील तर महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि मंत्र्यांना देवेंद्र फडणवीस पदावर का ठेवतात? ज्यांचे संबंध तिथे उघड होत आहेत त्यांना पदावरून दूर केले पाहिजे. सत्तेत टिकण्यासाठी मंत्रीच असे करणार असतील तर गृह मंत्रालयाने यांना बडतर्फ करायला हवे, असे संजय राऊत म्हणाले.

# सुनेत्रा काकी, जय आणि पार्थने काळजी घ्यावी

## अशोक खरातप्रकरणी रोहित पवारांची पोस्ट चर्चेत



**नाशिक**-भोंदूगिरी करून महिलांचं लैंगिक शोषण करणाऱ्या अशोक खरात या स्वयंघोषित बाबाला पोलिसांनी अटक केली असून त्याला २४ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर अडचणीत आलेल्या असताना दुसरीकडे अजित पवार विमान अपघात प्रकरणीही या भोंदूबाबाचं नाव आता जोडलं जात आहे. आमदार रोहित पवार यांनीही याबाबत एक्स पोस्ट केली आहे.अशोक खरातचे व्हिसीआरच्या मालकाबरोबरच हितसंबंध उघड झाल्याचे सांगून अमोल मिटकरींनी या भोंदू बाबाचे आणि आश्रमातील पुजाऱ्यांचे सीडीआर तपासण्याची मागणी केली आहे. जेणेकरून अजित पवारांचा घात कसा झाला याची माहिती मिळेल असं अमोल मिटकरी म्हणाले. त्यांची हीच पोस्ट रिट्विट करत रोहित पवारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. 'पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रात भोंदुगिरीला स्थानही नाही आणि त्यावर कोणाचा विश्वासही नाही, परंतु आमदार अमोल मिटकरी म्हणत असल्याप्रमाणे अजितदादांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थानाच्या बाहेर केलेला जादूटोणा तसेच देवगिरी बंगल्याबाहेर नाशिकच्या भोंदूबाबाबाच्या माध्यमातून जादूटोणा झाल्याची समोर येत असलेली माहिती बघता हे प्रकरण खूपच भयंकर दिसते', असं रोहित पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले, 'नाशिकच्या भोंदूबाबाने हा जादूटोणा केला तर मग या भोंदुबाबाबाला भोंदुगिरीची सुपारी देणारे राजकीय राक्षस कोण? याचा तपास होणे गरजेचे आहे. सुनेत्राकाकी, पार्थ आणि जय यांनी काळजी घ्यावी, राजकारण चांगलं राहिलेलं नाही', रोहित पवार म्हणाले.

# विमान कंपन्यांवर इंधन संकटाची टांगती तलवार



**नवी दिल्ली**-मध्यपूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक हवाई वाहतूक क्षेत्रावर मोठं संकट घोंगावत असल्याचं चित्र आहे. जेट इंधनाच्या संभाव्य तुटवड्याची भीती वाढल्यामुळे जगभरातील एअरलाईन्सनी आता आपत्कालीन योजना तयार करण्यास सुरुवात केली आहे.

एअरलाईन कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते, पुढील काही आठवड्यांत इंधनाची उपलब्धता कमी होऊ शकते, अशी भीती आहे. विशेष म्हणजे, अनेक इंधन पुरवठादार पुढील एका महिन्याच्या पुरवठ्याबाबत स्पष्ट आश्वासन देण्यास तयार नाहीत. त्यामुळे एअरलाईन्सना पुढील नियोजन करताना मोठ्या अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे.

ऊर्जा बाजारातील तज्ज्ञांच्या मते, काही भागांमध्ये जेट इंधनाची कमतरता आहे. अनेक देशांकडे साठा असला तरी विमानांना प्रवासाच्या ठिकाणी इंधन भरणे आवश्यक असते आणि तेवढे इंधन एकाच वेळी वाहून नेणे शक्य नसते. त्यामुळे पुरवठा साखळीतील अडथळ्यांचा थेट परिणाम उड्डाणांवर होऊ शकतो.भारतामध्येही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. हरी मारार यांनी सांगितले की, बेंगळुरू विमानतळावर सध्या सुमारे २५ दिवसांचा इंधन साठा उपलब्ध आहे. त्यामुळे चिंता नसली तरी वाढत्या किमतींचा परिणाम एअरलाईन्सवर होणार आहे.

युरोप आणि ऑस्ट्रेलियासारख्या प्रदेशांना या संकटाचा अधिक फटका बसण्याची शक्यता आहे, कारण या भागांमध्ये स्थानिक रिफायनिंग क्षमता कमी आहे आणि ते मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहेत. याशिवाय चीन आणि दक्षिण कोरियासारख्या देशांनी इंधन निर्यात मर्यादित करण्याचे पाऊल उचलल्यामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे.जेट इंधनाच्या तुटवड्याची भीती आणि वाढत्या किमती यामुळे जागतिक विमान वाहतूक क्षेत्र एका नव्या संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. पुढील काही आठवडे या उद्योगासाठी अत्यंत निर्णायक असणार आहेत.

# आरटीई अंतर्गत खासगी शाळांना २,९३० कोटींची थकबाकी

## निधीअभावी अडचण, पण प्रवेशावर परिणाम होणार नसल्याचे सरकारचे स्पष्टीकरण

**मुंबई**-राज्य सरकारकडून आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश देणाऱ्या खासगी, अनुदानविरहित शाळांना गेल्या दहा वर्षांत तब्बल २,९३० कोटी रुपयांची फी परतफेड थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. ही रक्कम आरटीई कायद्यांतर्गत २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या शुल्क परतफेडीची आहे.

आरटीईनुसार खासगी, अनुदानविरहित शाळांमध्ये २५ टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात येतात. शालेय शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, सरकार प्रति विद्यार्थी १७,६७० रुपये खर्च करते.ही थकबाकी राज्य विधान परिषदेत बुधवारी उघड झाली. अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरात निधीअभावामुळे ही थकबाकी निर्माण झाल्याचे मान्य केले. मात्र, या थकबाकीमुळे कोणत्याही पात्र विद्यार्थ्याचा प्रवेश नाकारला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.




आरटीईनुसार फी परतफेडीच्या रकमेत ६० टक्के वाटा केंद्र सरकारचा आणि ४० टक्के राज्य सरकारचा असतो. भुसे यांनी सांगितले की, २०२५-२६ अखेरपर्यंत २५ टक्के प्रवेश देणाऱ्या शाळांना एकूण १,७२७ कोटी रुपयांची फी परतफेड करण्यात आली आहे. मात्र, दरवर्षी थकबाकी वाढत असल्याने सध्या २,९३० कोटी रुपयांची रक्कम प्रलंबित आहे.२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी आरटीई अंतर्गत फी परतफेडीसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी आतापर्यंत १४० कोटी रुपये वितरित करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

ही थकबाकी केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळणाऱ्या मर्यादित निधीमुळे वाढल्याचे भुसे यांनी सांगितले. यावर तोडगा काढण्यासाठी राज्याच्या वित्त व नियोजन विभागाशी चर्चा केली जाणार असून हा विषय मुख्यमंत्र्यांसमोरही मांडला जाणार आहे, असे त्यांनी नमूद केले. राज्यात सध्या सुमारे ८,६९९ शाळा आरटीई प्रवेश प्रक्रियेत नोंदणीकृत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ०.११ दशलक्ष (सुमारे १.१ लाख) जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या कोट्यातील प्रवेशासाठी आतापर्यंत ०.२२ दशलक्ष (सुमारे २.२ लाख) अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत २५ मार्चपर्यंत वाढवण्यात आल्याची माहितीही भुसे यांनी दिली.

इस्त्रायल विरुद्ध इराण युद्धाने जगाला घेरले असून, गेल्या अठरा दिवसांपासून सुरू असलेल्या युद्धात इराणचे १४०० लोक मृत्युमुखी पडले, तर इस्त्रायलचे १५ आणि लेबनॉनमधील ८०० लोक मरण पावले. युद्ध जूनपर्यंत लांबल्यास लाखो लोकांना भुकेच्या संकटाचा सामना करावा लागेल, असा इशारा 'वर्ल्ड फूड प्रोग्रॅम'ने दिला आहे. ही भीषण लढाई सुरू असतानाच पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील संघर्ष वाढतच चालला आहे. दहशतवाद पोसणारे हे दोन्ही देश एकमेकांची डोकी फोडत आहेत. इस्लामी देशांची एकजूट उभारण्याचे प्रयत्न आजवर अनेकदा झाले असले, तरी ते फोल ठरले. त्यांच्यात शिया-सुन्नी वाद आहेच आणि याखेरीज अनेक गट-उपगटही आहेत. याच कारणातून आखात आणि आशियातील हे देश एकमेकांच्या विरोधात उभे राहिले आहेत. यापैकी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान हे दोन्ही देश धार्मिक राष्ट्रवादावर उभे राहिले असले, तरी धर्माधिष्ठित राज्य कधीही शांतता व प्रगती देऊ शकत नाही. आता ही दोन्ही धर्मवादी राष्ट्रे एकमेकांविरुद्ध रणभूमीवर उभी आहेत.पाकिस्तानने सोमवारी रात्री अफगाणिस्तानात काबूलवर हवाई हल्ले करून तेथील अनेक पायाभूत सुविधा उद्ध्वस्त केल्या. व्यसनमुक्ती पुनर्वसन रुग्णालयावर केलेल्या बॉम्बहल्ल्यात ४०० जणांचा मृत्यू झाला. युद्धामध्येदेखील नागरी वस्त्यांवर किंवा धर्मादाय संस्थांवर हल्ले केले जात नाहीत. व्यसनमुक्ती पुनर्वसनाचे काम हे समाजपरिवर्तनाचे असून त्यालाच लक्ष्य करून आपण किती नीच पातळीवर जाऊ शकतो, हे या देशाने दाखवून दिले. आता हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात येईल, असा इशारा अफगाणिस्तानने दिला आहे; मात्र दहशतवादी तळांनाच लक्ष्य केल्याचे पाकने म्हटले आहे. रमजान महिन्यात अफगाणिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्याबद्दल संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत भारताने पाकचा तीव शब्दांत निषेध केला. रास्तपणे ही खणखणीत भूमिका घेतली असून, पाक हे कसे दहशतवादी राष्ट्र आहे, हेच जगापुढे पुन्हा आणले. पाकने नेहमीच भारतावर खोटे व तथ्यहीन आरोप केल्याचेही म्हणत हा खोटारडेपणा चव्हाट्यावर आणला. पाक आणि अफगाणिस्तान हे दोन्ही देश दहशतवाद्यांचे अड्डे म्हणून ओळखले जातात. युरोप व अमेरिकेतील अनेक अतिरेकी हल्ल्यांमध्ये या दोन देशांतील सत्ताधाऱ्यांचा आणि अतिरेकी संघटनांचा हात होता. अफगाणिस्तानातील

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पाकिस्तानची गुर्मी

तालिबानी राजवट निर्घृण असून, एकेकाळी जगभर दहशतवादी कारवाया करणारे तालिबानी आता सत्तेवर आहेत. या दोन देशांतील संघर्ष नवीन नाही. तो ऐतिहासिक, राजकीय आणि सुरक्षेच्या कारणांनी सतत पेटत राहिला. १८९३ मध्ये आखलेली ड्यूरंड रेषा अफगाणिस्तान मान्य करत नाही. या सीमेमुळे पश्तून लोक दोन देशांत विभागले गेले. त्यामुळे संघर्ष सतत धुमसत राहिला. या दोन्ही देशांत अल्पसंख्याकांवर हल्ले केले जात आहेत आणि स्त्रियांच्या लेखी गुलामीचे जिणे आले. अफगाणिस्तानातून १९८० च्या दशकात रशियन फौजांना हाकलून लावण्याच्या मोहिमेत पाक व अफगाणिस्तान हे दोन्ही देश एकत्र आले होते. तालिबान्यांचे अस्तित्व या दोन्ही देशांत असून, अन्य देशांमध्ये घुसून दहशतवादी कारवाया करणाऱ्या या उभय देशांनाच आता दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. मध्यंतरी काबूल, कंदाहार आणि पक्तिया या ठिकाणी केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये अफगाणिस्तानच्या १३३ तालिबानी सैनिकांना कंठस्नान घातल्याचा दावा पाकने केला होता, तर प्रत्युत्तरादाखल अफगाणिस्तानने केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानच्या ५५ सैनिकांना ठार मारल्याचा दावा करण्यात आला. 'आमचे हे उघड उघड युद्ध सुरू झाले आहे, असे आम्ही मानतो', असे उद्गार पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी काढले होते. अफगाणविरूद्ध 'ऑपरेशन गजब लिल हक' सुरू केल्याची घोषणाही केली. पाकने या हल्ल्यात २७ लष्करी चौक्या उडवल्या.

प्रत्युत्तरात अफगाण लष्कराने ड्युरंड सीमेवरील पक्तिया, खोस्त, नांगरहार आणि नुरीस्तान या भागांजवळच्या पाक चौक्यांवर तुफानी हल्ले केले. त्यानंतर पाकने युद्धाची घोषणा करत अफगाणिस्तानवर हवाई हल्ले केले.मुळात पाकिस्तान हा दहशतवादी व दिवाळखोर देश अतिरेकी कारवायांमुळे स्वतःच घेरलेला आहे. अफगाणी तालिबान्यांपासून वाचवण्यासाठी अमेरिकेने मदत करावी, ही पाकची इच्छा असून, तीही पूर्ण होत नाही. अफगाणिस्तानमधील तालिबानी राजवटीने 'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान'ला (टीटीपी) वेसण घालावी, ही पाक सरकारची प्रमुख मागणी आहे. २००७ पासून पाकिस्तानमध्ये 'टीटीपी'ने घुसखोरी करून धुमाकूळ घातला. या संघटनेस अफगाण तालिबान्यांचा पाठिंबा आहे आणि त्यांना धडा शिकवण्याच्या दृष्टीने अफगाण सरकार काहीएक करत नाही, ही पाकची तक्रार आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, अफगाण तालिबान्यांना भारताचे समर्थन आहे, असा निराधार आरोप पाकिस्तानने केला आहे. खरे तर, भारत आणि अफगाणिस्तान यांचे संबंध सुधारत असल्यामुळे पाकची पोटदुखी वाढली आहे. पाकिस्तान सरकार उलथवून टाकून तेथे इस्लामी खिलाफत राजवट प्रस्थापित करणे, हे टीटीपीचे उद्दिष्ट आहे. ज्यावेळी भारतात अतिरेकी पाठवून अक्षरधाम मंदिर, संसद तसेच पहलगामसारखे हल्ले घडवून आणले जात होते, तेव्हा पाकिस्तानला त्याची लाजही वाटत नव्हती. गेल्या काही वर्षांत पाकमध्ये दहशतवाद्यांचा नंगानाच सुरू झाल्यानंतर तेथील सरकारचे डोळे उघडले. वास्तविक, पाच वर्षांपूर्वी अफगाणिस्तानात तालिबानी राजवट पुन्हा प्रस्थापित झाली, तेव्हा पाकने तिचे स्वागत केले होते. त्यानंतर 'टीटीपी'ने सीमेलगतच्या खैबरपख्तुनख्वा विभागात बॉम्बहल्ले करण्यास सुरुवात केली. गेल्या ऑक्टोबरात याच मुद्द्यावरून दोन्ही देशांत संघर्ष निर्माण झाला, तेव्हा कतार व तुर्कस्तानने दोहा येथे दोघांमध्ये मध्यस्थीसाठी बोलणी सुरू केली; मात्र त्यास कोणतेही यश आले नाही. अमेरिका व आखाती देश इराणविरुद्धच्या युद्धात गुंतले असून, पाकिस्तान-अफगाण संघर्ष मिटवणे, हा त्यांचा प्राधान्यक्रम नाही. या स्थितीचे साधे भानही पाकच्या नेतृत्वाला नाही. जगात आपल्याला कोणतीही किंमत राहिलेली नाही, हे माहीत असूनही पाकिस्तान आगीतून फुफाट्यात चालला आहे.

# 'नेट-झिरो' आणि डिजिटल क्रांतीचे योगदान

**वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण प्रचंड वाढल्याने पृथ्वीचे तापमान झपाट्याने वाढत असून हवामानातील अस्थिरता, नैसर्गिक आपत्ती, समुद्रपातळीत वाढ आदी समस्या तीव्र होत आहेत. या पार्श्वभूमीवर 'नेट-झिरो' ध्येयासाठी आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक पातळीवर मोठ्या परिवर्तनाची आवश्यकता आहे...**

'नेट-झिरो' म्हणजे वातावरणात सोडल्या जाणाऱ्या हरितगृह वायूंचे प्रमाण आणि ते शोषून घेण्याचे प्रमाण यामध्ये संतुलन साधणे, म्हणजेच जितके उत्सर्जन होते, तितकेच कार्बन शोषून घेण्याची व्यवस्था निर्माण करणे. यासाठी दोन मार्ग महत्त्वाचे मानले जातात. पहिला म्हणजे कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी करणे आणि दुसरा म्हणजे जंगलवाड, कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान किंवा इतर नैसर्गिक प्रक्रियांद्वारे उत्सर्जित कार्बन शोषून घेणे. या संकल्पनेला जागतिक स्तरावर मान्यता मिळण्यामागे पॅरिस हवामान करार हा महत्त्वाचा टप्पा ठरला. २०१५ मध्ये झालेल्या या करारानुसार जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसच्या मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. ते साध्य करण्यासाठी शतकाच्या मध्यापर्यंत जगाने 'नेट-झिरो' उत्सर्जन गाठणे आवश्यक असल्याचे वैज्ञानिकांनी स्पष्ट केले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हवामानबदलाचे परिणाम जगभरात स्पष्टपणे दिसू लागले आहेत.

युरोपमध्ये उष्णतेच्या लाटा, अमेरिकेत चक्रीवादळे, आफ्रिकेत दुष्काळ, आशियामध्ये पूर आणि जंगलातील आगी यासारख्या घटनांनी हवामानबदलाचे भीषण रूप उघड केले आहे. समुद्रपातळी वाढल्यामुळे किनाऱ्यावरील काही राष्ट्रांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कृषी उत्पादनावरही हवामानबदलाचा मोठा परिणाम होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर येत्या काही दशकांमध्ये जगासमोर अन्नटंचाई, पाण्याची कमतरता आणि पर्यावरणीय स्थलांतर यांसारखी गंभीर संकटे उभी राहू शकतात. त्यामुळेच 'नेट-झिरो' चे ध्येय आता पर्यावरणीय प्रश्नापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते आर्थिक आणि सामाजिक स्थैर्यांशीही थेट जोडले गेले आहे.

इले. वाहनांच्या वापराला प्रोत्साहन

नेट झिरोच्या प्रवासात विकसित देशांची भूमिका निर्णायक मानली जाते. कारण औद्योगिक क्रांतीपासून आजपर्यंतच्या एकूण कार्बन उत्सर्जनात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे, अमेरिका, युरोपीय महासंघ, जपान आणि कॅनडा यांच्यासारख्या देशांनी २०५० पर्यंत'नेट झिरो साध्य करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. युरोपीय महासंघाने हरित ऊर्जा, स्वच्छ वाहतूक आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक सुरू केली आहे. 'ग्रीन डील' धोरणांतर्गत उद्योग, शेती आणि शहरी विकासात मोठे बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अमेरिकेतही अक्षय ऊर्जेच्या विस्ताराला चालना देणारी धोरणे राबवली जात आहेत. सौर आणि पवन ऊर्जेच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक वाढत असून इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे; मात्र विकसित देशांवर अजूनही टीका होत असते, की त्यांनी ऐतिहासिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर उत्सर्जन केले असूनही विकसनशील देशांना आवश्यक तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरेशी दिलेली नाही. विकसनशील देशांसाठी 'नेट-झिरो'चा प्रवास अधिक गुंतागुंतीचा आहे. कारण या देशांमध्ये आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती आणि गरिबी निर्मूलन या प्राथमिक गरजा अजूनही महत्त्वाच्या आहेत. उद्योग, ऊर्जा आणि वाहतूक क्षेत्राचा विस्तार करताना उत्सर्जन कमी ठेवणे हे मोठे आव्हान आहे. भारत, चीन, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांनीही 'नेट-झिरो'ची उद्दिष्टे जाहीर केली आहेत.




### नेट झिरोचे लक्ष्य

चीनने २०६० पर्यंत नेट-झिरो' साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे, तर भारताने २०७० पर्यंत 'नेट-झिरो' गाठण्याची घोषणा केली आहे. या देशांनी अक्षय ऊर्जेचा विस्तार, ऊर्जा कार्यक्षमता आणि हरित तंत्रज्ञानाचा वापर यावर भर दिला आहे; परंतु या परिवर्तनासाठी प्रचंड गुंतवणूक आवश्यक आहे. त्यामुळे विकसनशील देश वारंवार सांगतात, की विकसित देशांनी हवामान वित्तपुरवठा आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यामध्ये अधिक उदार भूमिका घ्यावी. जागतिक कार्बन उत्सर्जनात सर्वाधिक वाटा ऊर्जा क्षेत्राचा आहे. कोळसा, तेल आणि वायू यासारख्या जीवाश्म इंधनांवर आधारित ऊर्जा प्रणालीमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणाबर कार्बन सोडला जातो. त्यामुळे 'नेट झिरो'च्या दिशेने वाटचाल करताना ऊर्जा संक्रमण अत्यंत महत्त्वाचे ठरते. सौर, पवन, जलविद्युत आणि हरित हायड्रोजन यासारख्या अक्षय ऊर्जेच्या स्रोतांना प्रोत्साहन देणे, हा या संक्रमणाचा मुख्य भाग आहे. अनेक देशांमध्ये सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प वेगाने वाढत आहेत. ऊर्जा साठवण तंत्रज्ञान, 'स्मार्ट ग्रीड' आणि डिजिटल व्यवस्थापन यामुळे ऊर्जा प्रणाली अधिक कार्यक्षम आणि स्थिर बनत आहे. भारतासारख्या देशांमध्ये सौरऊर्जेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. मोठ्या सौर पार्क प्रकल्पांमुळे आणि घरगुती सौर प्रणालीमुळे ऊर्जा क्षेत्रात नवे परिवर्तन घडत आहे. ऊर्जा क्षेत्राबरोबरच स्टील, सिमेंट, रसायन आणि वाहतूक यासारख्या क्षेत्रांमध्ये उत्सर्जन कमी कमी करणे कठीण मानले जाते. या उद्योगांमध्ये उच्च तापमान प्रक्रिया आणि जीवाश्म इंधनांवर आधारित उत्पादन पद्धती वापरल्या जातात. या क्षेत्रांमध्ये कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान यांचा वापर वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### उद्योगांचा नवकल्पनांवर भर

आज अनेक उद्योग आपली उत्पादन प्रक्रिया अधिक स्वच्छ करण्यासाठी संशोधन आणि नवकल्पनांवर भर देत आहेत. 'नेट-झिरो'च्या प्रवासात तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. डिजिटलायझेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज' आणि डेटा विश्लेषण यासारख्या साधनांमुळे ऊर्जा वापर अधिक कार्यक्षम बनवणे शक्य होत आहे. स्मार्ट ग्रीड, स्वयंचलित इमारती आणि डिजिटल मॉनिटरिंग प्रणालीमुळे उत्सर्जन कमी करण्यास मदत मिळते तसेच कार्बन कॅप्चर आणि स्टोरेज, हरित हायड्रोजन उत्पादन आणि प्रगत बॅटरी तंत्रज्ञान यासारख्या नव्या तांत्रिक उपाययोजना भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, 'नेट झिरो' हा केवळ पर्यावरण संरक्षणाचा कार्यक्रम नाही, तर तो हरित अर्थव्यवस्थेचा नवा मार्गही आहे. अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जाकार्यक्षमइमारती आणि हरित उद्योग यामुळे लाखो नवे रोजगार निर्माण होऊ शकतात. अनेक देश या परिवर्तनाकडे आर्थिक विकासाची संधी म्हणून पाहत आहेत. हरित तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढल्यामुळे उद्योग आणि संशोधन क्षेत्राला नवे प्रोत्साहन मिळत आहे.'नेट-झिरो' हा प्रश्न जागतिक स्वरूपाचा असल्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य अत्यावश्यक आहे. हवामान वित्तपुरवठा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि सामायिक संशोधन यामुळेच जागतिक स्तरावर परिणामकारक बदल घडू शकतो. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदांमध्ये या विषयावर सातत्याने चर्चा होत आहे; मात्र अनेक वेळा विकसित आणि विकसनशील देशांमधील मतभेदामुळे निर्णय प्रक्रियेत अडथळे येतात.

### भारत वेगवान अर्थव्यवस्था

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. त्यामुळे ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत, तरीही भारताने अक्षय ऊर्जेच्या विस्तारावर भर देत हरित विकासाचा मार्ग स्वीकारला आहे.

सौर ऊर्जा प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहने, हरित हायड्रोजन मिशन आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या योजना यामुळे भारत 'नेट-झिरो'च्या दिशेने महत्त्वाची पावले उचलत आहे. त्याचबरोबर भारताने जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय सौर आघाडीसारख्या उपक्रमांद्वारे सहकार्यालाही चालना दिली आहे. 'नेट-झिरो'च्या प्रवासात अजून अनेक अडथळे आहेत. अक्षय ऊर्जा प्रकल्पांसाठी जमीन, गुंतवणूक आणि तांत्रिक क्षमता यासारख्या समस्या अनेक देशांसमोर आहेत तसेच ऊर्जा संक्रमणामुळे पारंपरिक उद्योगांमध्ये रोजगाराचे स्वरूप बदलण्याची शक्यता आहे. याशिवाय हवामान वित्तपुरवठ्याच्या प्रश्नावर विकसित आणि विकसनशील देशांमध्ये मतभेद कायम आहेत. त्यामुळे जागतिक सहकार्य अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर 'नेट-झिरो' उत्सर्जनाकडे वाटचाल हा केवळ पर्यावरणीय कार्यक्रम नाही, तर मानवजातीच्या भविष्याशी निगडित असलेले ऐतिहासिक परिवर्तन आहे. हवामानबदलाचे संकट टाळण्यासाठी आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारण्यासाठी हा बदल अपरिहार्य ठरतो. ऊर्जा संक्रमण, तांत्रिक नवकल्पना, धोरणात्मक सहकार्य आणि आर्थिक गुंतवणूक यांच्या सहाय्यानेच हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.


जगातील सर्व देशांनी एकत्रितपणे प्रयत्न केले, तरच पृथ्वीचे पर्यावरण संतुलित राखणे शक्य होईल. 'नेट-झिरो' च्या दिशेने सुरू झालेली ही जागतिक वाटचाल अजूनही दीर्घ आणि आव्हानात्मक आहे; परंतु शाश्वत भविष्याची आशा जिवंत ठेवणारा हा एकमेव मार्ग असल्याचे आज सर्वांनाच मान्य करावे लागेल.

**प्रा. जयसिंग यादव**

# नियोजन आणि दूरदृष्टी

काल टीव्हीवर दोन बातम्या पाहिल्या..आणि त्या पाहताना मन एक भाविक म्हणून खूप अंतर्मुख झाले.एकीकडे अफाट उत्पन्न असलेल्या शिर्डी संस्थानाने गॅस टंचाईचे कारण देत भक्तांना मिळणाऱ्या लाडू प्रसादात कपात केल्याची बातमी दिसली.तर दुसरीकडे त्याच परिस्थितीत सौर ऊर्जेच्या साहाय्याने कोणतीही कपात न करता पूर्वीइतकाच महाप्रसाद देणारे शेगाव संस्थान.ही केवळ दोन देवस्थानांची तुलना नाही.. तर 'नियत आणि नियोजन' यातील फरक अधोरेखित करणारे उदाहरण आहे.





थोडे आकडेही पाहिले तर विचार अधिक गंभीर होतो. शिर्डी संस्थानचे वार्षिक उत्पन्न साधारण ९०० कोटी रुपयांच्या आसपास आहे. तर शेगाव संस्थानचे उत्पन्न केवळ १५० कोटी रुपयांच्या आसपास आहे. म्हणजे उत्पन्नाच्या बाबतीत शिर्डी शेगावपेक्षा अनेक पटीने मोठे आहे. तरीही भक्तसेवा, सुविधा, पारदर्शकता आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत अनेक भाविकांना शेगावचा अनुभव अधिक समाधानकारक वाटतो.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे देवस्थानाचे उत्पन्न किती आहे यापेक्षा ते चालवणारे संचालक मंडळ कसे आहे, त्यांची नीयत काय आहे आणि त्यांचे नियोजन किती दूरदृष्टीचे आहे यावर सर्व काही अवलंबून असते.व्यवस्थापनातील प्रत्यक्ष फरक पाहिला तर तो आणखी स्पष्ट दिसतो.शेगावचे अत्याधुनिक पार्किंग पाहिले की कोणीही आश्चर्यचकित होईल.. मुंबई-दिल्लीसारख्या महानगरांतही क्वचितच दिसेल अशी व्यवस्था तिथे आहे.एकमेकांच्या विरुद्ध २५ पार्किंग लेन, कुठल्या लेनमध्ये जागा रिकामी आहे हे सांगणारे डिजिटल डिस्प्ले, आणि येण्या-जाण्याचे स्वतंत्र मार्ग ही संपूर्ण व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध आणि पूर्णपणे मोफत आहे.

याउलट शिर्डीत अनेक ठिकाणी खाजगी पार्किंगवाले एका तासाचे २०० रुपये किंवा त्याहून अधिक पैसे घेताना दिसतात. श्रद्धेने आलेल्या भाविकांकडून अशा प्रकारे पैसे उकळले जातात, हे खरोखरच विचार करायला लावणारे आहे.मोफत सेवांचे मॉडेल हा शेगाव संस्थानचा आणखी एक आदर्श आहे. रेल्वे स्टेशन आणि बस स्थानकापासून मंदिरापर्यंत पूर्णपणे मोफत बस सेवा तिथे उपलब्ध आहे. त्यामुळे वृद्ध, महिला आणि दूरवरून आलेले भाविक कोणत्याही त्रासाशिवाय मंदिरात पोहोचू शकतात.

शिर्डीसारख्या अफाट उत्पन्न असलेल्या देवस्थानानेही अशा सेवाभावी योजनांचा विचार करणे अपेक्षित आहे.भक्तनिवास आणि स्वच्छता या बाबतीतही शेगावचा अनुभव वेगळाच असतो. तिथे गेल्यावर जाणवणारी स्वच्छता अनेकांना युरोपियन दर्जाची वाटते. अत्यल्प दरात मिळणाऱ्या स्वच्छ खोल्या, शिस्तबद्ध व्यवस्था आणि कर्मचाऱ्यांची नम्रता ही पंचतारांकित हॉटेललाही लाजवेल अशी असते.याउलट शिर्डीत अनेक वेळा सामान्य भक्तांना निवास मिळवताना अडचणी येतात. कधी राजकीय शिफारसी, कधी ओळखी या गोष्टींमुळे भाविकांचा अनुभव कधी कधी कडू होतो.

सामाजिक शिस्त ही शेगावची आणखी एक मोठी ताकद आहे. मंदिर परिसरात भिकाऱ्यांची गर्दी दिसत नाही, कोणीही भक्तांकडे हट्टाने दान मागत नाही. भाविकांनी दिलेला प्रत्येक पैसा हा अत्यंत पारदर्शक पद्धतीने समाजकार्यासाठी वापरला जातो. शेगाव संस्थानने मेडिकल कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेज, शैक्षणिक संस्था आणि विविध लोकसेवा प्रकल्प उभे केले आहेत.म्हणजेच भक्तांनी दिलेल्या पैशांचा उपयोग केवळ मंदिरापुरता न राहता समाजाच्या उन्नतीसाठीही होताना दिसतो.

देवस्थानाचे संचालन करणाऱ्या मंडळाने हे लक्षात घ्यायला हवे की 'भक्त सेवा हीच खरी ईश्वर सेवा' आहे.जेव्हा संचालक मंडळ निस्वार्थी असते, दूरदृष्टीने काम करते आणि त्यांचे लक्ष केवळ भक्तांच्या सोयीवर असते, तेव्हा गॅस टंचाईसारखी अडचण प्रसादात अडथळा ठरत नाही. उलट त्यावर उपाय शोधले जातात..

जसे शेगावने सौर ऊर्जेचा वापर करून केले.म्हणूनच शेगाव संस्थानचे स्वयंपूर्ण, शिस्तबद्ध आणि पारदर्शक मॉडेल आज भारतातील प्रत्येक मोठ्या देवस्थानासाठी एक आदर्श आहे.

देवस्थानाचे वैभव त्याच्या सोन्या-चांदीत नसते, तर भक्तांना दिलेल्या सन्मानात, सोयींमध्ये आणि व्यवस्थेच्या प्रामाणिकपणात असते.भारतातील सर्व मंदिर व्यवस्थापन समित्यांनी शेगाव संस्थानचा हा आदर्श मनापासून स्वीकारावा.कारण शेवटी मंदिर हे केवळ देवाचे घर नसते, तर ते भक्तांच्या विश्वासाचे केंद्र असते.(साभार-व्हॉट्स ॲप)

# मतपत्रिका मागणे -देणे, 'घटना'च घटनाबाह्य




इतर कोणत्याही निवडणुकीत उमेदवार हा मतदाराला मत मागत असतो. वि. सा. संघात मात्र तो सरळ मतपत्रिकाच मागतो.कारण, येथे लागू असलेली postal ballot पद्धत. तुमचे मत दुसऱ्याने टाकण्याची (proxy vote) विचित्र तरतूद यात आहे. हा तिसरा तमाशा.

तीन : आपण सर्वत्र पाहतो तसे मतदान येथे होत नाही. प्रत्येक मतदाराला मतपत्रिका त्याच्या पत्त्यावर टपालाने (speed post) पाठविली जाते.या मतपत्रिकेवर तीन प्रकारांनी मतदान करता येते. मत नोंदवून मतपत्रिका उलटटपाली नागपूर मुख्य कार्यालयात पाठवणे, स्वत: मुख्यालयात येऊन मतपेटीत मतपत्रिका टाकणे किंवा प्रतिनिधीच्या हाताने मतपत्रिका नागपूरला पाठवणे. यातील तिसरा प्रकारच? सर्वात जास्त 'लोकप्रिय' आहे. उमेदवार किंवा त्यांचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन मतपत्रिकांची 'भीक मागत' त्या गोळा करतात- कधी सहमतीने, कधी ओळखीचा वशिला लावून, कधी बळजबरीने किंवा कधी प्रलोभन दाखवून. यात बहुतांश मतदार कोरी मतपत्रिका देतात किंवा मागणा-याच्या समोरच (त्याच्या सांगण्याप्रमाणे) मतदान करून देतात ! क्वचित बंद पाकीटही देतात. ही काय मतदानाची पद्धत झाली ? मतदारावर दडपण आणणारी ही लोकशाहीविरोधी postal ballot system सर्वच संस्थांमधून ताबडतोब बंद केली पाहिजे. कारण, या पद्धतीमुळे ठिकठिकाणी टोळकी निर्माण झाली असून, त्यांनी संस्था वर्षानुवर्षे बळकावल्या आहेत.

चार : वि. सा. संघाची घटना म्हणजे तर अवघा आनंदीआनंद ! ही घटना पाहून एक ज्येष्ठ वकील म्हणाले- 'बहुतांश तरतुदी बेकायदेशीर, घटनाबाह्य आहेत. सदस्य-जनतेला जेरीस आणणारी आणि सत्ताधा-यांना अमर्याद अधिकार देणारी कलमे यात आहेत.याचा अर्थ 'आम्ही म्हणू ती पूर्व दिशा'! या घटनेत आतापर्यंत चारदा बदल झाले. शेवटची घटना दुरुस्ती अजूनही धर्मादाय आयुक्तांकडे बदल म्हणून नोंदली गेलेली नाही. तरीही यंदाच्या निवडणुका त्याअंतर्गतच झाल्या. आता बोला.

निवडणुकीसाठी लवाद नेमतात. प्रत्येक तक्रार सर्वप्रथम लवादाकडेच करावी लागते. नंतरच पुढे न्यायालयात जाता येते. वि. सा. संघाची कार्यप्रणाली माहीत असलेला एखादा सदस्यच लवाद नेमावा, हे यासंबंधीच्या तरतुदीला अभिप्रेत असताना यंदाचे लवाद ॲड. मल्हार विश्वरूपे 'बाहेरचे' नेमले गेले, असा आरोप यंदा प्रथमच होत आहे. एकूण, वि. सा. संघाचा कारभार असा असंवैधानिक पद्धतीने वर्षानुवर्षे सुरू आहे बघा.

**(क्रमशः)**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# नेरच्या उत्तरवाढोणा येथे रिलायन्सचा बायोगॅस प्रकल्प

## बायोगॅस निर्मितीत जिल्हा होणार आत्मनिर्भर ; शेतकऱ्यांनाही फायदा होणार

## पालकमंत्री ना. संजय राठोड यांचा पुढाकार




**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - नेर तालुक्यातील मौजा उत्तरवाढोणा येथे रिलायन्स इंडस्ट्रिज कंपनीच्या माध्यमातून सुमारे 300 कोटी रुपयांचा कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्हा गॅस निर्मितीत आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने वाटचाल करणार असून शेतकऱ्यांनाही मोठा फायदा होणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी पुढाकार घेतला असून आज त्यांनी या प्रकल्पाचा आढावा घेतला.

या प्रकल्पासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी आढावा बैठक घेवून प्रकल्पाला गती देण्याचे निर्देश दिले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, गटविकास अधिकारी, सरपंच तसेच रिलायन्स कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत शासन व प्रशासनाची भूमिका सकारात्मक असून प्रकल्पासाठी आवश्यक असलेला वीज व पाणी पुरवठा तसेच इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्यात येईल. तसेच ग्रामसभा आयोजित करून स्थानिक ग्रामस्थांना प्रकल्पाची सविस्तर माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करावे, तसेच स्थानिकांना विश्वासात घेऊन समन्वयाने काम करण्याचे निर्देश पालकमंत्री राठोड यांनी दिले.

ठळक वैशिष्ट्ये : इंधन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल या प्रकल्पामुळे जिल्ह्यातच बायोगॅस निर्मिती होणार असून बाहेरील इंधनावरचे अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल.

शेतकऱ्यांना थेट फायदा : शेतीतील कचरा (पेंढा, शेण, ऊसाचा कचरा इ.) वापरून गॅस निर्मिती केली जाणार असल्याने शेतीतील कचऱ्याला चांगला दर मिळेल. मोठ्या प्रमाणावर रोजगार : प्रकल्पामुळे सुमारे २०० थेट तर सुमारे १५०० अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. पर्यावरणपूरक प्रकल्प : कचऱ्याचा पुनर्वापर करून इंधन निर्मिती होणार असल्याने प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

प्रशासनाचे सहकार्य : वीज, पाणी व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन-प्रशासन सहकार्य करण्यात येईल. सध्याच्या जागतिक परिस्थितीत इराण व इस्त्राईल यांच्यासह आखाती देशांमधील तणावामुळे इंधन टंचाई व दरवाढीचे संकट निर्माण होत आहे. अशा पार्श्वभूमीवर कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प हा यवतमाळ जिल्ह्यात पर्यावरणपूरक, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणारा आणि इंधन आत्मनिर्भरतेला चालना देणारा महत्त्वाचा प्रकल्प ठरणार आहे.

## पांढरकवड्यातील विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात चमकदार निवड

पांढरकवडा - येथील विविध शाळांमधील चार विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत नवोदय विद्यालयात प्रवेश मिळवला आहे. कृतिका राजू मडावी, विराज विजयराव मालकापुरे, देव प्रवीण डाफे आणि संबोधी नंदकिशोर ठमके या विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय, घाटंजी (बेलोरा) येथे निवड झाली आहे. या यशामागे पदवीधर सहायक शिक्षक विनोद मारोतराव पाटील यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्यांनी विद्यार्थ्यांना जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षेसाठी ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून विनामूल्य मार्गदर्शन केले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विद्यार्थ्यांनी यश मिळवत परंपरा कायम राखली आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे सभागृह येथे वर्ग घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. चरडे साहेब तसेच समस्त कार्यकारिणी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पूर्व नागपूर मतदारसंघाची धुरा संजय खाडे यांच्याकडे

## अचलपूरमधील उल्लेखनीय कार्याची दखल

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - विधानसभा क्षेत्रातील काँग्रेस नेते व काँग्रेसचे प्रदेश सचिव संजय खाडे यांच्या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर आणखी एक महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.अचलपूर मतदारसंघात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीनंतर आता त्यांची पूर्व नागपूर विधानसभा मतदारसंघाच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वीच त्यांच्याकडे प्रदेश सचिवपदाची जबाबदारी असून, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार आता त्यांना अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात आली आहे.


संजय खाडे हे परिसरात शेतकरी व कामगार नेते म्हणून ओळखले जातात.त्यांनी विविध आंदोलन,मोर्चे आणि जनआंदोलनांच्या माध्यमातून शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. अचलपूर मतदारसंघात त्यांनी ग्रामीण भागात पक्ष संघटन मजबूत करण्यासोबतच जनसंपर्क वाढवण्याचे काम प्रभावीपणे केले. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत पक्षाने त्यांना आता पूर्व नागपूरसारख्या महत्त्वाच्या शहरी मतदारसंघाची जबाबदारी दिली आहे. पूर्व नागपूर हा शहरी आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मतदारसंघ मानला जातो. कधीकाळी हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता.येथे विविध समाज घटक,कामगार वर्ग, व्यापारी आणि युवकांचा मोठा सहभाग आहे. नागपूर शहरातील नागरी प्रश्न,स्थानिक विकासकामे आणि पक्षनिष्ठा या घटकांवर मतदारसंघातील निवडणुकीचे चित्र ठरते. त्यामुळे नागपूर पूर्व हा नागपूरच्या राजकारणात निर्णायक ठरणारा मतदारसंघ मानला जातो.

### पूर्ण ताकदीने काम करणार : संजय खाडे



"पक्षाने माझ्यावर दाखवलेला विश्वास माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. अचलपूरमध्ये केलेल्या कामाच्या बळावर आता पूर्व नागपूरमध्येही पक्ष मजबूत करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करणार आहे.सर्वसामान्य नागरिक, युवक, कामगार व महिलांशी थेट संवाद साधून तसेच स्थानिक पदाधिकारी व नेत्यांशी समन्वय साधून पक्ष संघटनावर भर देणे हेच माझे ध्येय राहील," अशी प्रतिक्रिया संजय खाडे यांनी दिली आहे. संजय खाडे आपल्या निवडीचे श्रेय प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,खा. प्रतिभा धानोरकर व जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांना देतात.खाडे यांच्या नियुक्तीमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून,आगामी काळात पूर्व नागपूरमध्ये पक्ष संघटन अधिक बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चिमुकल्या रूहानची जिद्द , कडक उन्हात पूर्ण केला आयुष्यातील पहिला 'रोजा'



महागाव - मुस्लिम धर्मीयांच्या पवित्र रमजान महिन्याला आता निरोप देण्याची वेळ जवळ आली असून, हा महिना सध्या आपल्या अंतिम टप्प्यात आहे. 'शब-ए-कद्र' या इबादतीच्या रात्रीचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत असतानाच, महागाव येथील एका सात वर्षीय चिमुकल्याने आपल्या श्रध्देने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. रूहान सोयब पारेख असे या बालकाचे नाव असून, त्याने अत्यंत कडक उन्हात आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) यशस्वीरित्या पूर्ण केला. रमजान महिन्यात पहाटेपासून ते सूर्यास्तापर्यंत अन्न-पाण्याविना राहणे हे मोठ्यांसाठीही कठीण असते. मात्र, सात वर्षांच्या रूहानने आपल्या कुटुंबातील सदस्यांना पाहून स्वतःहून उपवास ठेवण्याचा निर्णय घेतला. पालकांनी त्याचे वय लक्षात घेता त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु रूहानच्या ईबादतीपुढं मोठ्यांचं काही चाललं नाही. पहाटे 'सहरी' करून त्याने आपल्या पहिल्या रोझाचा प्रारंभ केला. दिवसभर खेळाची ओढ असतानाही रूहानने न डगमगता आपला संयम पाळला. सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी (इफ्तार) रूहानने आपला पहिला उपवास सोडला. यावेळी त्याचे वडील सोयब पारेख आणि कुटुंबातील इतर सदस्यांनी त्याचे फुलांचा हार घालून आणि मिठाई भरवून कौतुक केले. एका सात वर्षांच्या मुलाने दाखवलेली ही शिस्त आणि धर्माप्रती असलेली निष्ठा पाहून परिसरातील समाजातुन कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# गुढीपाडव्यानिमित्त रामानंद संप्रदायाच्या वतीने महागाव येथे शोभायात्रा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज स्थापित रामानंद संप्रदायाच्या यवतमाळ पश्चिम जिल्ह्याच्या वतीने गुढीपाडवा अर्थात हिंदू नववर्षानिमित्त भव्य दिव्य अशा शोभा यात्रेचे आयोजन महागाव येथे उत्साहात संपन्न झाले. या शोभायात्रेत हजारो अनुयायी सहभागी होत हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा देत विविध सामाजिक विषयावर प्रभावी संदेश देत जनजागृती केली.

यवतमाळ पश्चिम सह महाराष्ट्र गुजरात तेलंगणा व कर्नाटक या राज्यातील विविध जिल्ह्यांमध्येही अशाच प्रकारे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. जगद्गुरुश्रींच्या प्रतिमेचे भव्य दिव्य अशा रथामध्ये पूजन करून शोभायात्रेस सुरुवात झाली.या शोभा यात्रेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ती रस्त्याच्या एका बाजूने एका रेषेत लयबद्ध पद्धतीने भजनाच्या गजरात व ढोल ताशांच्या निनादात अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पुढे सरकत होती. शोभा यात्रेत सहभागी सर्व



भाविकांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून उत्सवाला विशेष रंगत आणली होती. महिला भगिनी मोठ्या संख्येने नटून-थटून सहभागी झाल्या होत्या. कलशधारी महिला, निशानधारी महिला व पुरुष, भजनी मंडळ, लेझीम पथक, राम पंचायतन, विशेष आकर्षण म्हणजे मरणोत्तर देहदानाचा देखावा हे या शोभायात्रेचे आकर्षण ठरले. सर्वप्रथम गुरुमाऊली यांच्या प्रतिमेचे पूजन महागाव नगरपंचायतचे नगरसेवक तथा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे शहराध्यक्ष शैलेश भाऊ कोपरकर यांच्या हस्ते करण्यात आले. रथात यजमान म्हणून सौ. मंगला बंडुराव आंडगे हे जोडपे उपस्थित होते. या शोभायात्रेत सर्व वयोगटातील तरुण तरुणी पुरुष व महिला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. सहभागी सर्व भाविकांच्या सुरक्षितेची सर्व काळजी आयोजकांनी घेतलेली होती. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने रामानंद संप्रदायामार्फत विविध समाज उपयोगी उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. यामध्ये महामार्गावरील ॲम्बुलन्स सेवा, मरणोत्तर देहदान व अवयव दान, गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत CBSC शिक्षण, सर्व जाती धर्मातील मुलींसाठी मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिरे, व्यसनमुक्ती अभियान, आपत्कालीन सेवा, तसेच दुर्बल घटकांचे पुनर्वसन यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे. या सर्व समाज हितकारी कार्यामुळे रामानंद संप्रदायाबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून कौतुक व प्रशंसा व्यक्त होत आहे. या शोभायात्रेत जिल्हा सेवा समिती यवतमाळ पश्चिम मधील जवळजवळ 700 च्या वर भक्तगण उपस्थित होते अशी माहिती जिल्हा निरीक्षक गोविंद उपासे यांनी दिली.

# उमरखेड येथे जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त कार्यक्रम; राष्ट्रीय ग्राहकदिनी मांडलेल्या प्रश्नांवरही चर्चा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड : १९ मार्च रोजी साजरा होणाऱ्या जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त तहसील कार्यालय उमरखेड येथे १७ मार्च रोजी ग्राहक दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. १५ मार्च हा रविवार आल्यामुळे कार्यक्रम मंगळवारी घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुका अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख होते.

यावेळी व्यासपीठावर तहसीलदार राजेश सुरडकर, ग्राहक पंचायतचे कार्याध्यक्ष ॲड. विलासराव देवसरकर, उपाध्यक्ष दत्ता गंगासागर, सचिव रतिराज बोरगडे, कोषाध्यक्ष यशवंत गिरी उपस्थित होते. प्रास्ताविकात ॲड. विलासराव देवसरकर यांनी ग्राहक दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, ग्राहक चळवळ प्रभावी व्हायची असेल तर नागरिक सजग असणे अत्यावश्यक आहे. मात्र नागरिक सजग व जागरूक नसल्यामुळे आज नागरिकांची प्रत्येक ठिकाणी पिळवणूक होताना दिसते त्याचबरोबर प्रशासकीय यंत्रणेकडूनही नागरिकांच्या समस्या वेळेत सोडवल्या जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तहसीलदार राजेश सुरडकर यांनी आपल्या भाषणात ग्राहक दिन केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित न ठेवता नागरिकांच्या तक्रारी प्राधान्याने सोडवण्यावर भर दिला. तसेच दर महिन्याला होणाऱ्या लोकशाही दिनात ग्राहक पंचायत कार्यकारिणीचा समावेश करून सातत्याने नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्याची सूचना त्यांनी केली. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रकाश देशमुख यांनी ग्राहक संरक्षण कायदा २०१९ लागू होऊनही नागरिकांची पिळवणूक सुरूच असल्याची टीका केली. तसेच २४ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने नागरिकांनी मांडलेल्या समस्यांवर अद्याप तोडगा न निघाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. अनेक प्रशासकीय कार्यालयांच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीवरही त्यांनी संताप व्यक्त करत अनुपस्थित कार्यालय प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याची मागणी केली. तसेच तसा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठविण्याची सूचना केली कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून विविध समस्या मांडल्या. यामध्ये गॅस पुरवठा, पेट्रोल-डिझेल दर, पेट्रोल पंपावरील आवश्यक नागरि सुविधा, अपूर्ण रस्त्याचे कामे, पावसाळ्यात निर्माण होणारी गंभीर परिस्थिती, वीज व पाणीपुरवठा, नगरपालिका कर, दूषित पाणी, वाहतूक कोंडी, विद्यार्थ्यांची बस सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी अशा विविध प्रश्नांचा समावेश होता.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**तहसीलदार, झरीजामणी यांचे कार्यालय, झरीजामणी**

क्रमांक/सहा म.अ./प्रस्तु ३/कावी/६९/२०२५ दिनांक २८ फेब्रुवारी २०२५

जाहीरनामा

ज्याअर्थी, सर्व नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, आवेदक परवेज अक्तर अ. वदु रा कळंब ता कळंब जि यवतमाळ यांनी स्वतःचे व इतर सामाईक मालकीचे मौजा पार्डी ता झरीजामणी जि यवतमाळ येथील गट क्र. 75, क्षेत्र 5.64 हे आर आकारणी 4.25 रुपये भो वर्ग 1, 7/12 च्या शेताच्या इतर अधिकारात सा. कु. भिमा भाराजी गोंड या सामान्य कुळाची नोंद आहे. सदर शेतजमिन त्यांच्यात वहिती व ताब्यात आहे. सदर कुळाची नोद हि बेकायदेशीर रित्या असून कमी करण्यास पात्र आहे. तरी सा.कु. भिमा भाराजी गोंड या सामान्य कुळाची नोंद कमी करणेबाबत या कार्यालयास अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, सदर जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन कोणास काही आक्षेप वा हरकत असल्यास त्यांनी 15 दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुरावे तसेच उपलब्ध असलेल्या दस्तऐवजासह आपले आक्षेप दाखल करावे.

याद्वारे पुढे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाला काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रकरणांत एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

**तहसिलदार झरीजामणी**

# "उन्हाळा कडाक्याचा... पण पाणपोई बंद ! नगरपरिषद प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड"

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना पांढरकवडा शहरातील पाणपोई अद्याप सुरू न झाल्याने नागरिकांची तहान भागवण्यासाठी कोण पुढे येणार, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. दरवर्षी शहरात पिण्याच्या पाण्यासाठी पाणपोई सुरू करण्याची व्यवस्था असताना यंदा नगरपरिषदेकडून गंभीर दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

शहरात तसेच ग्रामीण भागातून येणारे शेतकरी, मजूर, प्रवासी व सर्वसामान्य नागरिक यांना उन्हाच्या कडाक्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र अडचण भासत आहे. रस्त्यांवर, बाजारपेठेत किंवा सार्वजनिक ठिकाणी पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिक त्रस्त झाले



आहेत. यासंदर्भात युवा टायगर फोर्स, पांढरकवडा यांनी आक्रमक भूमिका घेत नगरपरिषद प्रशासनावर तीव्र टीका केली आहे. म्हणण्यात आले की, "सर्व सुविधा उपलब्ध असताना देखील केवळ नगरपरिषदेच्या प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे आणि निष्क्रियतेमुळे पाणपोई सुरू झालेल्या नाहीत. नागरिकांना मूलभूत हक्क असलेल्या पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे."

मुख्य अधिकाऱ्यांवर थेट सवाल युवा टायगर फोर्सने नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले आहे की, "उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच नियोजन होणे अपेक्षित असताना मुख्य अधिकारी व प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. ही सरळसरळ प्रशासनाची अपयशी भूमिका आहे." "तात्काळ पाणपोई सुरू करा, अन्यथा आंदोलन!" – इशारा युवा टायगर फोर्सने नगरपरिषदेला थेट इशारा देत सांगितले आहे की, पांढरकवडा शहरातील सर्व पाणपोई तात्काळ सुरू कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर प्रश्नावर नगरपरिषद प्रशासन किती लवकर निर्णय घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## पत्रकारांसाठी 'माईंड हेल्थ' उपक्रमातून मानसोपचार सुविधा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - समाजासाठी आपल्या लेखणीतून झटणाऱ्या पत्रकारांचे मानसिक,भावनिक आरोग्य संतुलित रहावे,यासाठी शहरातील मानसोपचार तज्ज्ञ डॉ.श्रीकांत मेश्राम यांनी पुढाकार घेतला आहे. जागतिक आनंद दिनाच्या पार्श्वभूमीवर शहर व जिल्हाभरातील पत्रकारांसाठी 'माईंड उपक्रमाच्या' माध्यमातून मानसोपचार सुविधा दिली जाणार आहे. यासाठी २२ मार्च रोजी सकाळी ठीक ९ वाजता शिंदे प्लॉट दत्त चौक येथील यवतमाळ माईंड केअर हॉस्पिटलमध्ये आयोजित कार्यक्रमाला पत्रकारांनी उपस्थित रहावे,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनत चालला आहे. या पार्श्वभूमीवर यवतमाळ शहरात मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी 'माईंड हेल्थ कार्ड' हा अभिनव उपक्रम मानसोपचार तज्ज्ञ डॉ.मेश्राम यांच्याकडून राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांचे मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या कार्यक्रमात कुटुंब, नातेसंबंध, मित्रपरिवार आणि कार्यक्षेत्र यामध्ये संतुलन राखताना मानसिक आरोग्य कसे स्थिर ठेवावे,याविषयी डॉक्टरांचे मार्गदर्शन होणार आहे.तेव्हा जागतिक आनंद दिनाच्या औचित्यावर आयोजिलेल्या या छोटेखानी कार्यक्रमाला पत्रकार बांधवांनी सहभागी होऊन आमचा आनंद वाढवावा, असे आवाहन डॉ. श्रीकांत मेश्राम, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट तरुलता श्रीरामे, सायकॉलॉजी इंटर्न अमित कांबळे यांनी केले आहे.



## सात वर्षाच्या सय्यद जोहनचे ३० रोजे पुर्ण

उमरखेड़ - पवित्र रमजान महिन्याची सुरुवात मोठ्या भक्तीभावाने झाली असुन उमरखेड़ येथील सय्यद काशिफ यांचा मुलगा सय्यद जोहन वय साथ आपले 30 रोजे पुर्ण केला आहे. रमजान महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र असुन या महिन्यात पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास ठेवला जातो. नमाज पठण,कुराण वाचन ,दानधर्म आणि गरजुची मदत याला विशेष महत्व असते. सय्यद जोहन हिने श्रद्धेने व उत्साहाने 30 रोजे ठेवत कुटुंबीयासोबत नमाज अदा केली.तिच्या या धार्मिक भावना व चिकाटीचे परिसरात कौतुक होत आहे.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/ /२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०९/०२/२०२६

जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **भगवान गणपत पडघणे रा. पार्डी चु. यांनी त्यांचे वडील गणपत मोहन पडघणे यांचा मृत्यू मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** २०.०६.१९९८ रोजी झालेला आहे. मृत्यू अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **मृत्यूनोंद** आदेश देणेबाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २२/०२/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# वयाच्या १४ व्या वर्षी लेखक गीरीराज मुक्कावारने लिहीले

## "श्रीकृष्ण : जीवनाचा मार्गदर्शक " इंग्रजी व मराठी अनुवादीत आध्यत्मिक पुस्तक

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - इयत्ता 9 वी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असलेला मुळचा ब्राम्हणगाव येथील रहिवासी असलेला गिरीराज लक्ष्मीकांत मुक्कावार याने Shri Krishn - the life Guide हे पुस्तक लिहिले आहे . याची मराठी अनुवादीत आवृत्ती श्रीकृष्ण : जीवनाचा मार्गदर्शक हे दोन्ही पुस्तके नुकतेच प्रकाशित झाली असून वयाच्या 14 व्या वर्षी अध्यात्मिक ज्ञानामृत सेवन करून त्याने लिहीलेल्या इंग्रजी पुस्तकाची मराठीतही अनुवादित आवृती प्रकाशित केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

संस्कार पोद्दार लर्न स्कूल, उमरखेड येथील संस्कार पोद्दार लर्न स्कुल उमरखेड येथे इयत्ता नववीमध्ये शिकत असलेला 14 वर्षीय विद्यार्थी गिरीराज लक्ष्मीकांत मुक्कावार याने अगदी कोवळ्या वयातच साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत Shri Krishn: The Life Guide हे पुस्तक लिहिले आहे. भगवान श्रीकृष्ण यांच्या जीवनातील तत्त्वज्ञान, आदर्श आणि जीवनमार्ग यावर आधारित हे पुस्तक इंग्रजी भाषेत लिहिण्यात आले आहे, इतकेच नाही तर या इंग्रजी पुस्तकाची मराठी आवृती श्रीकृष्ण : जीवनाचा मार्गदर्शक या पुस्तकाची मराठी अनुवादित आवृत्ती लिहून ही दोन्ही पुस्तके नुकतीच प्रकाशित झाली आहेत . ही दोन्ही पुस्तके विद्यार्थ्यांसह सर्व वाचकांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणारी आहेत.

बाल साहित्यिक गिरीराज लक्ष्मीकांत मुक्कावार यांनी लिहिलेले हे पुस्तक नेशन प्रेस या प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित करण्यात आले आहे. वयाच्या 14 व्या वर्षी इतक्या सखोल आणि आध्यात्मिक विषयावर साहित्य लेखन करून त्यांनी शाळेचा तसेच उमरखेड तालुक्याच्या साहित्यिक वैभवात मानाचा तुरा खोवला आहे.

त्यांच्या या साहित्यिक कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून या निर्मिती यशामागे त्यांच्या वडील लक्ष्मीकांत मुक्कावार व आई ज्योत्स्ना मुक्कावार, गुरुजन तसेच वडीलधाऱ्या मंडळीचे मोठे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले आहे.

## आनंदी बालपण उपक्रमातून चिमुकल्यांच्या चेह-यांवर फुलले हास्य



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - तालुक्यातील बेलोरा ता. पुसद, जि. यवतमाळ येथे "आनंदी बालपण उपक्रम" उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत लहान मुलांना कपडे, स्टोरी पुस्तके, खेळणी, बोर्ड गेम आदी विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

सदर साहित्य द किडव्हर्स टाटा फाउंडेशन, मुंबई यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले होते. हे साहित्य स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने लाभार्थी मुलांना वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांमुळे गरजू मुलांना मदत मिळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजकुमार भगत, उपाध्यक्ष शरद खंदारे, प्रशांत भगत, परमेश्वर भगत, तसेच संस्थेचे पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त

## महाविद्यालयांनी संशोधन आराखडा पाठविण्याचे आवाहन

**अमरावती**-विद्यार्थ्यांच्या संशोधन मान्यता समित्या ऑनलाईन पध्दतीने २३ मार्च, २०२६ पासून घ्यावयाच्या असल्याने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचा संशोधन आराखडा तातडीने पाठवावे, असे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने संशोधन केंद्रांकडून मागविलेला संशोधन आराखडा १३ नोव्हेंबर, २०२५ ते ०५ फेब्रुवारी, २०२६ या दरम्यान संपन्न झालेल्या आरआरसी सभेमध्ये सादर करण्यात आलेला होता. संशोधन केंद्रांनी ज्या विद्यार्थ्यांचा संशोधन आराखडा निदेश मधील तरतूद क्र. ६ नुसार सादर न केल्यामुळे आरआरसी सभेव्दारा त्या विद्यार्थ्यांचे प्रकरणे प्रलंबित ठेवण्यात आले होते. या अनुषंगाने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी मान्यता दिल्यानुसार सदर विद्यार्थ्यांच्या संशोधन मान्यता समित्या ऑनलाईन पध्दतीने २३ मार्च, २०२६ पासून घ्यावयाच्या असल्याने संशोधन केंद्रांनी विद्यार्थ्यांचे संशोधन आराखडा ची पीडीएफ कॉपी तातडीने त्यांना विद्यापीठाव्दारे कळविलेल्या ई मेल वर २१ मार्च, २०२६ पर्यंत पाठवावी, जेणेकरुन आचार्य कक्ष विभागाला कार्यवाही करणे सोयीचे होईल. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, संशोधन केंद्रांना आचार्य कक्षाकडून पत्राव्दारे कळविण्यात आले आहे, असे आचार्य कक्षाच्या उपकुलसचिव मीनल मालधुरे यांनी विद्यापीठाच्यावतीने कळविले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## पिंपळखुटा येथे पदवीदान कार्यक्रम

**पिंपळखुटा**- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलगनीत श्री संत शंकर महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय पिंपळखुटा येथे पदवीदान कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुभाष मुरे तर प्रमुख पाहुणे म्हणून



महाविद्यालय विकास समितीचे सदस्य बाबासाहेब देशमुख श्री संत शंकर महाराज विद्यामंदिर,कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य रामेश्वर नागपुरे,विज्ञान अध्यापक मंडळाचे धामणगाव रेल्वे तालुका अध्यक्ष अनंत डुमरे विज्ञान विभागाच्या प्रा.स्नेहा शेंडे-नागपुरे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी एकूण ३५ पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना उपस्थितीत मान्यवरांचे हस्ते पदवीचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्याचे भरभरून कौतुक करीत भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्यात. विद्यार्थ्यांनी सुद्धा महाविद्यालया प्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा.विजय कामडी तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. डॉ.नरेश इंगळे यांनी केले. कार्यक्रमाला श्री संतोष नागपुरे, प्रा. डॉ.मेघा सावरकर, प्रा.सुषमा कावळे रंजीत गुळदे यांच्यासह महाविद्यालय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## प्रभा आवारे यांचा सत्कार

**अमरावती**- शहरातील विद्युत कॉलनी विभागातील संवाद ज्येष्ठ महिला मंडळ तर्फे जागतिक महिला दिनानिमित्ताने महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले त्याच भागातील हनुमान मंदिर येथे या स्पर्धांचा बक्षीस वितरण



कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रभा आवारे यांचा सत्कार करण्यात आला. प्रभा आवारे यांनी मध्यंतरी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्यानिमित्ताने संवाद ज्येष्ठ महिला अध्यक्षा यांनी त्यांचा सत्कार आयोजित केला सामाजिक कार्यकर्त्या सतनामकौर हुड्डा संस्थाध्यक्ष अशा निचत यांच्या हस्ते झालेल्या सत्कार प्रसंगी विद्या डहाके मंगला वैद्य माया बोंडे सविता तलवारे सरिता शोभा देवांग कल्पना लेवरकर इत्यादी सह डॉ. गोविंद कासट प्रवीण वासनिक देविदास कोल्हे नगरसेवक ऋषिकेश देशपांडे हजर होते.

## गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट येथे ईद मिलन सोहळा

**अमरावती**- गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट राधानगर ,महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, संविधान जागर अभियान व जमाते इस्लामी हिंद यांच्या संयुक्त विद्यमाने ईद मिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा ईद मिलन सोहळा रविवार दिनांक २२ मार्च रोजी दुपारी चार वाजता गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट राधा नगर अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. ईद मिलन सोहळ्याचे उद्घाटन गाडगे नगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव हे करणार असून याप्रसंगी अतिथी म्हणून डॉ. दिलीप काळे, वसंतराव वंडलकर, गजेंद्र सुरकार, अनिता काशी, मिर्झा गफार बेग रफिक अहमद , लाईक अहमद व राजीव बसवनाथे हे उपस्थित राहणार आहेत. हा सोहळा गुरुदेव सेवाश्रम ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रम संयोजक प्रफुल्ल मंदा श्रीधर, विजय डवरे, मो. अफसर भाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नांदगाव खं. येथे तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रम

### १० गावांमधून ३५० पेक्षा अधिक महिला व पुरुष उपस्थिती

**नांदगाव खंडेश्वर/ वार्ताहर**

इकोनेट संस्थेच्या माध्यमातून नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोणी, मंगरूळ चव्हाळा आणि सातारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच चोर माहुली, धानोरा गुरव, धानोरा फसी, वडूरा, मंगरूळ चव्हाळा उपकेंद्रांमधील आरोग्य सेवांचा मागील सहा महिन्यांपासून सखोल अभ्यास करण्यात आला होता.

या अभ्यासाच्या पार्श्वभूमीवर नागरिक, आरोग्य विभाग आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद घडवून आणण्यासाठी पदमपाणी मंगलम, नांदगाव खंडेश्वर येथे तालुका स्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाला तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्राजक्ता वानखडे, सह गटविकास अधिकारी निलेश ठाकरे, इकोनेट संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी गौरीताई भोपटकर, इकोनेटचे राहुल साळवी, सुनिता देशमुख, मेडिकल ऑफिसर



नितेश हारळकर मंगरूळ चव्हाळा प्राथमिक आरोग्य केंद्र, गुल्हाने सर लोणी प्राथमिक आरोग्य केंद्र, मुकेश पारडे सर द्यामक प्राथमिक आरोग्य केंद्र,महिला व बालकल्याण विभागाचे प्रतिनिधी, अपेक्षा या संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते सोमेश्वर चांदूरकर, समर्थ बहुउद्देशीय सामाजिक संस्था अध्यक्ष बाबूसिंग पवार, सुनील धनविजय, पत्रकार उमेश चौकुडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.आरोग्य विभागातील अधिकारी, तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमामध्ये तालुक्यातील ओंकारखेडा, शिरपूर, धानोरा फसी, वडूरा, हिंगलाजपूर देवी, हिवरा, मुरादे, सावंगी, रोहना, बहिलोरपूर, शिवरा, मंगरूळ चव्हाळा या गावांमधून ३५० पेक्षा अधिक महिला व पुरुष उपस्थित होते.जनसंवाद सत्रामध्ये नागरिकांनी आरोग्य सेवा घेताना येणाऱ्या अडचणी, योजनांचा लाभ मिळविताना येणारे प्रश्न, ॲम्ब्युलन्स सेवा, दळणवळणाच्या समस्या, औषधांची उपलब्धता तसेच आरोग्य केंद्रांमधील सुविधांबाबत आपले अनुभव मांडले.तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्राजक्ता वानखडे यांनी या अडचणी लक्षात घेऊन योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळावा यासाठी काम केले जाईल, असे आश्वासन दिले.कार्यक्रमामध्ये जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, लसीकरण कार्यक्रम तसेच विविध आरोग्य योजनांची माहिती देण्यात आली. जनसंवादामुळे नागरिक, प्रशासन आणि आरोग्य विभाग यांच्यात थेट संवाद साधला गेला.संचालन प्रशांत पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशासाठी रंजना वानखडे, छाया जाधव, रेखा कराड, काजल पवार, अभय पवार, सागर पवार, शिवा पवार,उमेश पवार,हिना पवार संदीप अंभोरे,तसेच इकोनेटची संपूर्ण टीम आणि स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले.अति जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मालखेडे यांनी मार्गदर्शन केले.

## चांदूर बाजार तालुक्यात महसूल विभागाची वसूली ८० टक्के

**चांदूरबाजार/ वार्ताहर**

मार्च महिना हा बहूतांश शासकीय विभागासाठी कर वसुलीचा महीना असतो. या कर वसुलीतून शासनाला महसूल मिळतो. शासनाला अधिक महसूल मिळवून देण्याची जबाबदारी याच विभागावर असते.त्या अनुषंगाने शासनाकडून,तालुका महसूल प्रशासनालाही उद्दिष्ट दिल्या जाते.अशातच चांदूरबाजार महसूल प्रशासनाला,५० कोटी ५४ लाख रूपयांच्या वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. या पैकी ४ कोटी ६५ लाख रूपये वसुली करून, १२ मार्च पर्यंत एकूण वसुलीच्या ८० टक्के वसुली करण्यात आली आहे.१०० टक्के वसुली पूर्ण करण्यासाठी,प्रभारी तहसीलदार यांचे मार्गदर्शन खाली युद्ध पातळीवर प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत.



स्थानिक तहसिल कार्यालयाला यावर्षी ३१ मार्च पर्यंत, ५ . ९४ कोटी रुपये वसूल करण्याची जबाबदारी देण्यात आली होती.यात प्रपत्र अ अंतर्गत जमीन महसूल,अकृषक,पोट हि.मो.फी इत्यादी अंतर्गत १. ९४ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते.पैकी १.१७ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहे.ही वसुली दिलेल्या उद्दिष्टाच्या ६० टक्के इतकी आहे.तसेच प्रपत्र ब गौण खनिज अंतर्गत, ४ कोटी रूपयांये वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.यापैकी ३.५३ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. गौण खनिजाची ही वसुली चिखलदरा व धारणी नंतर, जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आहे. या गौण खनिज वसुली मध्ये रेती घाट, विट पजावा , रेतीची अवैध वाहतूक दंडात्मक रकमेचा भरणा. तसेच इतर प्रकल्पा अंतर्गत वापरण्यात आलेल्या रेतीची रॉयल्टी इत्यादींचा समावेश आहे.

**८० टक्के महसूल वसुली**

३१ मार्च पर्यंत शंभर टक्के महसूल वसुली करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार स्थानिक महसूल प्रशासन,युध्द पातळीवर काम करत आहे.

**मनोज सोनारकर,**
प्रभारी तहसीलदार

## बडनेरा उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामाबाबत उच्च न्यायालयाच्या कानपिचक्या

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यातील बडनेरा येथील जुन्या बायपास मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगवर सुरू असलेल्या उड्डाणपुलाचे काम गेल्या ६ वर्षांपासून का रखडले आहे? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने उपस्थित केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासह केंद्र आणि राज्य सरकारला नोटीस बजावून ६ आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

२०२० मध्ये या पुलाला मंजुरी मिळाली होती आणि



२०२१ मध्ये ३६ कोटींच्या खर्चासह कामाला सुरुवात झाली. मात्र, ६५० मीटर लांबीच्या या पुलाचे काम निधीअभावी अत्यंत संथ गतीने सुरू आहे.या रखडलेल्या कामामुळे शहरातील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली.

निधीचे संकट आणि नाराजी-या पुलाच्या कामाची जबाबदारी 'महारेल'वर आहे. अत्यल्प निधी मिळत असल्याने गेल्या वर्षापासून काम अंतिम टप्प्यात अडकले आहे. भूसंपादनाचा अत्यल्प मोबदला मिळाल्याने भूधारकही नाराज आहेत. दोन खासदारांचा कार्यकाळ संपला तरी काम अपूर्ण असल्याने नागरिकांमध्ये मोठा असंतोष आहे.

## आरास दिव्यांची



*कु-हा येथील श्री अंबिका देवी संस्थान श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर चैत्र रामनवमी देवी नवरात्र महोत्सवात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १९ ते २६ मार्च २०२६ पर्यत श्री मनोकामना सिध्दी निमीत्य अखंड दिपज्योत ६५१ लावण्यात आल्या. या दिपज्योती प्रज्वलन यजमान रमेशचंद्रजी राठी (आर्वी), भैय्यासाहेब ठाकरे, दिनेश वानखडे व भाविकांच्या उपस्थितीत लावण्यात आल्या. (छाया- अशोक पवार, कुऱ्हा)*

### गुढी पाडव्याच्या पर्वावर विविध साहित्याची खरेदी

# रमजान-ईदच्या हंगामामुळे व्यापाराला मोठी चालना

**अमरावती/ का.प्र.**

गुढी पाडव्याच्या पर्वावर बाजारपेठेत विविध प्रकारच्या वस्तूंच्या जोरदार खरेदीचे दृश्य पाहायला मिळाले. ग्राहकांची खरेदी कपड्यांपासून ते सोने-चांदीपर्यंत, आणि वाहनांपासून ते स्वयंपाकघरातील भांडी व गृहउपकरणांपर्यंत अशा सर्वच क्षेत्रांत दिसून आली.

या शुभ मुहूर्तावर शेकडो वाहनांची डिलिव्हरी (वितरण) करण्यात आली, तर शेकडो लोकांनी घरे, अपार्टमेंट्स, कार्यालयांच्या जागा आणि जमिनींचे भूखंड आरक्षित (बुक) केले.

गुढी पाडव्याचा शुभ मुहूर्त असल्यामुळे, अनेक लोकांनी आजच आपल्या लग्नाच्या दागिन्यांची खरेदी सुरू केली. परिणामी, शहरातील सर्वच प्रमुख दागिन्यांच्या दालनांमध्ये (शोरूम्समध्ये) हलक्या वजनाच्या दागिन्यांच्या खरेदीला विशेष पसंती दिली गेली. २४-कॅरेट सोन्याचा भाव १,५४,००० रुपये प्रति १० ग्रॅम होता, तर २२-कॅरेट सोन्याचा दर १,४२,००० रुपये होता. चांदीचा भाव २,४२,००० रुपये प्रति किलोग्राम होता. सोन्या-चांदीचे सध्याचे दर हे अलीकडील काळातील त्यांच्या उच्चांकी दरांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहेत, या वस्तुस्थितीमुळेही गुढी



पाडव्याच्या दिवशी इतर दिवसांच्या तुलनेत ग्राहकांची गर्दी अधिक दिसून आली. शहरात हिऱ्यांच्या दागिन्यांची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

**१,३०० दुचाकी आणि ४०० मोटारींची डिलिव्हरी**

अमरावतीमध्ये वाहनांची आवड असणाऱ्यांची (वाहन प्रेमींची) संख्या सातत्याने वाढत आहे. इलेक्ट्रिक वाहनांसह, शहरातील लोकांनी विविध उत्पादकांच्या १,३०० हून अधिक दुचाकींचा ताबा (डिलिव्हरी) अत्यंत उत्साहाने आणि आनंदाने स्वीकारला. त्याचप्रमाणे, मोटारींची मागणीही सातत्याने वाढत आहे. आजपासून ४०० हून अधिक नवीन मोटारी अमरावतीच्या रस्त्यांवर धावू लागतील.

**वस्त्रोद्योगाच्या बाजारात प्रचंड गर्दी**

रमजान ईद आणि गुढीपाडवा हे सण अगदी जवळच्या अंतराने येत असल्यामुळे, वस्त्रोद्योगाचा बाजार (कापडाचा बाजार) संपूर्ण आठवडाभर अत्यंत गजबजलेला राहिला आहे; किंबहुना, प्रमुख व्यापाऱ्यांना उसंत घेण्यासही क्वचितच वेळ मिळाला आहे. परिणामी, सर्व प्रमुख दुकानांपर्यंतच्या शोरूम्समध्ये- गुढीपाडवा आणि रमजान या दोन्ही सणांच्या खरेदीमुळे- ग्राहकांची प्रचंड वर्दळ दिसून आली.

**अनेक नवीन गृहनिर्माण प्रकल्प (लेआउट्स) सुरू**

गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर, शहरातील स्थावर मालमत्ता क्षेत्रातही (रिअल इस्टेट) मोठी हालचाल दिसून आली; ग्राहकांनी केलेल्या शुभ मालमत्ता खरेदीसोबतच (मुहूर्त खरेदी), विकासकांनी अनेक नवीन निवासी प्रकल्प सुरू केले आणि विक्रीसाठी भूखंड उपलब्ध करून दिले.


भांड्यांच्या बाजारपेठेतही ग्राहकांची मोठी वर्दळ दिसून आली. दैनंदिन वापरातील स्वयंपाकाच्या भांड्यांच्या मोठ्या खरेदीसोबतच, आधुनिक उपकरणांचीही लक्षणीय खरेदी करण्यात आली.

# मुंबई, नागपूर, पुणेसाठी उन्हाळी विशेष १०६ फेऱ्यांची सोय

**अमरावती/ का.प्र.**

मध्य रेल्वे अंतर्गत येणाऱ्या अमरावतीकर प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई, पुणे व नागपूरकडे जाण्यासाठी १०६ फेऱ्यांची अतिरिक्त सोय करण्यात आली आहे. त्यामुळे उन्हाळ्यात तिन्ही महानगरात जाण्यासाठी प्रवाशांना विशेष रेल्वेची सुविधा मिळणार आहे. सीएसएमटी-नागपूर-सीएस एमटी अशा एकूण ५२, पुणे-नागपूर-हडपसर २८ अधिक २६ अशा विशेष ट्रेनच्या फेऱ्या राहणार आहेत.

गाडी क्र. ०२१४१ ही द्विसाप्ताहिक विशेष गाडी १९ एप्रिल ते १४ जुलै या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून, दर रविवार आणि मंगळवारी रात्री १२.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी दु. ३.१० वाजता पोहोचेल. ही साप्ताहिक विशेष ट्रेन २६ फेऱ्या करणार असून बडनेरा स्टेशनवर ११.४५ वाजता पोहोचेल. गाडी दु. क्र. ०२१४२ ही द्विसाप्ताहिक विशेष गाडी १९ एप्रिल ते १४ जुलै या कालावधीत, नागपूर येथून दर रविवार आणि मंगळवारी रात्री ८ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी दु. १.३० वाजता पोहोचेल. ही साप्ताहिक विशेषही २६ फेऱ्या करणार आहे. बडनेरा स्टेशनवर ती रात्री ११.१५ वाजता पोहोचेल. मार्गात दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा या स्टेशनवर थांबा घेईल. १



वातानुकूलित द्वितीय, ६ वातानुकूलित तृतीय, ९ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणी-सह-गार्ड ब्रेक व्हॅन अशी या विशेष ट्रेनची रचना आहे.

गाडी क्र. ०९४५७ ही साप्ताहिक विशेष १५ एप्रिल ते १५ जुलै या कालावधीत पुणे येथून दर बुधवारी दु. ३.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ६.३० वाजता पोहोचेल. बडनेरा स्टेशनवर ही भल्या पहाटे ३.१५ वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्र. ०१४५८ ही साप्ताहिक विशेष गाडी १६ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत नागपूर येथून दर गुरुवारी सकाळी ८ वाजता सुटेल आणि हडपसर येथे त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पोहोचेल. दोन्ही विशेष साप्ताहिक ट्रेन प्रत्येकी १४ फेऱ्या करणार आहेत. बडनेरा स्टेशनवर ही ट्रेन स. ११.३० वाजताच्या सुमारास पोहोचेल. उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा असे एकूण १४ थांबे ही ट्रेन मार्गात घेणार आहे. १ वातानुकूलित प्रथम, १ वातानुकूलित द्वितीय, २ वातानुकूलित तृतीय, ५ शयनयान, ६ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणी-सह-गार्ड ब्रेक व्हॅन, अशी या ट्रेनची रचना आहे. पुणे - नागपूर - हडपसर साप्ताहिक वातानुकूलित विशेष गाडी क्र. ०१४६९ ही साप्ताहिक विशेष २१ एप्रिल ते १४ जुलै या कालावधीत, पुणे येथून दर मंगळवारी दु. ५.५० वाजता निघेल व नागपूर येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ६.३० वाजता पोहोचेल. बडनेरा स्टेशनवर उशिरा रात्री ३.१५ वाजता तिचे आगमन होईल. त्याचप्रमाणे गाडी क्र. ०१४७० ही साप्ताहिक विशेष गाडी २२ एप्रिल ते १५ जुलै या कालावधीत, नागपूर येथून दर बुधवारी स.८ वाजता सुटेल आणि हडपसर येथे त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पोहोचेल. ३ वातानुकूलित द्वितीय, १५ वातानुकूलित तृतीय, १ सामान्य द्वितीय श्रेणी सह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर व्हॅन अशी या गाडीची रचना आहे.

**महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन**
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, दर्यापुर**

Email- tah.daryapur@gmail.com — Tel No-07227-234234

क्रमांक-/प्रस्तु-१/कावि/२३७/२०२६ — दिनांक:- १६/०३/२०२६

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, **अर्जदार दिलीप बाळकृष्ण पोटे** रा.अड्डुळा ता.दर्यापुर जि. अमरावती यांनी मौजा अडुळा बाजार येथील गट क्रमांक ६९ क्षेत्र ०.४० हे.आर.पो.ख.क्षेत्र ०.०१ हे. आर व गट क्रमांक ७० क्षेत्र १.३० हे. आर पो.ख.०.०३ हे. आर शेतजमिनीला कुळ घोषीत करुन खरेदी प्रमाणपत्र मिळणे बाबत ही शेतजमीन कुळ कायदयान्वये खरेदी करुन मिळणे बाबत विनंती अर्ज कार्यालयात सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. मौजा अडुळा बाजार येथील गट क्रमांक ६९ क्षेत्र ०.४० हे.आर.पो.ख.क्षेत्र ०.०१ हे. आर व गट क्रमांक ७० क्षेत्र १.३० हे.आर पो.ख.०.०३ हे. आर शेतजमिनीला कुळ घोषीत करुन खरेदी प्रमाणपत्र मिळणे बाबत जर कोणाची हरकत किवा अक्षेप अथवा तक्रार असल्यास अथवा प्रकरणात काही म्हणावयाचे असेल तर त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ०७ दिवसा नंतर जर कोणाची हरकत किंवा अक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच प्रकरणात कोणालाही काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल.

शिक्का

**तहसिलदार दर्यापूर**

## आज जागतिक वनदिन..

# समृद्ध वने गरज भविष्याची !

*छायामन्यस्य कुर्वन्ति*
*तिष्ठन्ति स्वयमातपे।*
*फलान्यपि परार्थाय*
*वृक्षाः सत्पुरुषा इव।।*

वृक्ष स्वत: उन्हात उभे राहून इतरांना सावली देतात. त्यांची फळे सुध्दा इतरंसाठीच असतात. असे वृक्ष म्हणजे जणू सत्पुरुषच वृक्षाबाबत पुराणात मध्ये महत्व विशद केले आहे. समृद्ध वनातील वृक्ष मानवाला, पशु, पक्षांना अन्न पुरवतीतात. तसेच वनात मोठ्या प्रमाणात पशु व पक्षी यांची अन्न साखळी मजबूत राहिली तरच समृद्ध वने निर्माण होतील. तेंव्हाच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबेल. येणारे वातावरणाचे संकट दूर होऊन पृथ्वी सुरक्षित राहील व मानवी जीवन भविष्यात टिकेल. आज वनसंवर्धन दिनानिमित्त वनांचे महत्व जाणून घेवू

भोगौलिक क्षेत्राच्या ३३ट टक्के वनाच्छादन करण्याकरिता प्राधान्य देण्याचे शासन कार्यरत आहे. ७ जुनला मृग नक्षत्र सुरु होते ५ जून हा जागतिक पर्यावरणदिन त्यानिमित्त स्थानिक स्वराज्य संस्था, पक्ष, संघटना, व संस्था या मार्फत वृक्ष लागवड केली जाते. या आधारे निसर्ग प्रेमी मंडळींनी समृद्ध पर्यावरणा साठी देशी पद्धतीची व आयुर्मान जास्त असलेली, खोलवर रुजणारी झाडे लावली पाहिजेत. जंगलातील अनेक वट वृक्ष नष्ट झाले आहेत तर प्रचंड झाडे तोडही मोठ्या प्रमाणात असून यातून अनेक ऑक्सिजन लंग्ज निर्मितीचे झाडे नष्ट झाली आहेत. असून त्या ठिकाणी विदेशी झाडे आली आहेत. देशी झाडांची साल, पाने, फुले, फळे, शेंगा, बिया, डिंक, चीक यापासून मनुष्य व वन्यजीवांचे अन्न असते. तेल व औषधी म्हणून मोठा उपयोग होतो. कोरोना संकटामुळे लोकडाऊन काळात पर्यावरण बदल जाणवला तसेच अनेक पक्षी व पशु ही दृष्टीस पडले. योग्य पर्यावरण निर्माण झाले की समृद्ध वने दिर्घकाळ राहतात.

सुंदर पर्यावरण व समृद्ध जंगल निर्मितीसाठी देशी झाडांचे फायदे समजावून घेतले पाहिजेत.



बहुपयोगी वड ,पिंपळ, चिंच, फणस, आवळा, आंबा, बेल, कडुनिंब, मोह, कदंब, पळस, लाख, साल, कवठ या शिवाय साधी बाभूळ, हिवर, धावडा, आपटा, भोकर, आवळा, पांगारा, पिपरी, नांदूक, मोह, पारिजातक, शिंदी, करंज, चंदन, कुसुम, बिबवा, खैर, हिंगण, गोधन, रानभेंडी, अर्जुन अशी भारतीय देशी झाडे ऑक्सिजन लंग्ज निर्माण करतात. तसेच करवंद, तरवड, मुरुडशेंग, निर्गुडी, अश्वगंधा, बोरकर, हि झुडपे तर वेलीत गुंज, शेवरी, कावळी, अनंतमूळ तर फळ झाडात रामफळ, अंजीर, सीताफळ, चिक्कू, पेरू, तुती, शेवगा, हादगा, लिम्बुनी, जांभूळ तर गवतात कुसळी गवत, एकदांडी, माकडशिंगी, पसरी गवत, गोधडी हे गवत केवळ खाद्य नव्हे तर चांगल्या प्रमाणात प्राणवायू निर्माण करतात.अनेक काटेरी वनस्पती व फुलझडी यांवर फुलपाखरे, भुंगे, मधमाश्या आपले अस्तित्व टिकून राहतात. त्यामुळे परागी भवन सुरळीत चालू राहते. विदेशी झाडांना फळे व फुले लगडत नाहीत त्या मुळे पोपट, मैना, साळुंकी, सुतार पक्षी, धीवर, घार, ससाणा, बगळे अशे अनेक पक्षी हळू हळू नाहीसे होत आहेत. पोपटांचा थवा हा फक्त मुलांच्या गोष्टीतला व आठवणीतला विषय बनून राहिला आहे. देशी झाडांची मुळे ही खोलवर जाऊन जमिनीला घट्ट पकडून ठेवणारी आहेत. तसेच कमी पावसावर तग धरून जिवंत राहतात. त्या मुळे जमिनीची धूप कमी होते. या शिवाय बीज मोठ्या प्रमाणावर उत्पन्न होत असल्याने पुनर्र निर्मिती होते. शास्त्रीय माहिती न घेता निसर्गाशी नाते जोडणे पर्यावरणासाठी व मानवी अस्तित्वा साठी धोक्याचे आहे. मॉडर्नपणाच्या खोट्या समजुतीने परदेशी कॅशिया,ग्लिरिसिडीया,फायकस,सप्तपर्णी ,स्पॅथोडिया, रेन ट्री अशी परदेशी झाडे लावण्याची फॅशन आली आहे. अनेकांनी वास्तुनिवास शुशोभीकरणात तुळस वगळता सर्व विदेशी वृक्ष दिसतात पण ही परदेशी झाडे पर्यावरणास व आरोग्यास घातक असल्याचे संशोधनावरुन सिध्द झाले असल्याचे सांगितले जात आहे.

बिबट व वाघ, लांडगा, तरस या वन्यजीवांच्या हल्ल्यात दरवर्षी शेतकऱ्यांचे पशुधन व मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वन खात्याच्या अहवालात महाराष्ट्रामध्ये गेल्या पाच वर्षात ६७५ बिबट्यांचा मृत्यू झाला असून, मानव-वन्यजीव संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत असल्याचे समोर आले आहे. यापैकी १९८ बिबटे रस्ते अपघातात ठार झाले आहेत. नैसर्गिक कारणे, रस्ते अपघात, विहिरीत पडणे, विजेचा धक्का आणि शिकारी ही बिबट्यांच्या मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.असे हिंस्र पशु वन सोडून बाहेर कसे येऊ लागले याचे उत्तर शोधणे अवश्य आहे. जंगलात विदेशी झाडे लागल्याने या झाडांवर ना फुले, फळे, शेंगा नसल्याने वन्य जीवांचे हक्काचे अन्न नाहीसे झाले वारंवार लागणारे वणवे जाळून गेलेली वनस्पती, मृत झालेले सरपटणारे प्राणी यात रानससे,घोरपड, खोकड, माकड, खार, शेखरुखार, खवले मांजर, साळींदर, हरणाचे कळप, रानडुक्कर, मुंगूस असे जास्त उत्पत्ती होणारे प्राणी झटपट नाहीसे झाले. यांवर जगणारे बिबट व वाघ, लांडगा, तरस हे प्राणी जंगल सोडून मानवी वस्तीकडे येऊ लागले.

सध्या विकासाच्या नावाखाली व भूखंडाचे श्रीखंड लाटताना दरवर्षी हजारो एकर जंगल नष्ट होत चालले आहे. ही बाब भीषण आहे. हे जंगल सारे आगीत नष्ट झालेले नसून 'तथाकथित' विकासाच्या भक्ष्यस्थानी पडले आहे. त्यामुळे वनसंपदेत देशी वृक्ष, औषधी वनस्पती, नष्ट झाल्या आज जंगलातील प्राचीन अन्न साखळी निर्माण करावी लागणार आहे. त्यासाठी हिरवा चारा व फळे, फुले, असणारी देशी वृक्ष लागवड अवश्य असून भविष्यात शासनाने या गोष्टी केल्या नाहीतर मानवी वस्तीकडे हिंस्त्र प्राण्यांचे होणारे अतिक्रण रोखणे अवघड होणार आहे. समृद्धवने उभी राहिलीतर मानवाचा भविष्यकाळ टिकणार आहे.


**विठ्ठल वळसेपाटील**
मो. ८४८४०६६०४२

# 'कवेत घडे कविता....'

शब्दांची उत्पती केव्हा झाली, याचा अंदाज भाषाशास्त्र किंवा विज्ञानात कुठेही नोंदला असेल अथवा भाषातज्ञ अचूकपणे सांगेल ही? शब्दात काय काय दडलेले असते, हे मात्र शब्दातील भाव पकडल्या शिवाय समजत नाही.म्हणून त्यासाठी हृदय लागते.हृदयाला भाव व भावाला शब्द हवे असतात.म्हणून शब्द हे आघातचे संकेत मणी आहेत. आघाताचा ध्वनी अक्षरात समावेशित होतो.अक्षरे शब्दात साकारले जातात. अक्षरांची मांडणी केल्यावर शब्द दिसतो.शब्दांचे वाक्य होतात,वाक्य झाल्यावर आशय पुढे येतो.आशय पुढे आला की, संवाद अथवा वाद घडतो.इतकी सहज प्रक्रिया अक्षरे व शब्दाच्या वापरात आहे.

ह्या शब्दांचे उद्गार जगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात बोबड्या बोलापासून तर सूत्र, मंत्र उच्चारापर्यंत जिवंतपण देणारे आघात असतात.हे आघात वादळांचे, वेदनांचे,भावनांचे आणि मानवी स्वभाव गुण धर्मांचे ही आघात असतात.हाच प्रवास मानवाच्या उत्क्रांतीत घडत गेला. या आघातला व्यक्त करताना उमटलेला ध्वनी हा आक्रोश किंवा आनंदाचे आल्हादायक असेल तो भावरूपाने शब्द उच्चारला असेल? तेव्हा त्या स्वरात घडलेली पहिली रचना ही म्हणजे आद्यकाव्य असावे. हा तर्क संगीत,राग-रागिणी, किंवा भाव विश्व निर्माण केलेले सर्व साहित्य कबुल करतील.

२१ मार्च हा जागतिक काव्य दिवस म्हणून जगाच्या पाठीवर असलेल्या सर्व देशात साजरा होतो. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटने(युनेस्को)च्या वतीने २१मार्च १९९९ मध्ये हा पायंडा निर्माण केला.त्यानिमित्ताने कवितेचा उदय व त्याची व्याप्ती सांगण्याचा इवलुसा प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण काव्यकलेला सन्मान देण्यासाठी;काव्य लेखन करणाऱ्या कवीना प्रेरणा, प्रोत्साहन मिळण्यासाठी व विविध भाषांतील कवितांचा प्रचार प्रसार



व्हावा या उद्देशाने या दिवसाची स्थापना केली.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेली ही संघटना कवितेमार्फत मानवी भावना व्यक्त करण्यासाठी, समाजातीतील विचार, संस्कृती व इतिहासाचे जतन करण्यासाठी विविध उपक्रम राबविते.फ्रान्स देशात पॅरिस शहरामध्ये जागतिक शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेचे मुख्यालय असून येथून काव्य दिनाची घोषणा झाली.विविध भाषांचा परिचय,भावनिक अभिव्यक्तिला संधी प्राप्त करून देणे.नवकवी यांच्या प्रतिभेला चालना देणे,त्यांचा सन्मान करणे, प्रोत्साहन देणे व लुप्त होत जाणाऱ्या भाषांचे संवर्धन करणे, या उद्देशाने या दिवसाची घोषणा झालीं. कारण पृथ्वीच्या उत्तर गोलार्धावर वसंत ऋतूच्या आगमनात बहरलेल्या लतापुष्पांच्या दर्शनाने सुचलेल्या शब्दांना काव्यबद्ध करण्याचा प्रयत्न या निमित्ताने झाला.

जागतिक स्तरावर या काव्य दिनाची घोषणा करण्याचे एकमेव मूलभूत कारण म्हणजे नैसर्गिक भावबंधाचे सादरीकरण,सौंदर्याचे रुपेरी,सोनेरी रूपकात्मक वर्णन करण्यासाठी कवितेचा उदय व्हावा.'ऑल द वर्ल्डस एॅज स्टेज अँड ऑल द मेन अँड उमेन मेरिली प्लेअर्स' हे इंग्लंडच्या महाकवी विल्यम शेक्सपियरचे अमर वाक्य साहित्य क्षेत्रात जपून ठेवण्याची जबाबदारी संयुक्त राष्ट्र संघाने घेतली आहे. रुमी, पाब्लो नेरुदा, होमर,एमिली डिकीन्सन,रॉबर्ट फ्रास्ट माया एन्जोलो,खलील जिब्रान असा अनेक प्रसिद्ध कवींची ओळख कायम ठेवणे.

जागतिक स्तरावर भारताला नोबेल पुरस्कार मिळवून देणारे जेष्ठ कवी रविंद्रनाथ टागोर यांनी गीतांजली लिहिली.रामायण महाभारतासारख्या महाकाव्याची भारताला अमर देणगी लाभली. महाकवी कालिदास पासून तर कुसुमाग्रज आणि गोडबोले (ग्रेस)पर्यंत, काव्य पसारा आवरता आवरता नव्या पिढीतील कवीपर्यंत आपण पोहचतो.

*'सर्व भावनांची भूक आहे..*
*अर्थ लावणे अचूक आहे...*
*शब्द, भावार्थ सांग ना रे ...*
*कवी मध्ये जी आपसूक आहे...*

कारण कोणतीही कविता भावनांच्या कवेतून जन्म घेते.कवी आलिंगन देतो भावनेला आणि शब्द ओझरतात कवितेच्या ओळीत.त्यामुळे कवितेचा भाव कुठलाही असो तो अलिंगातून येतो.आईचे वत्साप्रतीचे वात्सल्य,बाप्पाची मुलीला लग्न मंडपात विदागिरी देताना ची मिठी, कृष्ण सुदामाची मिठी असो किंवा भरत रामाची मिठी असो.

युगोनयुगो युगल मिठीतूनच काव्य पंक्ती बहरून कवींच्या प्रतिभेचा आवाका मांडल्या गेला.म्हणून प्रत्येक कवेत घडणारी कविता मानवी वंशाला वाचवण्यासाठी प्रयत्न करणे. म्हणून २१ मार्च जागतिक काव्यदिना निमित्ताने जागतिक युद्धस्थितीमध्ये अमानुषतेचे कारुण्यात रुपांतर करणारे भाव अमेरिकते व्यक्त होईल का? कारण 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे कवी बद्दल वर्णन केले जाते. निसर्गातून फुललेल्या सौंदर्याला ऊर्जेच्या स्त्रोतासाठी युद्धाने नेस्तनाभूत करणे म्हणजे मानवी हृदयाचे संवेदनशील स्पंदने बंद झाल्या सारखे आहे.कारण युद्धात कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिरकाव करणारी यंत्रणा विकसित देशात सज्ज आहे.

म्हणून विकसित देशाने विकसनशील व अविकसित देशाला मानवी संवेदनेच्या आधारावर आलिंगन देण्याचा भाव ठेवला तर नव्या कवितेने जगात शांतता स्थापन होईल. युद्ध नको बुद्ध पाहिजे.

असे म्हणता म्हणता..

*युद्ध नको मानवी शुद्ध पाहिजे.*
*शुद्ध असे आणखी खुद्द पाहिजे..*
*खुद्द भले चांगले हो रे माणसा...*
*युद्ध नको म्हणून बुद्ध पाहिजे...*

शांतीचा संदेश मानवी वंशा ला पिढी दर पिढी देताना शुद्धीवर राहून काम करावे लागेल. कारण कृत्रिम माणसाच्या युगात अस्सल माणूस श्रम सोडून भ्रम कवेत घेईल तर कविता संपतील व चाटजीबीची सवय अर्थावीण पोथी ! अन विकेकवीण रीती!! अशी स्थिती उद्भवू नये म्हणून जागतिक काव्य दिनाला सर्व कवींच्या हृदयाला कोणत्याही ब्लॉकेच ची बाधा होऊ नये असे शब्द कवेत घेऊन कविता प्रसूत करावी.प्रसार माध्यमे नक्कीच डिलिवरी करतील...

जो जे वांछील तो ते लाहो म्हणा किंवा या जन्मावर शतदा प्रेम करावे म्हणा शेवटी गीत हे प्रेमाचे तत्त्वज्ञान व गीता जगण्याचे तत्त्वज्ञान शिकवते.काव्य व महाकाव्य प्रेमाचे जगणेच शिकवते. भावनांच्या कवेत शब्द किती बसतात त्यावर काव्य महाकाव्य सादर झालेत,होतील ही....

**डॉ.प्रवीणकुमार राऊत**
सदस्य सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटी
मो.७७९८६४५५६५

# 'धर्म स्वातंत्र्य'



राज्यघटनेच्या कलम २५ अंतर्गत प्रत्येकाला सदविवेक बुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त व्यवसाय, आचरण आणि प्रसार करण्याचा अधिकार प्रदान केला आहे. काही व्यक्ती, पंथ, संस्था सक्ती, बलपूर्वक, फसवणूक, अमिष किंवा विवाहाद्वारे धर्मांतर करतात. धर्मांतराचे नियमन करण्यासाठी विधानसभेने आवाजी मतदानाने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ ला मान्यता दिल्याने राज्याला एक सक्षम धर्मांतर बंदी कायदा करता येईल त्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन आहे. विधेयकाचा उद्देश फसवणुकीच्या मार्गाने होणारे धर्मांतर थांबवणे आणि महिला,उपेक्षित समुदायांना लक्ष केल्यास कठोर शिक्षेची तरतूद करणे हा आहे. ज्यानुसार धर्मांतरासाठी जिल्हाधिकाऱ्यांना ६० दिवसांची पूर्व सूचना देणे आवश्यक आहे. कायद्यानुसार बेकायदेशीर धर्मांतर केल्यास दहा वर्षापर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद आहे. अवैध धर्मांतर करणाऱ्या संस्था किंवा संघटना यांना शासनाकडून कोणतेही सहाय्य किंवा अनुदान मिळणार नाही. अपराध घडतो, तो प्रत्यक्षात करणारी व्यक्ती,अपराधास सहाय्य करणारी किंवा साह्याचे प्रयोजन करणारी व्यक्ती, अपराध होण्यास सहाय्य करणारी किंवा उपप्रेरणा देणारी व्यक्ती, मन वळवणारी, सल्ला देणारी, प्रवृत्त करणारी व्यक्ती या सर्वांना दोषी मानण्यात येईल तसेच अवैध धर्मांतराचे कागदपत्र (दस्तावेज) तयार करणारी, ते पृष्ठांकित करणारी किंवा साक्षांकित करणाऱ्या व्यक्ती ही शिक्षेस पात्र असेल.

महाराष्ट्रात मागील अनेक वर्षापासून धर्मांतर बंदी कायद्याची मागणी होत आहे याचे कारण म्हणजे मागील काही वर्षात राज्यात लव जिहाद ची अनेक प्रकरणे पुढे आली आहे. यामागे हिंदू युवतींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे धर्मांतर करणे हा हेतू आहे. यासाठी मुसलमान युवकांना पैसे पुरवले जात असल्याचे उघड झाले आहे पण एखाद दुसऱ्या प्रकरणांमध्ये फसवणुकीचा गुन्हा नोंद होत होता पण धर्मांतर विरोधात कायदा अस्तित्वात नसल्याने कारवाईला मर्यादा येत होत्या. श्रद्धा वालकर प्रकरणात तिचा जीव गेला. लव्ह जिहाद मुळे फसलेल्या युवतींचे आयुष्य उध्वस्त होते. या प्रकरणातून जन्माला आलेल्या मुलांचे भवितव्य नष्ट होते. या कायद्याने त्या मुलांचे आयुष्य सुधारणार आहे. आईचा मूळ धर्मच मुलाचा धर्म असेल असे या कायद्यात नमूद केले आहे.आतापर्यंत देशात आठ राज्यांनी धर्मांतर बंदी कायदा लागू केला आहे. कायदा करण्यासह तो राबवणारी पोलीस आणि प्रशासन यंत्रणाही प्रामाणिक असणे आवश्यक आहे.

गोमाता आणि गोवंश हत्या बंदी कायदा असतानाही भ्रष्ट पोलीस यंत्रणेमुळे गोमातेची हत्येची प्रकरणे राज्यात मोठ्या प्रमाणात होत आहे.तसेच महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा कायदा अंतर्गत शहरी नक्षलवाद रोखण्याचा केलेला कायदा ही तेवढा प्रभावीपणे अमलात येत नाही.

त्यामुळे कायदे करून कठोर कारवाई केल्यास या प्रकरणात सहभागी असलेल्यांना जबर धाक बसेल आणि असे गुन्हे पुन्हा न करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होईल.

**लीना गाडगीळ**

# रहस्यमय स्टोरीतील 'सावज'

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा. प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६. स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज अमरावती, येथे १६ वे हौशी नाटक सावज सादर झाले. लेखन व दिग्दर्शन दस्तुरखुद्द इंजिनियर अशोक काळे यांचे दोन अंकी सादरीकरण होते.**

धाऱ्या रात्री कंदील घेऊन, मेणबत्ती लावणारे गृहस्थ, जंगलातील गेस्ट हाऊसात सुरू असलेल्या हालचालीवरून 'सावज' अंनाटक! हे रहस्यमय असेल अशा तऱ्हेने गुलाबी रंगात दर्शकांच्या नजरेसमोर उभारताना; कोल्हे कुत्र्यांच्या आवाजात, रातकिडेचे स्वर अधून मधून ऐकू येत असताना 'गुण नाम है कोई बदनाम हैं' गीत अचानक धाडकन दर्शकांच्या कानावर धडकते.'च्यामायले'! म्हणून गृहस्थ ओ ...बाई ओ.. बाई करून रेडिओ बंद कर सांगायला बाहेर पडतो. गर्दलाल रंगात एका साहेबी थाटात हातात धुम्रकांडी शिलगावलेली व्यक्ती गेस्ट हाउसमध्ये येतो व दादारावला (गडी )वीज का गेली? हे विचारते.दादाराव कारणे सांगतो. दार वाजवून कुणी तरी साहेबाच्या बॅग आणते.तो माणिक असतो.भूत भय असलेला माणिक या चांगलात बाया,मुलीचे भूत सांगत भीतीचे वातावरण तयार होते.काही वेळाने दोन सुशिक्षित महिलांचा प्रवेश होतो. माणिक घाबरून पळतो.



मिलमिलत्या अंधारात महिला व ओंकार यांचा संवाद. फ्रेश होण्यासाठी महिला बाहेर जातात. दादाराव, माणिक व ओंकार अंधाराचा आधार घेत पितात.

अचानक एक सस्पेक्टेड एन्ट्री.आरंभ रणपिसे असे नाव, शिकारीचा शौक असा ऐटीत ओंकार सोबत चर्चा आणि उपस्थितांचे बद्दल ओळख करून घेत.ओंकार सोबत व्यवस्थेवरील संवाद,बिबट्याचे शिकार करायला आलेला आरंभ जंगलातील घटना ह्या व्यवस्थेतील घटनेसोबत जोडून नरभक्षकाची शिकार करतो,असे सांगून स्वतःजवळची पित निघून जातो.गेस्ट हाऊस मध्ये गर्दीत भर अशी स्थिती दिसते. माणिक दारूची चव घेऊन; शिकारी शीतपेय पिऊन आपली फसगत केल्याचे निदर्शनात आणते,तेवढ्यात स्त्रीच्या किंचाळण्याचा आवाज येतो.

जिन्यावरून धावत बाई खून खून करीत घाबरल्या स्थितीत वंदना येते.सगळे स्तब्ध ! आरंभ जॉकेटवर घालून खुनाची चौकशी करतो.स्वतः पोलिस निरीक्षक असल्याचा परिचय देऊन मॅनेजरची हत्या केल्याचे अज्ञात फोनवरून कळल्यानंतर गेस्ट हाऊसमध्ये असलेल्या सर्वांची तपासणी करतो.तपासाअंती माणिक याने मर्डर केल्याचे निष्पन्न होते.गेस्ट हाऊसची मालमत्ता, मालकाचे अपंगत्व तिजोरी फुटलेली,या सर्व गोष्टी रणपिसे बाहेर काढतो.शेवटी माणिक आपल्या कबुलीत सीमेवर



लढणारा जवान असताना त्याचे तरुण मुलीला याच गेस्ट हाऊसचे मॅनेजरने रेप करून मारून जंगलात फेकतो. म्हणून सुडभावनेने माणिक वेष बदलून अंधार व गेस्ट हाऊसमध्ये थांबणाऱ्यांचा आडोसा घेत खून करतो. सर्व पादत्राणे घालून असतात. पण तो अनवाणी असल्याने त्याचेवर रणपिसेचा संशय असतो.लेखक ओंकार आपटे एक पत्रकार असल्याचे समोर येते.उच्चशिक्षित महिला वनस्पती शास्त्राच्या प्राध्यापिका असून कामावरची बाई वंदना ही प्रामाणिकपने पोटासाठी जंगलात गेस्ट. हाऊस मध्ये काम करते. माणिकने घेतलेल्या बदल्याचे समर्थन इतरांनी केले असले तरी रणपिसे कायद्याने अटक करतो. मुलीच्या कानातील झुमक्याने माणिक गहिवरते.अशा आशयाचे नाटक सावज कोण आणि पारध कोण या रहस्येतून बाहेर येते.

नाटक कसे चालले हे बघताना रणपिसे पोलीस खाक्यात शिरतात पण होमगार्ड कधी झाले याचा पत्ता न अभिनयातील बेरिंग सुटल्याचे दिसते.माणिक जवान असल्याचे शिस्त किंवा विनोदाचे जागी फार जागा घेत नाही.रंजना थोडी फार नाटकात जाण्याचा अभिनय करते.पाठांतर दिसले तरी संवादातील रस उत्पत्तीची जागा ओंकार लेखक म्हणून घेऊ शकले नाही. लयबद्ध अभिनय व शंका निर्माण करणारे हावभाव सस्पेक्टेड दिसल्या नाही. शब्द फेक व कायिक अभिनयाची सांगड दिसावी. दादाराव हे ज्येष्ठ(वय) रंगकर्मी दिसतात.मात्र नाटकात दिसले नाही. नाटकातील विनोदाच्या जागा खुलवण्याचे प्रयत्न ओंकार व प्राध्यापिका संवादात दिसले नाही.संगीत दार ठोठावण्यापासून पार्श्व जागा सोडून भासले. संवाद दाबणारे ध्वनी.तांत्रिक जुगाड बिघाड मूळ. प्रकाशात रेड लाईट अधिक वापर.वीज गेल्याचे अंधारात असलेले चित्र यामुळे नेपथ्यावर पडलेल्या प्रकाशात जिना जाताना चा रस्ता पण येताना दुसरा होता का? रात्रभर नाटक असल्याने तिथे काही प्रॉपर्टी बदलण्याचे चान्स नव्हते.पोलिस इस्पेक्टर रणपिसे हे गण वेळीच नसल्याने आतल्याआत गण गण गणात बोते सारखे झालें.वेळीच ओंकार वाक्य सावरत

## एक टक नाटक
### समीक्षण

ओंकारचे अभिनयातील लवचिकपना नसल्याचे कृत्रिम अभिनय जाणवतात.कारण पाठांतरासोबतच असताना दिसलें.फॉरेस्ट मधील गेस्ट हाऊस तेही जुने नेपथ्यात दिसले नाही.

सावज शोध घेण्यात नाटकातील सस्पेन्स वळणावर येण्यासाठी त्यात असलेल्या तत्त्वज्ञानात वर्तमान परिस्थितीचे पुरावे आणि रामायण महाभारताचे दाखले. लेखकाने मांडले. असले तरी भारतीय जवानाच्या मुलीवर झालेल्या अत्याचारा मागे जंगली गेस्ट हाऊस निवडणे हा लेखकाचा मानस काय असावा हे कळले नाही.दर्शक बऱ्यापैकी होतें.कामगार कल्याण केंद्र धामणगाव रेल्वे यांच्या वतीने लेखक इंजिनिअर अशोक काळे,राजेंद्र कानिटकर,विनायक लांजेवार, सुधीर खुजणारे,विजया काळे, मोनालिसा काळे व राजेश्री किर्तीकर या कलावंतांनी सावज सादर केले.संगीत तुषार सोरगीवकर,प्रकाश योजना मंगेश पांडे,रंगभूषा विनोद सुरुसे वेशभूषा विजया काळे या सर्वांना डायरेक्शन अभियंता अशोक काळे यांचे होते.रहस्यमय सामाजिक घटनेवर आधारित नाटकाचा शिखरबिंदू कारुण्यकडे व सामाजिक जाणिवेवर लेखकाने नेला. एकटक नाटक बघताना प्रेक्षकांना काय कळले हे तूर्त अज्ञात.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

# ग्रामीण पाणीटंचाईवर मात करण्यासाठी काटेकोर नियोजन करा

## आमदार रणधीर सावरकर यांचे कडक निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना आमदार रणधीर सावरकर यांनी दिल्या. मतदारांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तत्काळ उपाययोजना करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली.



मार्च महिन्यात वाढत्या तापमानामुळे ग्रामीण भागात पाण्याची समस्या तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन 'अमृत जल' योजना प्रभावीपणे राबवून प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी शासनस्तरावर सुरू असलेल्या प्रयत्नांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला पूर्णत्व देण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्याचे निर्देश आमदार सावरकर यांनी दिले.

बैठकीत ६० खेडी खाम्बोरा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सुमारे ६७.९३ कोटी रुपयांच्या या योजनेचे काम प्रगतीपथावर असून गावनिहाय अडचणी समजून घेण्यात आल्या. घुसर व परिसरातील गावांसाठी अतिरिक्त संप बांधकाम, उंच टाक्यांसाठी अतिरिक्त विद्युत पंप बसविणे यांसारख्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या सुधारित कामांसाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे.

दरम्यान, सुधारित ८९.६६ कोटी रुपयांच्या प्रशासकीय प्रस्तावाला मंजुरी मिळावी यासाठी मुंबई येथे २३ मार्च २०२६ रोजी बैठकीचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासंदर्भात जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी आमदार सावरकर यांनी दूरध्वनीवरून चर्चा केली. जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन तातडीने आराखडा तयार करून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अमरावती आयुक्तांकडे सादर करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. या बैठकीस जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी, अभियंते, कंत्राटदार तसेच पीएमसी प्रतिनिधी उपस्थित होते. ग्रामीण व शहरी भागातील मूलभूत सुविधांसाठी आमदार रणधीर सावरकर सातत्याने पाठपुरावा करत असून, विशेषतः खारपान पट्ट्यातील पाणी समस्यांवर उपाययोजना करण्यावर भर देत असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे, असेही त्यांनी बजावले.

# सशक्त महिलाच सक्षम समाजाची पायाभरणी

## जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे प्रतिपादन

■ प्रतिनिधी | अकोट ■

महिला सर्व क्षेत्रात अग्रेसर असून महिलांबाबत कोणताही लिंगभेद न करता सर्वांगीण विकासासाठी सर्व क्षेत्रात प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले. त्या अकोट नगर परिषदेच्या वतीने आयोजित महिला मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या.



अकोट नगर परिषदेने आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला दिनाचे औचित्य साधून महिला व बालकल्याण समिती तसेच दीनदयाल अंत्योदय योजना (शहरी) यांच्या वतीने झुनझुनवाला अतिथी गृह, अकोट येथे महिला मेळाव्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. माया विवेकराव धुळे होत्या.


या मेळाव्यास प्रथमेश बोरोडे (उपाध्यक्ष, नगर परिषद अकोट), मनीष कराळे (सभापती, आरोग्य विभाग), अमोल पालेकर (सभापती, पाणीपुरवठा), नगमा अंजुम खालीद जमा (सभापती, शिक्षण), सौ. नैना विशालराव इंगोले (सभापती, महिला व बालकल्याण), ॲड. राधिका देशपांडे, डॉ. गुंजन वालसिंगे, शशिकांत बाबर (मुख्याधिकारी, नगर परिषद अकोट), सुनील चव्हाण (तहसीलदार, अकोट) व सुधीर थेटे (नायब तहसीलदार, अकोट) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रारंभी महिला व बालकल्याण समितीच्या कामकाजाबाबतची माहिती सौ. नैना विशालराव इंगोले यांनी आपल्या प्रस्तावनेतून दिली.

महिला आपल्या कार्यक्षेत्रात जिद्दीने यश मिळवत असून त्यांच्या प्रगतीसाठी नगरपरिषद प्रशासन सदैव तत्पर असल्याचे मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी सांगितले. यावेळी डॉ. गुंजन वालसिंगे यांनी महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले, तर ॲड. राधिका देशपांडे यांनी कायदेविषयक माहिती दिली. कार्यक्रमात नव्याने शासकीय सेवेत रुजू झालेल्या गुणवंत मुलींचा त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला. तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या पाककलेचे प्रदर्शन, नृत्य स्पर्धा व वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विजेत्यांना मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रत्येक स्त्री ही जिजाऊ आणि सावित्रीची लेक असून तिने स्वतःला कमजोर न समजता आपल्या कार्यकर्तृत्वातून कुटुंबासह समाजाचा विकास साधावा, असे विचार नगराध्यक्षा सौ. मायाताई विवेकराव धुळे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी नगरसेवक, नगरसेविका, महिला बचत गट तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. नगराध्यक्षा सौ. माया धुळे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा; पातुर तालुक्यात उभे पीक जमीनदोस्त



### पंचनामे करून तातडीच्या आर्थिक मदतीची शेतकऱ्यांची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यात गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने मोठा तडाखा दिला. या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक गावांतील शेतकऱ्यांचे उभे पीक अक्षरशः जमीनदोस्त झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

तालुक्यातील सुकळी शिवारात परशराम हरिभाऊ ताले यांच्या शेतातील सुमारे पाच एकरांवरील पपईचे पीक पूर्णपणे नष्ट झाले. तसेच पांगरा, हिवरा आदी परिसरातील शिवारातही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. केशव चिपडे, दिगंबर चिपडे, अर्जुन देशमुख, सुभाष मुळे, विजय खोंड, केशव खोंड, दिलीप खोंड, पांडुरंग मुके, सागर देशमुख, महादेव हरमकार, मोहन संसारे, जिंकू जाधव, विश्वनाथ मुळे, कैलास देशमुख, हरिभाऊ, गणेश कोकाटे, महादेव गवई, गोपाल खोंड, किशोर सुडोकार, गजानन कराळे, श्रीराम कराळे, परशराम पवार, दयाराम चिपडे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

या वादळ-पावसामुळे पपई, मका, लिंबू, कांदा, केळी, हरभरा आणि गहू या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे.

अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी पिके पूर्णपणे आडवी झाली आहेत. दरम्यान, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे. वेळेत मदत न मिळाल्यास शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# ३१ मार्च पूर्वी हयातीचा दाखला न दिल्यास दिव्यांगांचा भत्ता थांबणार

**अकोला :** महानगरपालिकेच्या समाज कल्याण व विकास विभागाकडून दिव्यांग लाभार्थ्यांसाठी महत्त्वाचा इशारा देण्यात आला आहे. शासकीय योजनांचा लाभ अखंडित सुरू ठेवण्यासाठी लाभार्थ्यांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी हयातीचा दाखला व वचनपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्यथा मार्चनंतर मिळणारा उदरनिर्वाह भत्ता थांबण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. महापालिकेकडून सुमारे ४० टक्के किंवा त्याहून अधिक दिव्यांगत्व असलेल्या सुमारे ५,५०० लाभार्थ्यांना दरमहा उदरनिर्वाह भत्ता दिला जातो. याशिवाय दिव्यांगांच्या विवाहासाठी एकवेळ अनुदानाचीही योजना राबविण्यात येते. मात्र, या सर्व योजनांचा लाभ सुरू ठेवण्यासाठी हयातीचा दाखला आणि वचनपत्र सादर करणे आवश्यक आहे. समाज कल्याण विभागाने लाभार्थी तसेच त्यांच्या नातेवाईकांना आवाहन केले आहे की, आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत. अन्यथा विलंब झाल्यास लाभ खंडित होऊ शकतो.

# १३ थेट सरपंच व १२६ सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक

■ प्रतिनिधी | अकोला ■

राजीनामा, निधन, अनर्हता आदी कारणांमुळे रिक्त झालेल्या ग्रा. पं. सदस्य, थेट सरपंच पदांच्या निवडणुकांसाठी कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने घोषित केला आहे.

त्यात अकोला जिल्ह्यातील ७६ ग्रामपंचायतीतील १३ थेट सरपंच पदे व १२६ रिक्त सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. या अनुषंगाने आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन व्हावे व निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत.

कार्यक्रमानुसार, तहसीलदारांनी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करण्याची तारीख ३० मार्च आहे.

# महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्काराने जनाई निराधार वृद्धाश्रमाचा गौरव

### अकोट तालुक्याच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा

■ प्रतिनिधी | अकोला ■

सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या वसाळी नागापूर बोर्डी येथे कार्यरत असलेल्या जनाई निराधार वृद्धाश्रमाला महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांसाठी निस्वार्थ सेवा देणाऱ्या या संस्थेच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.



मुंबईतील प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे ७ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अकोला येथील प्रीतीसागर बहुउद्देशीय संस्था संचालित जनाई निराधार वृद्धाश्रम गेल्या काही वर्षांपासून नागापूर बोर्डी परिसरात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांना निवारा, अन्न व मूलभूत सुविधा निशुल्क उपलब्ध करून देत आहे. या सेवाभावी कार्यामुळे संस्थेची समाजात वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

सन २०१४ पासून प्रीतीसागर बहुउद्देशीय संस्था विविध सामाजिक उपक्रम राबवत असून बेघर व निराधार नागरिकांना मदत, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, महिलांवरील अन्याय-अत्याचारांविरोधात लढा तसेच बालकांना कायदेशीर मार्गदर्शन अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली जात आहे.

या कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष जनार्दन जामनिक, सचिव एस्तेर जामनिक, कोषाध्यक्ष सुदेश रजाने तसेच विक्की वाकोडे, समीर स्वामी आणि श्रीकांत शिरसाट यांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

दरम्यान, महिला शक्तीचा गौरव करणाऱ्या या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'महिला सन्मान पोर्टल'चे अनावरण, आयोग कार्यालयातील 'सायबर वेलनेस' कक्षाचे उद्घाटन आणि 'आत्मसन्मानाच्या वाटा' या पुस्तक व भित्तीपत्राचेही अनावरण करण्यात आले.

**Change In Name**
I Have Changed My Name From
SACHIN TEJRAMJI KHEKDE
-TO-
SACHIN TEJRAMJI KHEKADE
My Residential Address in:- Sewagram Road Telicome Nagar Masala Wardha 442001

**Change In Name**
I Have Changed My Name From
MOHAMED IDRIS BHAI ISMAIL BHAI MALAK
-TO-
MOHAMMAD IDRIS ISMAIL BHAI MALAK
Passport No :-A6883190
My Residential Address in:- Opp Kachi Masjid, Mohammad Ali chowk Akola 444001

**Change In Name**
I Have Changed My Name From
RAZIYA BANU MOHAMED IDRIS BHAI MALAK
-TO-
RAZIYA BANO IDRIS MALAK
Passport No :-A6883190
My Residential Address in:- Opp Kachi Masjid, Mohammad Ali chowk Akola 444001

# जनगणनाविषयक प्रशिक्षण सोमवारपासून

**अकोला :** जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी जनगणनाविषयक प्रदर्शन दि. २३ ते २५ मार्च दरम्यान नियोजनभवनात होणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत सोमवारी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे.

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४२०/२०२६ — प्रोसेस नं. ३२५९/२०२६
चौ.ता. २७/०४/२०२६ — दिनांक : १०/०३/२०२६

**अर्जदार :** १. कस्तुराबाई देवीदास गवई २. सुनिल देवीदास गवई ३. नितीन देवीदास गवई ४. जगन देवीदास गवई १ ते ४ रा. लोणाग्रा, ता. जि. अकोला. ५. पद्मा संतोष सावळे रा. हाता, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : देवीदास सत्ताजी गवई
**पत्ता :-** रा. व्दारा कस्तुराबाई देवीदास गवई रा. लोणाग्रा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत देवीदास सत्ताजी गवई यांचे दि. ०५/०९/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४१६/२०२६ — प्रोसेस नं. ३६३३/२०२६
चौ.ता. २३/०४/२०२६ — दिनांक : १६/०३/२०२६

**अर्जदार :** १. मंजुषा जयवंतराव पाटील रा. लोणाग्रा, ता. जि. अकोला. २. अर्पित जयवंत पाटील रा. एल २-५०३, हरी गंगा सोसायटी, न्यु आरटीओ, येरवडा, पुणे सिटी, ता. जि. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नितीन उर्फ जयवंतराव विनायकराव पाटील
**पत्ता :-** रा. लोणाग्रा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नितीन उर्फ जयवंतराव विनायकराव पाटील यांचे दि. २३/११/२००८ रोजी लोणाग्रा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३९२/२०२६ — प्रोसेस नं. ३२५५/२०२६
चौ.ता. २०/०४/२०२६ — दिनांक : १०/०३/२०२६

**अर्जदार :** १. संजय मेंहबर इंगळे रा. आस्टुल, ता. पातूर जि. अकोला. २. सौ. सिंधू संजय इंगळे रा. शास्त्री नगर, सिंधी कॅम्प, खदान, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : निशा संजय इंगळे
**पत्ता :-** रा. शास्त्री नगर, सिंधी कॅम्प, खदान, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निशा संजय इंगळे यांचे दि. २२/०८/२०१९ रोजी शासकीय महाविद्यालय नागपूर, ता. जि. नागपूर. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३७६/२०२५ — प्रोसेस नं. ४०२/२०२५
चौ.ता. २०/०२/२०२६ — दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. शुद्धोधन रामधन गोपनारायण रा. घुसर, ता. जि. अकोला. २. सौ. उषा भारत जामनिक रा. शिलोडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** सौ. आशा संतोष गवई आंबेडकर नगर, नविन बस स्टॅंड मागे, अकोला. ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामधन दौलत गोपनारायण
**पत्ता :-** रा. घुसर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम १२ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामधन दौलत गोपनारायण यांचे दि. ०१/०७/२०२२ रोजी राहत्या घरी घुसर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**बार्शिटाकळी नगरपंचायत**
**बार्शिटाकळी जि. अकोला.**
दुरध्वनी क्रं २५२८२५-०७२५५.
Email: nagarpanchayat.barshitakali@gmail.com

जाक्र/नपबा/साप्र/वार्षिक निविदा/मुदतवाढ/२०२६/४०३ दिनांक- २०/०३/२०२६

**निविदा मुदतवाढ सुचना**

बार्शिटाकळी नगरपंचायत कार्यालयाकरीता सन- २०२६ - २७ या आर्थिक वर्षाकरीता नगरपंचायतच्या विविध विभागासाठी दिनांक: १४ मार्च २०२६ रोजी या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर सुचनेमध्ये निविदा फॉर्म भरण्याचा अंतिम दिनांक २० मार्च २०२६ असा नमूद करण्यात आला होता. या जाहीर सुचनेद्वारे सदर निविदा फॉर्म भरण्याकरीता मुदतवाढ देण्यात असून सुधारीत अंतिम दिनांक २७ मार्च २०२६ असा आहे. याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

शिक्का
**(राहुल कंकाळ)**
**मुख्याधिकारी**
बार्शिटाकळी नगरपंचायत

# पातुर तालुक्यात पोटनिवडणुकीची रणधुमाळी


## पाच गावांत आचारसंहिता लागू

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील सरपंच व सदस्यांच्या रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून संबंधित पाच गावांत आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातून याबाबत आदेश प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तालुक्यातील तुलंगा खुर्द व गोंधळवाडी येथे थेट सरपंच पदासाठी तर गोंधळवाडी, झरंडी, कोसगाव आणि बाभुळगाव येथे सदस्य पदांसाठी मतदान होणार आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून १७ मार्च २०२६ पासून निकाल लागेपर्यंत संबंधित गावांच्या हद्दीत आदर्श आचारसंहिता लागू राहणार आहे. प्रशासनातील सर्व विभागांना आवश्यक ती कार्यवाही करून नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.




***उमेदवारीसाठी गावागावात हालचालींना वेग***

*पातुर तालुक्यातील दोन सरपंच पदांसह सदस्यांच्या रिक्त जागांसाठी इच्छुकांमध्ये चुरस निर्माण झाली आहे. उमेदवारी मिळविण्यासाठी गावपातळीवर प्रतिष्ठित नागरिकांच्या बैठका सुरू झाल्या असून मतदारांशी भेटीगाठी वाढल्या आहेत. अनेक इच्छुक उमेदवार अर्ज दाखल करण्याच्या तयारीत असल्याने निवडणुकीचे वातावरण रंगू लागले आहे.*

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅंडच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com





# स्वातंत्र्याची ७८ वर्षे उलटली, अद्यापही हिवरा गाव 'वनवासात'!

## लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षानंतर गावकरी सरसावले, लोकवर्गणीतून रस्त्याचे काम सुरू

**सेलु/ अभय बेदमोहता**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली. गगनाला भिडणाऱ्या विकासाच्या गप्पा मारल्या जात आहेत, मात्र हिंगणघाट मतदारसंघातील सिंदी रेल्वे नजिकच्या हिवरा (बांगडे) या गावाची अवस्था पाहिल्यास 'विकास' नेमका कुठे गेला, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. लोकप्रतिनिधींच्या सततच्या दुर्लक्षामुळे त्रस्त झालेल्या गावकऱ्यांनी अखेर कोणाचीही वाट न पाहता लोकवर्गणी गोळा केली आणि विजय उराडे (महाराज) यांच्या पुढाकारातून 'हिवरा-पिपरा' या पांदन रस्त्याच्या साफसफाई व मातीकरणाचे काम स्वबळावर सुरू केले आहे.

एकेकाळी ५०० लोकवस्तीचे हे समृद्ध गाव आज रस्ता आणि मूलभूत सोयींअभावी ओसाड पडू लागले आहे. पक्क्या रस्त्याअभावी इथल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले असून, आज गावात जेमतेम ५० नागरिक उरले आहेत.

विशेष म्हणजे, आजच्या हायटेक युगातही या गावाने अद्याप एसटी बसचे तोंड पाहिलेले नाही. रस्ता नसल्याने बस येत नाही आणि बस नसल्याने शालेय विद्यार्थ्यांना दररोज मैलोन्मैल पायपीट करावी लागते.

या रस्त्याची अवस्था इतकी भीषण आहे की, शेतीचा कणा असलेली बैलबंडी सुद्धा या मार्गावरून नीट चालवता येत नाही. पावसाळ्यात तर हा रस्ता चिखलाचे साम्राज्य बनतो. आजारी रुग्ण किंवा गरोदर मातांना दवाखान्यात न्यायचे असल्यास डोली करून न्यावे लागते. निवडणुका आल्या की नेते मतांच्या झोळीसाठी येतात, पण आमच्या हक्काच्या रस्त्यासाठी मात्र कोणीही फिरकत नाही. जिथे बैलबंडी नीट जात नाही, तिथे प्रगती कशी होणार असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत.

### १५ वर्षांचा वनवास आणि तुटलेली आश्वासने

सुमारे ३० वर्षांपूर्वी माजी आमदार स्वर्गीय प्रमोदबाबू शेंडे यांनी या रस्त्याचे मातीकरण केले होते. त्यानंतर मतदारसंघाच्या पुनर्रचनेत हे गाव हिंगणघाट मतदारसंघात आले. गेल्या १२ वर्षांपासून आ. समीर कुणावार या भागाचे नेतृत्व करत आहेत, मात्र या दुर्गम भागाचा प्रश्न त्यांच्या अजेंड्यावर कधी आलाच नाही. ग्रामस्थांनी अनेकदा निवेदने दिली, उंबरठे झिजवले, पण पदरी फक्त आश्वासनांची बोळवण पडली.

### ३५० वर्षांचे मंदिर दुर्लक्षित

हिवरा शिवारात 'रिठाचा मारुती' म्हणून प्रसिद्ध असलेले ३५० वर्षांचे प्राचीन हनुमान मंदिर आहे. संपूर्ण विदर्भातून भाविक येथे नवसाला येतात. मात्र, रस्ता नसल्यामुळे भाविकांना आणि महाप्रसादासाठी येणाऱ्यांना मोठी कसरत करावी लागते. धार्मिक पर्यटन वाढण्याची संधी असताना केवळ रस्त्याअभावी या क्षेत्राचा विकास खुंटला आहे.

### स्वावलंबनाचा नवा आदर्श

### १५ शेतकऱ्यांचा पुढाकार

प्रशासन आणि लोकप्रतिनिधी 'गेंड्याची कातडी' पांघरून बसले असल्याने, अखेर विजय उराडे (महाराज) यांच्या नेतृत्वात गावकऱ्यांनी स्वतः कंबर कसली आहे. या रस्त्यासाठी गावातील १५ शेतकऱ्यांनी प्रत्येकी २००० रुपये लोकवर्गणी जमा केली. या जमा झालेल्या निधीतून हिवरा-पिपरा रस्त्यावरील १ किलोमीटर अंतराचे मातीकरण व जेसीपीच्या साहाय्याने झाडेझुडपे काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. गावकऱ्यांनी स्वबळावर सुरू केलेले हे काम सध्याच्या यंत्रणेच्या तोंडावर एक मोठी चपराक मानली जात आहे.

आम्ही किती दिवस लोकप्रतिनिधींच्या आश्वासनांवर जगणार आमच्या मुलांचे शिक्षण आणि आरोग्य रस्त्याअभावी टांगणीला लागले आहे. म्हणून आम्ही स्वतःच पैसे जमा करून रस्ता दुरुस्तीचा निर्णय घेतला.

**विजय उराडे (महाराज), शेतकरी हिवरा (बांगडे)**

# बोर व्याघ्र प्रकल्पात जिप्सी चालक आणि वन अधिकाऱ्यांमध्ये ठिणगी

## दंडात्मक कारवाईमुळे संताप

**सेलु/ जनमाध्यम**

बोर व्याघ्र प्रकल्पातील (बोरधरण गेट) जिप्सी चालक, मालक आणि निसर्ग मार्गदर्शक (गाईड्स) यांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत १० दिवसांचे निलंबन आणि प्रत्येकी २००० रुपये दंडासह माफीनामा मागितल्याने चालक-मालकांनी आता संघर्षाची भूमिका घेतली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. १६ मार्च २०२६ रोजी काही जिप्सी वेळेपूर्वीच बफर क्षेत्रात फिरत असल्याचा आरोप वन विभागाकडून करण्यात आला होता. या कारणावरून चार जिप्सी आणि गाईड्सना १० दिवसांसाठी निलंबित करण्यात आले. मात्र, जिप्सी चालकांचे म्हणणे आहे की, पर्यटकांच्या आग्रहामुळे आणि वाघ रस्त्यावर बसलेला असल्याने त्यांना बाहेर पडायला १५ मिनिटे उशीर झाला. ही बाब त्यांनी लेखी स्वरूपात कळवूनही त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली. निलंबित जिप्सी चालकांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात खालील मुद्दे उपस्थित केले आहेत. चर्चेसाठी वेळ मागितली असता अधिकाऱ्यांनी प्रतिसाद न देता नागपूरला निघून जाणे पसंत केले. विनाकारण १० दिवसांचे निलंबन करून २००० रुपये दंड आणि माफीनामा मागणे हे मानसिक खच्चीकरण करणारे आहे. एका बाजूला चार जिप्सी निलंबित केल्या असतानाच, दुसऱ्या बाजूला एका विशिष्ट जिप्सीला (क्रमांक १३०७)



अचानक परवानगी कशी मिळाली, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. अडेगाव गेटवरून येणाऱ्या जिप्सींना सवलत दिली जाते, मात्र बोर गेटवरील चालकांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचा आरोप पत्रात करण्यात आला आहे.

**युद्धापेक्षा चर्चेचा मार्ग निवडा**

आम्ही नेहमीच वन विभागाला सहकार्य केले आहे, मात्र आता आमच्या रोजीरोटीवर गदा येत आहे, असे चालकांनी पत्रात म्हटले आहे. परिस्थिती अधिक चिघळण्यापूर्वी प्रशासनाने चर्चेचा मार्ग स्वीकारावा, अन्यथा व्याघ्र प्रकल्पाच्या बदनामीला सामोरे जावे लागेल, असा इशाराही जिप्सी चालक व निसर्ग मार्गदर्शकांनी दिला आहे. या पत्रावर शुभम पाटील, मनोज वाघमारे, सुरज सरोदे, विनोद मडावी, आणि निलेश कोहळे, यांसह अनेक चालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता या वादावर वन विभाग काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**समुद्रपूर** - तालुक्यातील भोसा येथील एका तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. रविंद्र उर्फ पिंटू ठाकरे असे मृत तरुणाचे नाव आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी सिंदी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. पुढील तपास सुरू असून कारणांचा शोध घेतला जात आहे. युवकांमध्ये वाढत्या आत्महत्यांच्या घटनांमुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त

### भाचीच्या पडण्यावरून वाद; दगड मारून तरुण जखमी

**वर्धा**-भाची भिंतीवरून पडल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाला दगड मारून जखमी करण्यात आल्याची घटना देवळीतील काळ्या पुलाजवळ घडली. गोलू कोटनाके याची भाची रस्त्यालगत असलेल्या भिंतीवर चढली होती. तिला खाली पडशील, असे सांगत नितीन चौधरी यांनी तिला टोकले. त्यानंतर मुलीने स्वतः उडी घेतल्याने तिला किरकोळ दुखापत झाली. याच मुद्द्यावरून गोलू कोटनाके यांनी नितीन यांच्या घरासमोर जाऊन वाद घालत दगडफेक केली. यात नितीन जखमी झाले. या प्रकरणी नितीन चौधरी यांच्या तक्रारीवरून देवळी पोलिसांनी गोलू कोटनाके याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### दुचाकी चोरी

हिंगणघाट - शहरातील तुळसकर लॉन येथे रिसेप्शन कार्यक्रमाला गेलेल्या महिलेची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. अनुपमा अंबादास येसमबरे या कार्यक्रमासाठी दुचाकीने गेल्या होत्या. कार्यक्रम आटोपल्यानंतर बाहेर येताच त्यांना दुचाकी जागेवर दिसली नाही. परिसरात शोध घेतला असता दुचाकी चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी त्यांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

# अहिरवाडा भवानी मंदिराच्या विकासाला गती; दीड कोटींच्या कामांचे भूमीपूजन

**आर्वी/ जनमाध्यम**

विदर्भातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अहिरवाडा येथील स्वयंभू जगदंबा भवानी माता मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. आमदार सुमित वानखेडे यांच्या हस्ते गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुमारे १ कोटी ५२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमीपूजन करण्यात आले. या उपक्रमामुळे मंदिर परिसराचे संरक्षण, सौंदर्यीकरण व सुविधा वाढविण्यास मोठी चालना मिळणार आहे.

निम्न वर्धा प्रकल्पाच्या बॅकवॉटरचा परिणाम लक्षात घेता मंदिराच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. यामध्ये सुमारे ७१ लाख रुपयांच्या खर्चातून संरक्षक भिंत बांधकाम व बगीचा विकास कामाचा समावेश असून दुसऱ्या टप्प्यात ८१ लाख रुपयांची अतिरिक्त संरक्षक भिंत उभारण्यात येणार आहे. या कामांमुळे नदीकाठच्या धोक्यापासून मंदिर सुरक्षित राहणार आहे.



इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जाणारे हे मंदिर राजा भीमकाच्या काळाशी निगडित असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या ठिकाणाला धार्मिकतेबरोबरच सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्वही प्राप्त झाले आहे. मंदिर परिसरात होणाऱ्या सौंदर्यीकरणामुळे पर्यटनाच्या दृष्टीनेही या ठिकाणाची ओळख अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या विकासकामांमुळे चैत्र व आश्विन नवरात्रोत्सवाच्या काळात येणाऱ्या हजारो भाविकांना सुविधा उपलब्ध होणार असून त्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व सोयीस्कर होणार आहे. स्थानिक ग्रामस्थ, महिला व युवकांमध्ये या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त होत आहे. भूमीपूजन सोहळ्यास ग्रामपंचायत पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# सणांची चाहूल, पोलिसांचा सज्ज इशारा

## गिरडमध्ये रूट मार्च; शांतता राखण्याचे कडक आवाहन



**समुद्रपूर/ जनमाध्यम**

येत्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या रामजन्म उत्सव, रमजान ईद आणि हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर गिरड येथे पोलिस प्रशासन सतर्क झाले असून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शुक्रवारी सकाळी भव्य रूट मार्च काढण्यात आला. गावातील मुख्य मार्गांवरून निघालेल्या या रूट मार्चने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार विकास गायकवाड यांच्या नेतृत्वात हा रूट मार्च पार पडला. यामध्ये पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच गृहरक्षक दलाचे जवान मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी ठाणेदार विकास गायकवाड यांनी नागरिकांना स्पष्ट शब्दांत आवाहन केले की, शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करून सर्व सण उत्सव गुणागोविंद्याने आणि शांततेत साजरे करावेत. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर गिरड पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठकही आयोजित करण्यात आली. ठाणेदार विकास गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत विविध समाजातील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार सर्व सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करून सण शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. या वेळी पोलिस उपनिरीक्षक गोमेद पाटील यांच्यासह शांतता समितीचे सदस्य अब्दुल रहीम, गुड्डू भाई, सलीम पटेल आणि अब्दुल कादिर उपस्थित होते.

# गुढीपाडव्याच्या साक्षीने जुळले सहा संसार

## एकोप्याचा मंगल सोहळा



**कारंजा (घाडगे)/ जनमाध्यम**

गुढीपाडव्याच्या पावन मुहूर्तावर कारंजा येथे भोयर, पवार विद्यार्थी मंडळातर्फे आयोजित भव्य सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा उत्साहात आणि मंगलमय वातावरणात पार पडला. समाजातील एकोप्याचा, साधेपणाचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा सोहळा यंदा १६ व्या वर्षात पदार्पण करताना विशेष ठरला.

मागील १६ वर्षांपासून सातत्याने आयोजित होत असलेल्या या उपक्रमात यावर्षी एकूण ६ जोडपी विवाहबद्ध झाली. विविध धर्मीय कुटुंबांना एकत्र आणत सर्वधर्म समभाव सोहळ्यातून पुन्हा एकदा अनुभवायला मिळाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष हेमंत ढोले होते, तर उद्घाटन वर्धा लोकसभा क्षेत्राचे खा. अमर काळे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून आ. सुमित वानखेडे, आणि विधान परिषद आ. दादाराव केचे उपस्थित होते. याशिवाय अनेक मान्यवर, समाजसेवक व प्रतिष्ठित व्यक्तींची मंचावर उपस्थिती लाभली. उद्घाटनपर भाषणात कार्याचे कौतुक करत, सामूहिक विवाह ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित केले. विवाहातील अवाढव्य खर्च टाळून नवदांपत्यांनी समजूतदारपणे आणि आनंदाने आयुष्य जगावे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. मंचावरील मान्यवरांनी नवदांपत्यांना आशीर्वाद देत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. तसेच मंडळातर्फे सर्व वधू-वरांना भेटवस्तू देऊन त्यांच्या नव्या

समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी आर्थिक व वस्तुरूपात मदत करून या उपक्रमाला हातभार लावला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक टिकाराम घागरे यांनी केले, संचालन धनंजय मानमोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन हेमंत बन्नगरे यांनी मानले. या भव्य सोहळ्याच्या यशासाठी मंडळाचे पदाधिकारी, सल्लागार मंडळ, महिला मंडळ व समाजबांधवांचे मोलाचे योगदान लाभले.

# बांधली स्मशानभूमी पण वापरासाठी बंदी

## नागरिकांचा संताप; आर्वीत प्रशासनाला अल्टिमेटम



**आर्वी/ जनमाध्यम**

संजय नगर, आर्वी येथील स्मशानभूमीचे बांधकाम पूर्ण होऊनही ती अद्याप सुरू करण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेली ही सुविधा बंद असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर शुभांगी भिवगडे व रवी गाडगे यांनी नगराध्यक्ष स्वाती गुल्हाने, उपाध्यक्ष गौरव जाजू तसेच मुख्याधिकारी किरण सुकलवाड यांना निवेदन देत स्मशानभूमी तात्काळ सुरू करण्याची मागणी केली. नागरिकांच्या या मागणीची दखल घेत प्रशासनाने तातडीने हालचाल केली. यानंतर आरोग्य सभापती संजय थोरात, स्वीकृत सदस्य प्रशांत ठाकूर, प्रकाश गुल्हाने, ध्यानदेव साठे, बांधकाम अभियंता साकेत राऊत व आरेकर यांच्या उपस्थितीत संबंधित स्मशानभूमीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. करून ही स्मशानभूमी पुढील ८ दिवसांत नागरिकांच्या सेवेत सुरू करण्याचे कडक निर्देश संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आले.

**नावात बदल**

माझे पूर्वी MANJULA BHAURAO KOLODE असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील MANJULABAI WASUDEVRAO DHOLE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जाते आहे.

**पत्ता :- वायगाव वर्धा ४४२००१**

# पहाटेच्या सुरांत नववर्षाचा मंगल गजर

## पुलगावात पाडवा पहाट उत्साहात

**पुलगाव/ जनमाध्यम**

चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर पुलगाव शहर नववर्षाच्या स्वागतासाठी सज्ज झाले असून पाडवा पहाट या सांस्कृतिक सोहळ्याने शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पारंपरिकतेची नाजूक किनार आणि सुरेल स्वरांची साथ लाभलेला हा कार्यक्रम नागरिकांसाठी एक अनोखा आनंदसोहळा ठरणार आहे.

विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुलगाव आणि पाडवा पहाट आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी



नववर्षाची सुरुवात आनंद, संस्कृती आणि संगीताच्या माध्यमातून साजरी करण्याचा हा उपक्रम शहराच्या सांस्कृतिक जाणीवा अधिक बळकट करणारा ठरत आहे. या पाडवा पहाट कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक राहुल खरे, आम्रपाली पगारे तसेच कु. कल्याणी भांडे आणि त्यांच्या सहकारी कलाकारांचे सुमधुर सादरीकरण रंगणार आहे. विशेष म्हणजे इंडियन आयडल या लोकप्रिय कार्यक्रमातील कलाकारांची उपस्थिती हा सोहळा अधिक आकर्षक बनवणार आहे. १९ मार्च २०२६ रोजी पहाटे ५.३० ते ८.३० या वेळेत पंडित दीनदयाल उपाध्याय चौक, बालाजी हॉटेल समोर, नाचणगाव येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे. पहाटेच्या गारव्यामध्ये सुरेल गाण्यांची मैफल रंगणार असून नववर्षाच्या स्वागतासाठी एक अविस्मरणीय वातावरण निर्माण होणार आहे. आयोजन समितीचे अध्यक्ष बबन बरवड आणि विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पांडे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक पर्वाचा आनंद लुटण्याचे आवाहन केले आहे. नववर्षाच्या स्वागताची ही सुरेल पहाट पुलगावकरांच्या मनात कायमची घर करून जाणार आहे!

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ११३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉं फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

**संपर्क - ९६०७५८२०९४**

## जाहीर सुचना

मी या जाहीर सुचनेद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, खालील वर्णनांकीत प्लॉटचा सौदा केलेला असून त्याचे वर्णन येणेप्रमाणे-

**मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर विभाग कचेरीचे कक्षेतील व महानगरपालिका अमरावतीचे हद्दीतील मौजे-अकोली, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.१३/१/क मधील जमिनीतील सहायक संचालक नगर रचना, मनपा अमरावती यांचे पत्र क्र.अमनपा/ससंनर/अभि-३४/२००५, दि.११.०३.२००५ नुसार लेआऊट मंजूर व वि.जिल्हाधिकारी साहेब, अमरावती यांनी त्यांचे फाईलावरील ज्याचा रे.के.नं. एन.ए.पी.३४/अकोली-२४/२००३-२००४, नि.ता.२९.०४.२००५ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील खुला प्लॉट क्र.४ (चार) याची साईज पुर्व बाजू १५ मीटर, पश्चिम बाजू १३.७० मीटर, उत्तर बाजू नकाशाप्रमाणे व दक्षिण बाजू २१.०५ मी. असून याचे एकुण क्षेत्रफळ ३०१.२८ चौ.मी. (३२४१.७७ चौ.फुट) आहे. या प्लॉटची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | प्लॉट नं.५ |
| पश्चिमेस | - | प्लॉट नं.३ |
| उत्तरेस | - | रोड |
| दक्षिणेस | - | प्लॉट नं.११-ए व ११-बी |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचे कोणतेही हितसंबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण (नोंदणीकृत/इक्विटेबल/नोटीस ऑफ इंटीमेशन), बोझा, वारसा हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सुचना प्रेषित झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. तसे न केल्यास कराराप्रमाणे मी सदर मिळकतीचा व्यवहार करुन घेईल व नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणार नाही.

सबब कळावे

अमरावती
**दिनांक १८.०३.२०२६**

(**मिनाक्षी विनोद गुप्ता**)
पारिजात कॉलनी, नेमाणी गोडाऊन जवळ
अमरावती, ता.जि.अमरावती
मो.९८५०१८३३७९,
८८३०७६२१४१

**मा.सह दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.६४/२०२६ ने.ता.०२.०४.२०२६

**गुणाबाई -- विरुध्द -- निरंक**

**अर्जदार :**
१. गुणाबाई उकंडराव गभने, रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. विठ्ठल उकंडराव गभने, रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. तुकाराम उकंडराव गभने, रा.फ्लॅट नं.१०२, साई लीला अपार्टमेंट अकोली रोड, साई नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. दबुताई प्रकाशराव निमकर, रा.वार्ड नं.४ मंगरुळ दस्तगीर, ता.धामणगांव, जि.अमरावती
५. प्रभाकर उकंडराव गभने, रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
६. उध्दव उकंडराव गभने, रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **उकंडराव डेबुजी गभने** यांचा मृत्यू दि.**०३.०९.२०२४** रोजी एरंडगांव ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयत यांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं. २, ३, ५ , ६ ही मुले आहेत व अर्जदार नं.४ ही विवाहित मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०७ मार्च २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**प्र.सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५६९/२०२६ ने.ता.२४.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती नलिनी रुपराव महाजन, वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम
२. वैभव रुपरावजी महाजन, वय ३८ वर्षे, धंदा - मजुरी
३. रोशनी रुपराव महाजन, वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम
४. भाग्यश्री रोशन तितरे, वय ३० वर्षे, धंदा - घरकाम

अर्जदार नं.१ व २ रा.नेरपिंगळाई, ता.मोशी, जि.अमरावती,
अर्जदार नं.३ रा.वाघोली, पुणे, ता.जि.पुणे
अर्जदार नं.४ रा.नागपूर, ता.जि.नागपूर

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ वडील नामे **रुपराव नामदेव महाजन** हे दि.**०५.०६.२०२०** रोजी त्यांचे राहते घरी नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १८.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७१/२०२६
**चिमाबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२७.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Chimabai Sahebrao Shinde, Age 62 Yrs. Occu.: Housewife
2. Sadashiv Sahebrao Shinde, Age 39 Yrs. Occu.: Farmer
3. Ganesh Sahebrao Shinde, Age 38 Yrs. Occu.: Farmer
   1 to 3 R/o Deora, Tq. Dist. Amravati.
4. Rekha Dema Keskar, Age 41 Yrs. Occu.: Household
   R/o Patargaon, Po.Amla Vishweshwar, Tq.Chandur Rly. Dist.Amravati.
5. Anita Santosh Ghuke, Age 37 Yrs. Occu.: Household
   R/o Deora, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **साहेबराव बाळकृष्ण शिंदे** हे दिनांक 19.11.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चिमाबाई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चिमाबाई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १९२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि................ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद राजीक मोहम्मद ईस्माईल** अर्जात नमूद जन्म दिनांक **२३.०५.१९८४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) पंकज न.राऊत (पो.पाटील) | १) पंकज न.राऊत (पो.पाटील) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) | ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) |
| ४) डी.डी.फुटाने (तलाठी) | ४) डी.डी.फुटाने (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. / / रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शाहेबा परवीन मोहम्मद ईस्माईल** अर्जात नमूद जन्म दिनांक **१३.०७.१९८१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेडे** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ........... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकतान पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) पंकज न.राऊत (पो.पाटील) | १) पंकज न.राऊत (पो.पाटील) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) | ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) |
| ४) डी.डी.फुटाने (तलाठी) | ४) डी.डी.फुटाने (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

**दि अमरावती जि.प.शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती**
**कॉंग्रेस नगर रोड, रेल्वे पुलाजवळ, अमरावती**
**फोन नं.०७२१-२६७४६८४, २६७१०४३**

## दरपत्रक सुचना

दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती च्या मुख्यालय व शाखांकरीता डायकीन कंपनीचे १ टन, १.५० टन, २ टन एअर कंडीशन आवश्यकतेनुसार खरेदी करावयाचे आहे. डायकीन कंपनीच्या एअर कंडीशनरचा पुरवठा करणाऱ्या अधिकृत फर्मकडून स्वतःच्या लेटर हेडवर डायकीन कंपनीचे १ टन, १.५० टन, २ टन चे प्रति नग स्वतंत्र दर नमुद करुन सिलबंद पाकीटात दरपत्रक सादर करावी. दरपत्रक धारकास बॅंकेच्या आवश्यकतेनुसार मुख्यालय व शाखांना वरीलप्रमाणे एअर कंडीशनरचा पुरवठा करावयाचा आहे. सिलबंद दरपत्रक दिनांक २७.०३.२०२६ ला दुपारी ०४.०० पर्यंत सादर करता येतील. एक अथवा कोणतीही दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार प्रशासनाने राखून ठेवला आहे.

**अमरावती**
**दिनांक २१.०३.२०२६**

| **अध्यक्ष,** | **प्र.सरव्यवस्थापक,** |
|---|---|
| **दि अम.जि.प.शिक्षक सह.बँक लि., अमरावती** | **दि अम.जि.प.शिक्षक सह.बँक लि., अमरावती** |

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१८६/२०२६ ने.ता.१३.०४.२०२६

**अर्जदार -**
१. महादेवराव मोतीरामजी थोरात, वय ७१ वर्षे, धंदा - शेती
२. सहदेव मोतीरामजी थोरात, वय ६३ वर्षे, धंदा - शेती
३. रामदास मोतीरामजी थोरात, वय ५६ वर्षे, धंदा - शेती
   सर्व रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. पार्वती नामदेव माहोरे, वय ७६ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.खोलापूर, ता.जि.अमरावती
५. बेबीबाई भाऊराव स्वर्गीये, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.कुकासा कळशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती.
६. कांता रमेशराव स्वर्गीये, वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.भानखेडा बु., ता.जि.अमरावती
७. शोभा चिंतामण अडांगे, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
   रा.रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार नं.१ ते ७ यांचे वडील नामे **मोतीराम हिरामण थोरात** हे दि.**०९.०९.२०११** रोजी धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ७ यांची आई नामे **कौसल्याबाई मोतीरामजी थोरात** हे दि.**०६.१२.२०२४** रोजी धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४१८/२०२६
**श्री.सुरेश -वि- निरंक**
पुढील ता.०४.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. सुरेश कालुजी अडायके
वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.घर नं.२, दुर्गा मंदिर जवळ, दरोगा प्लॉट, बेलपुरा, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रेणुका बाबुजी ठोंबरे** हे दिनांक 09.05.2008 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुरेश विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुरेश विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि................ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद जाहीद मोहम्मद ईस्माईल** अर्जात नमूद जन्म दिनांक **१५.०८.१९८८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ............ हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) पंकज न.राऊत (पो.पाटील) | १) पंकज न.राऊत (पो.पाटील) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) | ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) |
| ४) डी.डी.फुटाने (तलाठी) | ४) डी.डी.फुटाने (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **सौ.पद्मा सुरेशराव टाले** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन -** मौजे - इतकी मालमत्ता क्र.४५, सर्वे क्र.५१, यावर बांधलेले घर ता. दर्यापूर, जिल्हा अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **सौ.पद्मा सुरेशराव टाले** यांच्या नावे आहे. तसेच सदर मालमत्ता त्यांना वडिलोपार्जित मिळालेली आहे. **सौ.पद्मा सुरेशराव टाले** यांनी त्यांनी Poramal Finance Ltd. येथे गृह कर्जासाठी अर्ज केलेला आहे. तसेच सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि Piramal Finance Ltd. येथे सदर मालमत्ता गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देत आहे.

दिनांक ११.०३.२०२६

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७३/२०२६
**श्रीमती कांता अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.३०.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Kanta Kashiram Chorpagar, Age 76 Yrs. Occu.: Household
2. Mangesh Kashiram Chaurpagar, Age 54 Yrs. Occu.: Pvt.Service
   R/o H.N.2, Galli No.6, Sector-66, Mamura, Gautam Buddha Nagar, Noida Uttarpradesh-201301
3. Nilesh Kashiram Ghaurpagar, Age 50 Yrs. Occu.: Service
   Appli.No.1 & 3 R/o Galli No.3, Front of Buddha Vihar Kishor Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati
4. Sau.Sunita Manohar Khandare, Age 56 Yrs. Occu.: Household
   R/o C-12, Type-IV 12th Floor, Tower-12, NBCC Kidwal Nagar (East) Saronini Nagar, South West, Delhi-110023

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **काशिराम सावालाजी चौरपगार** हे दिनांक 01.08.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कांता अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कांता अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२६.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१७९/२०२६ ने.ता.१०.०४.२०२६

**अर्जदार -** १. श्री.हर्षवर्धन श्रीराम खंडारे,
वय ४६ वर्षे, धंदा - मजुरी
रा.विचोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची आई नामे **नानीबाई श्रीराम खंडारे** हे दि.**१६.११.२०२५** रोजी **विचोरी**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तिचे मृत्यूनंतर अर्जदार हेच मयतांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१२५/२०२६ ने.ता.२४.०४.२०२६

**अर्जदार :** **१.** ज्ञानेश्वर गुणवंतराव ढोबळे
वय ५७ वर्षे, धंदा - मजुरी
रा.रतनपूर, पो.कारंजा बहीरम, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत गुणवंतराव अमृतराव ढोबळे** यांचा मृत्यू दिनांक **०७.१०.२०१२** रोजी रतनपूर (सायखेडा) ता, चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मयत वच्छलाबाई गुणवंतराव ढोबळे** हिचा दि.**२७.०४.२००५** रोजी रतनपूर (सायखेडा) ता, चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे **मयत गुणवंतराव अमृतराव ढोबळे व मयत वच्छलाबाई गुणवंतराव ढोबळे** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१२५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि. /०३/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.२५.०८.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शहनाज परवीन मोहम्मद ईस्माईल** अर्जात नमूद जन्म दिनांक **१५.११.१९८७** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) पंकज न.राऊत (पो.पाटील) | १) पंकज न.राऊत (पो.पाटील) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) | ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) |
| ४) डी.डी.फुटाने (तलाठी) | ४) डी.डी.फुटाने (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. / / रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **जमशिद अली अजीज शॉंह** अर्जात नमूद जन्म दिनांक **२५.०३.१९६७** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ..........हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) पंकज न.राऊत (पो.पाटील) | १) पंकज न.राऊत (पो.पाटील) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) | ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) |
| ४) डी.डी.फुटाने (तलाठी) | ४) डी.डी.फुटाने (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३४/२०२६ ने.ता.२७.०३.२०२६

**अर्जदार -**
१. कांता दशरथ डांगे, वय ७७ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.शिरजगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. संगीता गजानन भुजाडे, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.वऱ्हा, ता.तिवसा, जि.अमरावती
३. उषा रविंद्र लाधे, वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.भुगांव, ता.अचलपूर, जि.अमरावती
४. रेखा प्रविण कोल्हे, वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.रोहणखेडा, ता.जि.अमरावती
५. अनिता सचीन हेले, वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.रोहणखेडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. ममता सुरेशराव धोटे, वय ३३ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.घोटा, ता.तिवसा, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ६ चे वडील नामे **दशरथ शामराव डांगे** हे दि.**२०.०६.२०२५** रोजी **शिरजगांव**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हेच मयतांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २३.०१.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

प्रो.नं.८१३/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१८.०३.२०२६

वि.२ रे सहदिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./१४४/२०२६ दिनांक २१.०४.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. कमलबाई राधाकिसन चारथड, वय ७७ वर्षे, धंदा - घरकाम
२. रुपाली तुषार डांगे, वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.साई नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. विजय राधाकिसन चारथड, वय ५२ वर्षे, धंदा - शेती
४. संजय राधाकिसन चारथड, वय ५५ वर्षे, धंदा - शेती
   अ.नं.१, ३ व ४ रा.रामगांव, पो.कान्होली, ता.दर्यापूर, जि.अमरावती
५. सुरेश राधाकिसन चारथड, वय ५० वर्षे, धंदा - शेती
   रा.गुरुदेव नगर, मोझरी, ता.तिवसा, जि.अमरावती
६. हर्षा मोहन पाटील, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.दस्तुर नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
७. राजेश राधाकिसन चारथड, वय ५८ वर्षे, धंदा - शेती
   रा.पार्वती नगर, नागपूर, ता.जि.नागपूर

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **राधाकिसन गणपत चारथड** हे दिनांक **२०.०९.२०२०** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६०२/२०२५ ने.ता.२४.०४.२०२६

**अर्जदार -**
१. आशा वामनराव चिचमलकर, वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम
२. उषा गेंदलालजी बनराखे, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
३. दिलीप सूर्यभान महाजन, वय ५५ वर्षे, धंदा - मजुरी
४. शोभा काशिनाथ बारस्कर, (मयत) तर्फे वारस
   ४अ) प्रशांत काशिनाथ बारस्कर, वय ४७ वर्षे, धंदा - मजुरी
   ४ब) सोनाली हिमायतअली इनामदार, वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
   ४क) मनिष काशिराव बारस्कर, वय ४१ वर्षे, धंदा - मजुरी

अर्जदार नं.१ रा.नागपूर, ता.जि.नागपूर, अर्जदार नं.२ रा.इंदुरका कोथुर्णा भंडारा, ता.जि.भंडारा, अर्जदार नं.३ रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती, अर्जदार नं.४, ४(अ) व (क) रा.पुणे, ता.जि.पुणे, अर्जदार नं.४(ब) रा.हडतसर, पुणे, ता.जि.पुणे

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ते ३ चे वडील तर अर्जदार नं.३ (अ,ब,क) यांचे आजोबा नामे **सूर्यभान शिवराम महाजन** हे दि.**०८.०३.२००५** रोजी त्यांचे राहते घरी नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ३ ची आई तर अर्जदार नं.४(अ,ब,क) यांची आजी नामे **द्रोपदाबाई सूर्यभान महाजन** ही दिनांक **२६.०१.२०२३** रोजी नागपूर, ता.जि.नागपूर येथे मयत झाली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १८.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### कुऱ्हा बसस्टॉप येथे जलहिरा पाणपोईचे उद्घाटन

**कुऱ्हा-** येथील बसस्थानक परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून सतत प्रवाशांना व इतर नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अनुप अनंत जयस्वाल करत असतात. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी गुढीपाडवा व हिंदू नविन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर अनंत बजरंगप्रसाद जयस्वाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनंत जयस्वाल यांची नात जिशा अनुप जयस्वाल हिच्या हस्ते जलहिरा पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. उन्हाळ्याची चाहूल लागताच बस स्थानक परिसरात माठातील थंडगार पाणी प्रवाशांना व गावकऱ्यांना पाणपोईच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची सोय केली जाते.या पाणपोई उद्घाटनाच्या कार्यक्रमाला जयसेन इंगळे वाहतूक नियंत्रक बसस्टॉप कुऱ्हा, अशोक पवार ज्येष्ठ पत्रकार, अनुप जयस्वाल, चरणदास वानखेडे (सफाई कामगार),राजु दुधे, रवि माहुले, सचिन सारवे, अंबादास उगवकार, रवी क्षिरसागर, गजानन पचारे,राशद अली, गजानन मेश्राम, कैलास तायडे, नितीन पवार, अंकुश इंगोले आदींची उपस्थिती होती.

### सोनगावात चाकूने इसमावर वार

**चांदूर रेल्वे-** तालुक्यातील सोनगाव येथे गंभीर घटना घडली. मुकेश मारोत गावडे (वय ४४) याने चेतन अरुणराव चोरे यास रस्त्यात अडवून वाद घालत चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात चेतन चोरे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या अमरावती येथे उपचार सुरू आहेत. घटनेवेळी ते मोटरसायकलने घराच्या बांधकामासाठी पाणी मारण्यास पाईप व दळण आणण्यासाठी जात होते. या प्रकरणी फिर्यादी रितेश अरुण चोरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला.

# महावितरणचा वीजबिलासाठी शेतकऱ्यांकडे मोर्चा

## ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारकांना वीज बिल भरणे बंधनकारक

**अमरावती/का.प्र.**
परिमंडळाअंतर्गत अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारक शेतकऱ्यांकडे तब्बल २०१ कोटी ६४ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. थकबाकी वसुलीसाठी महावितरणकडून मार्च महिन्यात विशेष मोहिम राबविण्यात येत असून कर्मचारी घरोघरी जाऊन वीजबिल वसुली करत आहेत. त्यामुळे संबंधित थकबाकीदार शेतकऱ्यांनी थकीत वीजबिल तातडीने भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

महावितरणने स्पष्ट केले आहे की, 'बळीराजा मोफत वीज योजना' ही सर्व कृषीपंपधारकांसाठी लागू नसून केवळ ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेच्या कृषीपंपांसाठीच लागू आहे. या योजनेअंतर्गत शासनाने २०२५ ते २०३० या कालावधीत अशा पंपांचे चालू वीजबिल शून्य केले आहे. मात्र ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारकांना वीजबिल भरणे बंधनकारक असल्याचे महावितरणने पुन्हा अधोरेखित केले आहे.शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना'



राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत विकेंद्रीत स्वरूपातील सौर प्रकल्प उभारणी, फिडर विलगीकरण, नवीन वीजवाहिन्या, रोहित्रे आणि उपकेंद्र उभारणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. परिमंडळातील सुमारे २ लाख ८० हजार शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याचा लाभ मिळत असल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.परिमंडळातील ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या एकूण ६ हजार ७६ कृषीपंपधारक शेतकऱ्यांकडे २०१ कोटी ६४ लाख रुपयांची थकबाकी आहे. यापैकी अमरावती जिल्ह्यातील ४ हजार ९८ शेतकऱ्यांकडे १०६ कोटी २ लाख रुपयांची थकबाकी असून, यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ९७८ शेतकऱ्यांकडे ९५ कोटी ६२ लाख रुपयांची वीजबिल थकीत आहे. त्यामुळे महावितरणने थकबाकीदार शेतकऱ्यांना वेळेत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## उपमहापौरांनी केली महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्याची पाहणी

**अमरावती/का.प्र.**
११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले जयंती अमरावती शहरात मोठ्या उत्साहातो साजरी केली जाते. या निमित्ताने उपमहापौर सचिन भेंडे यांनी चित्रा चौक येथील महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्याची पाहणी केली.या पाहणी दरम्यान युवा स्वाभिमान पक्षाचे गटनेते नाना आमले, नगरसेविका अर्चना पाटील, वंदना मडघे, तसेच नगरसेवक छोटू पाटील, मनोज भेले, राजू जटाळे, घनश्याम डकरे आणि संदीप कांबळे उपस्थित होते.या वेळी अधिकाऱ्यांना सूचित केले की, पुतळा आणि परिसराचे सुशोभीकरण लवकरात लवकर करावे, तसेच परिसर नागरिकांसाठी आकर्षक व सभ्य असे वातावरण निर्माण होईल याची दक्षता घ्यावी.महात्मा ज्योतिबा फुले हे सामाजिक सुधारक, शिक्षणविषयक क्रांतिकारी आणि स्त्रियांच्या अधिकारांसाठी कार्य करणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्यामुळे समाजातील शिक्षणाचा प्रसार झाला आणि जातीय असमानतेविरोधातील लढा अधिक बळकट झाला. त्यांच्या जयंतीच्या दिवशी अशा कार्यक्रमांचे आयोजन हे त्यांच्या विचारांचा सतत आदर आणि सन्मान राखण्याचे प्रतीक आहे.



## सावंगा विठोबा येथे गुढीपाडव्याला भक्तांची प्रचंड गर्दी

### ७२ फूट उंच झेंड्यांना खोळ चढविण्याचा चित्तथरारक सोहळा उत्साहात

**चांदूर रेल्वे-** तालुक्यातील सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथे गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली असून गुढीपाडव्याच्या दिवशी लाखो भाविकांची उपस्थितीत ७२ फूट उंच झेंड्यांना नवीन खोळ चढविण्याचा पारंपरिक व थरारक सोहळा यात्रेचे मुख्य आकर्षण ठरले गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सवाला १८ मार्च पासुन सुरूवात झाली असुनही यात्रा २७ मार्च पर्यंत चालणार आहे.

देव व भक्त या समानतेचे प्रतिक ७२ फुट झेंड्यांचा चित्तथरारक व नेत्रदीपक सोहळा गुढीपाडव्याच्या दिवशी दुपारी ४ वाजता संस्थानचे विश्वस्त चरणदास कांडलकर यांच्या शुभहस्ते महाराजांच्या समाधीचे विधीवत पूजन करून दोन्ही झेंड्यांना नवीन खोळ (कापड) चढविण्यात आली आहे.झेंड्यांना पायाचा स्पर्श होऊ नये म्हणून दोरांच्या सहाय्याने झेंड्यांची जुनी खोळ काढून नविन खोळ चढवली आहे.अखंड कापूर ज्योती, बासन (टाळ)ढोलकी (मृदंग)चा गजर, लाखोंच्या हजारोंच्या संख्येने सांगवा विठोबा नगरीत आलेल्या अवधूत भजन मंडळाच्या मांडीचे सुमधूर गायनात आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात हा सोहळा विश्वस्त मंडळ व लाखो भाविकांच्या साक्षीने पार पडला. गुढी पाडव्याच्या दिवशी यात्रेत बाहेरगावाहून येणाऱ्या लाखो भाविकांसाठी संस्थानची अन्नदान समिती आणि सेवाभावी मंडळाच्या वतीने प्रसाद (अन्नदान) व्यवस्था करण्यात आली आहे.श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथे येण्याकरीता अमरावती,चांदूर रेल्वे,बडनेरा,नेर(परसोपंत)आगारातील एसटी यात्रा-बसची व्यवस्था केली आहे.या यात्रा महोत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा तसेच हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी शांतता, सुव्यवस्था व स्वयंशिस्त



पाळावी,असे आवाहन श्री विठोबा संस्थान च्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड रामायण पठन

**अमरावती-** शहरातील बुधवारा परिसरातील आझाद हिंद मंडळाच्या वतीने सार्वजनिक श्री हनुमान मंदिर येथे गुढीपाडव्यापासून श्री हनुमान जन्मोत्सवापर्यंत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून परिसरात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. हनुमान जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरात अखंड रामायण पठनास प्रारंभ करण्यात आला असून श्री कुंदन महाराज यांच्या वाणीतील रामायण वाचन दररोज सकाळी ६.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत सुरू आहे. भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून रामनामाचा लाभ घेत आहेत. संस्थेच्या वतीने २६ मार्च रोजी श्री राम जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार असून यावेळी परिहार महिला भजनी मंडळ यांचे भक्तिमय भजन सादर होणार आहे. ३१ मार्च व १ एप्रिल, सायं. ७.३० वा. ह.भ.प. श्री रविंद्र महाराज बाळापुरे यांचे वारकरी कीर्तन दि. १ एप्रिल, रात्री ११.०० वा. श्री सतीश श्रीवास व संच यांचे संगीत तुलसी रामायण (सुंदरकांड) सादरीकरण दि. २ एप्रिल, पहाटे ५.०० वा. ह.भ.प. डॉ. श्रीकृष्णराव जिरापुरे यांचे हनुमान जन्मोत्सव कीर्तन २ एप्रिल, सायं. ७.३० वा. सुप्रसिद्ध गायक आशुतोष देशपांडे व मधुसदन वटक यांचा भक्ती संगीत कार्यक्रम दि. ३ एप्रिल, सायं. ६.०० वा. गोपाळकाल्याचे कीर्तन त्यानंतर सायं. ७.३० वा.महाप्रसाद वितरण होईल.

## कम्युनिस्ट पक्षातर्फे 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रम उत्साहात

### हिंदू-मुस्लिम एकतेचा दिला संदेश



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे आयोजित 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रम पार पडला. चांदूर रेल्वे शहरातील कॉ. शिवदास उटाणे सभागृह (भाकप कार्यालय) येथे झालेल्या या कार्यक्रमाने सामाजिक ऐक्य व बंधुभावाचा अनोखा आदर्श घालून दिला. कार्यक्रमाची सुरुवात शांतता व सौहार्दाच्या प्रार्थनेने करण्यात आली. विविध धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकमेकांना शुभेच्छा देत इफ्तारमध्ये सहभागी झाले होते.या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून कॉ. तुकाराम भस्मे (राज्य सचिव, भा.क.प. महाराष्ट्र) व नगरसेवक अनिस सौदागर हे होते. तर कार्यक्रमाचे आयोजन शहर सचिव कॉ. भूषण नाचणकर व नगरसेवक कॉ. सुमेद सरदार यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. त्यांनी उपस्थितांचे आभार मानत अशा सामाजिक एकतेच्या उपक्रमांना भविष्यातही चालना देण्याचा संकल्प व्यक्त केलाया 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रमातून हिंदू-मुस्लिम एकतेचा जिवंत संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे चांदूर रेल्वे शहरात एकतेचा सुंदर संदेश पसरला असून, उपस्थितांच्या मनात सामाजिक ऐक्याची नवी ऊर्जा निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता विनोद जोशी, प्रा. प्रसेन्नजित तेलंग, भिमराव बेराड, सागर दुर्योधन, गुलाब शाह (पेंटर), नरेश कावलकर, गणेश होले, जिवन दुर्योधन, शेख रफीक, गणेश हरणे, राम जोशी, संदीप सोनोने, अशोक चौधरी, ईर्शाद, शाम मेश्राम, बबलू शाह, किसन चौधरी व इतरांनी परिश्रम घेतले. यावेळी मुस्लिम समाजासह सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थेतर्फे

# बस स्थानकावर 'कर्मयोगी गाडगेबाबा जलसेवा'

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
नजीकच्या कापुस्तळणी येथील बस स्थानकाच्या चौकात, कापुस्तळणी येथील 'श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थेने 'निष्काम कर्मयोगी गाडगेबाबा प्याऊ जलसेवा' या उपक्रमांतर्गत, प्रवासी आणि वाटसरूंसाठी थंड पिण्याच्या पाण्याची मोफत व्यवस्था केली आहे.

आजूबाजूच्या परिसरातील मजूर वर्ग खरेदीसाठी वारंवार कापुस्तळणीला येत असतो; परिणामी, बस स्थानकावर लोकांची सतत आणि मोठी वर्दळ असते. उन्हाळ्याच्या हंगामात, कडाक्याची उष्णता आणि प्रखर सूर्यप्रकाशामुळे, लोकांना आपली तहान भागवण्यासाठी थंड पिण्याच्या पाण्याच्या शोधात अनेकदा भटकंती करावी लागते. अशा गजबजलेल्या ठिकाणी सार्वजनिक जलसेवेची असलेली नितांत गरज ओळखून, आणि गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेली परंपरा कायम राखत, 'श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थे'चे संस्थापक तसेच पक्षी संवर्धनाचे निस्सीम प्रेमी अरुण शेवने यांनी, मराठी नववर्षाचा सण असलेल्या 'गुढीपाडव्या'च्या शुभमुहूर्तावर, समाजासाठी एक परोपकारी सामाजिक कार्य म्हणून पुन्हा एकदा 'निष्काम कर्मयोगी गाडगेबाबा प्याऊ' सुरू केला आहे. या वर्षी संस्थेने मातीची मडकी (रांजण) उपलब्ध केली, आणि या सार्वजनिक जलसेवेचे औपचारिक उद्घाटन अंजनगाव



सुर्जी नगर परिषदेचे अध्यक्ष अविनाश गायगोले यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला पुरुषोत्तम घोगरे,आशिष संगई आणि रवींद्र हंतोडकर यांसह अनेक मान्यवर अतिथी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष आणि आयोजक सर्वश्री अरुण शेवने, दयाराम शेवने, प्रशांत सरदार, चेतन बाबणेकर, वसंत बनाईत, प्रदीप सातवते, रवींद्र ढेपे, मंगेश रोकडे, अजय शिरळकर, शिवशंकर तराळे, नरेंद्र गिरनाले आणि राजेश सहारे यांच्या उपस्थितीत पार पडला.

## शिवाजी महाराजांनी गड-किल्ले उभारले, तर भाऊसाहेबांनी शिक्षणसंस्था

### केशवराव मेतकर यांचे प्रतिपादन, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा

**अमरावती/का.प्र.**
काळाची गरज ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी युवकांच्या हातात तलवारी दिल्या, तर भाऊसाहेब देशमुख यांनी आजच्या काळाची गरज लक्षात घेऊन युवकांच्या हाती लेखणी दिली. शिवाजी महाराजांनी गड-किल्ले उभारले, तर भाऊसाहेबांनी शैक्षणिक संस्था उभारल्या, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित पदवी वितरण समारंभ व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यात ते बोलत होते. हा सोहळा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात उत्साहात पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट होते. प्रमुख




पाहुणे म्हणून केशवराव मेतकर (उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) तसेच प्रा. डॉ. प्रवीण रघुवंशी (व्यवस्थापन परिषद सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती) उपस्थित होते. यावेळी विचारपीठावर डॉ. उमेश कडू, डॉ. अर्चना बोबडे आणि ज्ञानेश्वर नामुर्ते उपस्थित होते.प्रास्ताविक डॉ. किशोर साबळे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. जयराम गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. संगीता भुयार यांनी केले.केशवराव मेतकर पुढे म्हणाले की,शिवाजी शिक्षण संस्थेत शिक्षण घेण्याचे भाग्य तुम्हाला लाभले आहे. भाऊसाहेबांनी सर्वसामान्य आणि बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी आयुष्यभर स्वतःपेक्षा समाजासाठी जास्त कार्य केले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भाऊसाहेब देशमुखांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या शिक्षणाचा समाजहितासाठी उपयोग करावा.' प्रा. डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'भाऊसाहेब देशमुख हे शिक्षण सम्राट नव्हते, तर शिक्षण महर्षी होते. पदवीमुळे समाजात उभे राहण्याचे बळ मिळते. आजच्या पिढीकडून समाजाला मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे चांगले चारित्र्य, कर्तृत्व आणि माणुसकी जोपासणे आवश्यक आहे.' अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अंबादास कुलटयांनी सांगितले की, 'शिक्षणासोबतच मानवी मूल्यांची जाणीव ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आयुष्यात योग्य व्यक्तींची निवड आणि यशामध्ये सातत्य ठेवणे महत्त्वाचे आहे.'यावेळी प्रा. डॉ. प्रवीण रघुवंशी यांचा केशवराव मेतकर यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला विविध विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी, तसेच पदवी प्राप्त विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**६६ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान**

या समारंभात एकूण ६६ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. तसेच १६ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. जनसंवाद व पत्रकारिता, राज्यशास्त्र आणि भूगोल या विषयांतील तीन विद्यार्थ्यांना सुवर्ण पारितोषिक प्रदान करण्यात आले.

## शहरासाठी रॉकेलचा पुरवठा पुन्हा सुरु करा

### गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर भाजप हॉकर्स सेलची मागणी

**अमरावती /का.प्र.**
इराण आणि मोइस्त्रायल दरम्यान सुरू असलेले डो युद्ध आणि आखाती देशांतील मतणावपूर्ण परिस्थितीमुळे सध्या चएलपीजी गॅस सिलिंडरचा मोठा तुटवडा जाणवत आहे. यामुळे सरकारने व्यावसायिक गॅस 'सिलिंडरचा पुरवठा मर्यादित केला,असून घरगुती सिलिंडरच्या पुरवठ्यातही कपात करण्यात येत आहे. याचा मोठा फटका सामान्य नागरिकांसह हॉटेल आणि उपहारगृह चालकांना बसत आहे.

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून अमरावती शहरासाठी रॉकेलची (घासलेट) मागणी भाजप हॉकर्स सेलने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. हॉकर्स सेलचे शहराध्यक्ष पंकज गुप्ता यांनी निवेदनात म्हटले आहे की, अमरावती शहरातील रॉकेल १० परवानाधारक गेल्या



वर्षांपासून बेरोजगार आहेत. एकीकडे त्यांची बेरोजगारी आणि दुसरीकडे सर्वसामान्य जनतेला इंधनासाठी करावी लागणारी वणवण पाहता,सरकारने तत्काळ रॉकेल उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने नुकताच महाराष्ट्र राज्यासाठी ८८ हजार किलो शहरासाठी रॉकेलचा कोटा मंजूर केला आहे. यातील योग्य हिस्सा अमरावती शहरासाठी सुनिश्चित करावा, जेणेकरून ज्या नागरिकांना गॅस सिलिंडर मिळत नाही, त्यांना अन्नासाठी किमान रॉकेलचा आधार मिळेल आणि त्यांची अडचण दूर होईल.गॅस टंचाईचे संकट-आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. घरगुती इंधनाचा तुटवडा भरून काढण्यासाठी स्वस्त धान्य दुकानांमार्फत रॉकेल वितरित केल्यास गरीब कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल आणि परवानाधारकांनाही पुन्हा काम मिळेल.

GHARIKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# दारूवरील वॅट तात्काळ रद्द करा

## १ एप्रिलला लायसन्स सरेंडर करण्याची धमकी

### नूतनीकरण शुल्क न भरण्याची परमिट असोसिएशनची भूमिका

**अमरावती/प्रतिनिधीः-** दारूवर लावलेला वॅट तात्काळ रद्द करण्यात यावा आणि ढाबे, हॉटेल आणि रेस्टॉरंट मधून होणाऱ्या अवैध दारू विक्रीवर कार्यवाही करण्यात यावी नाहीतर १ एप्रिल रोजी जिल्ह्यातील बार संचालक आपले लायसन्स सरेंडर करण्याचा इशारा अमरावती डिस्ट्रिक्ट परमिट रूम असोसिएशनच्या वतीने आज शुक्रवार २० मार्च रोजी पत्रकार परिषदेतून देण्यात आला आहे.



असो. अध्यक्ष नितीन देशमुख म्हणाले की, यावर्षी आम्ही नूतनीकरण शुल्क भरणार नाही. विदर्भात ठीक ठिकाणी झालेल्या बैठकीमध्ये यावर निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नूतनीकरण शुल्क देण्यात येणार नाही. त्यांनी सांगितले की जिल्ह्यामध्ये ५०० बार आहे. हॉटेल ,ढाब्यामध्ये अवैध दारू विक्री केल्याने बार संचालकांवर आर्थिक संकट कोसळले आहे. ग्राहक बार मध्ये जाण्यापेक्षा ढाब्या मध्ये बसून दारू पिणे पसंत करतात. अवैधरित्या दारू विक्री होत आहे पण पोलिस एक्साईज विभाग येथे कोणतीही कार्यवाही करत नाही. यामुळे आमच्या व्यवसायावर संकट ओढवले आहे. वॅट ५ टक्के पेक्षा वाढून १० टक्के करण्यात आलेला आहे. लायसन्स नूतनीकरण शुल्कही १५% वाढविण्यात आले आहे.उत्पादन शुल्क मध्ये पण वृद्धी करण्यात आली आहे. २० हजार पेक्षा अधिक कामगारांना या व्यवसायातून रोजगार मिळालेले आहे, पण शासनाच्या नवीन नियमामुळे बार संचालक अडचणीत सापडले आहे. परमिट रूम बंद करण्याची वेळ त्यांच्यावर आलेली आहे. लोकसंख्ये वर आधारित नुतनीकरण शुल्क रद्द करण्यात यावा. वॅट व नुतणीकरण शुल्क कमी करण्यात ☞(पान २ वर)

# विषय आणि झोन सभापती निवडणूक २७ मार्च ला

### महापालिकेने विभागीय आयुक्तांना पाठवला प्रस्ताव

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका विषय समिती सभापती पदाची निवडणूक शुक्रवार २७ मार्च रोजी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मनपाच्या वतीने ही तारीख विभागीय आयुक्तांना पाठवली आहे. त्यामुळे प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर विषय समितीला चालना मिळणार आहे. चार वर्षाच्या प्रतीक्षेनंतर मनपा मधून प्रशासकीय राज संपला. आता लोकप्रतिनिधीचे शासन सुरू झाले आहे. यापूर्वी झालेल्या आमसभेमध्ये शिक्षण, महिला व बालकल्याण, शहर




सुधार, विधी समिती सदस्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. आता समिती सभापती आणि उपसभापती यांची निवडणूक होणार आहे. समितीमधील नव सदस्यांमधून सभापती आणि उपसभापती बनविण्यात येणार आहे. विभागीय आयुक्त यांच्या माध्यमातून ही प्रक्रिया घेतली जाणार आहे. यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने निवडणुकीसाठी तारीख मागवली होती. अशात मनपाने २७ तारीख प्रस्तावित ☞(पान २ वर)

# जय झुलेलालच्या घोषाने दुमदुमली नगरी

## चेट्रीचंड्र निमित्य निघाली भव्य शोभायात्रा





**अमरावती/प्रतिनिधीः-** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही साई वेल्फेअर फाउंडेशन व झुलेलाल जयंती महोत्सव समितीच्या वतीने साई झुलेलाल जयंती उत्सव विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. या निमित्य आज शुक्रवार

### -विविध देखावे ठरले आकर्षण

२० मार्च रोजी सायंकाळी नेहरु मैदान परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या मध्ये बहिराना साहेब, साई झुलेलाल सह विविध☞(पान २ वर)

# सत्ताधारी पक्षाच्या नगरसेविकेकडून नगराध्यक्ष व गटनेत्यांवर गंभीर आरोप

### दर्यापूर नगर पालिकेत खळबळ , -विकास कामाच्या सभारंभ आड राजकीय खेळी

खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर नगरपालिकेच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे. सत्ताधारी प्रभाग क्रमांक ११ मधिल रस्त्याच्या कामाच्या भूमिपूजनाच्या समारंभ प्रकरणी पक्षातीलच नगरसेविका स्नेहा शिवाजी देशमुख यांना डावलून प्रभागातील विकास कामाचा शुभारंभ केल्याप्रकरणी नगराध्यक्ष आणि गटनेता यांच्यावर गंभीर आरोप केल्याने पालिकेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. या आरोपांमुळे नगरपालिकेतील कारभार, निर्णयप्रक्रिया आणि सत्ताधाऱ्यांतील



समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सविस्तर माहीतीनुसार नगरसेविका स्नेहा देशमुख यांनी नगराध्यक्ष आणि गटनेता यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले आहेत. पालिकेतील काही निर्णय हे सर्वसामान्य नगरसेवकांना विश्वासात न घेता घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विकासकामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव, काही मोजक्या लोकांकडे अधिकार केंद्रीत करणे आणि पक्षातील इतर लोकप्रतिनिधींना दुय्यम वागणूक देणे, असे आरोप समोर आले आहेत.

या प्रकरणामुळे सत्ताधारी पक्षातच दोन गट स्पष्टपणे समोर येत असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात आहे. आतापर्यंत विरोधकांकडून होणाऱ्या टीकेला सामोरे जाणाऱ्या नगरपालिकेत ☞(पान २ वर)

# गीतांजली एक्सप्रेस मधून मोबाईल चोरणारा गजाआड

**अमरावती/प्रतिनिधीः-** गीतांजली एक्सप्रेस मध्ये चढताना प्रवासी विशाल सुखदेवराव वानखडे (नालंदा प्लॉट, साईनगर) यांचा मोबाईल लंपास झाला होता. या प्रकरणात रेल्वे पोलिसांनी तपास करून आरोपी इरफान शहा मेहताब शहा (वय ५५, भगतवाडी डाबकी रोड अकोला) याला ताब्यात घेतले. त्याच्या कडून चोरी गेलेला ३२ हजार रुपये किमतीचा सॅमसंग मोबाईल जप्त करण्यात आला आहे. माहितीनुसार १८ मार्च रोजी विशाल सुखदेवराव वानखेडे पत्नीसह शेगाव ते बडनेरा प्रवासा करिता गीतांजली एक्सप्रेसने जनरल कोच मध्ये चढत असताना त्यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल (किं.३२ हजार रुपये) चोरी झाल्याचे



लक्षात आले. विशाल ☞(पान २ वर)

# दुय्यम निबंधक कार्यालये सुट्टीच्या दिवशी सुरू राहणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** आर्थिक वर्षाच्या शेवटी मालमत्ता खरेदी दस्त नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार दि. २६ मार्चपासून सलग ही कार्यालये सुरू राहतील.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांत नियंत्रक यांच्या निर्देशानुसार, इष्टांक पूर्तीच्या दृष्टीने दि. २६ मार्च, दि. २८ मार्च, दि. २९ मार्च आणि दि. ३१ मार्च या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये चालू राहतील. तसेच ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुट्टी ही शनिवार आणि रविवार सोडून अन्य दिवशी आहे. ती कार्यालये त्यांच्या दोन साप्ताहिक सुट्यांपैकी एक दिवस चालू ठेवावीत. उपरोक्त दिवसांसाठी दुय्यम निबंधक कार्यालयांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी तसेच अभिनिर्णय व कमी पडलेले मुद्रांक शुल्क इत्यादी कामकाज विहीत वेळेत पूर्ण होण्यासाठी सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालये देखील कार्यरत राहणार आहे.

सुट्टीच्या दिवशी सर्व दुय्यम निबंधक कार्यालय आणि सह जिल्हा निबंधक वर्ग-१☞(पान २ वर)

# भीम ब्रिगेडकडून मंत्री शिरसाठ यांच्या पुतळ्याचे दहन

### वादग्रस्त विधानाचा केला निषेध

**अमरावती/प्रतिनिधीः-** सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या वादग्रस्त विधानाचा भीम ब्रिगेड संघटनाच्या वतीने निषेध करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर संघटनेने मंत्री शिरसाट यांच्या विरोधात घोषणाबाजी करून त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले. भीम ब्रिगेड अध्यक्ष राजेश वानखडे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. मंत्री शिरसाट यांनी अनुसूचित जाती जमातीमधील नागरिकांच्या



भावना दुखावणारे वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्याचा सर्वत्र निषेध होत आहे. मंत्री शिरसाठ यांनी सार्वजनिक रित्या माफी मागावी आणि ॲट्रॉसिटी कायद्यामध्ये कोणताही ☞(पान २ वर)

# ऑटोच्या धडके दोन अल्पवयीन जखमी

### पारडी मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑटोच्या धडकेत दोन अल्पवयीन जखमी झाल्याची घटना बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या पारडी येथील गेडाम यांच्या शेताजवळ गुरुवारी सायंकाळी समोर आली आहे. प्रणव गजानन बावनकुरे (वय १४) व सक्षम दिवाकर राऊत (वय १७) असे अपघातात




जखमी झालेल्या अल्पवयीनांची नावे आहे. माहितीनुसार प्रणव बावनकुरे व सक्षम राऊत गुरुवारी मालखेड मार्गावरील गणपती मंदिरात दर्शनासाठी जात होते. दोघे सायकलने घरून निघाले होते. त्यावेळी पारडी येथे गेडाम यांच्या शेताजवळ पारडी वरून येणाऱ्या अज्ञात ऑटोने त्यांच्या सायकलला धडक दिली. यामध्ये दोघे ☞(पान २ वर)

# ५ वर्षांची कर थकबाकी; 'माधव लॉन्स' सील

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या झोन क्रमांक तीन अंतर्गत दस्तूर नगर येथील नंदनवन कॉलनी परिसरातील माधव लॉन्स या मालमत्तेवर मालमत्ता कर थकबाकीमुळे आज, दिनांक २० मार्च २०२६ रोजी सील करण्याची धडक कारवाई करण्यात आली. सदर मालमत्तेचे मालक मुकुंद दातेराव यांनी मागील पाच वर्षापासून मालमत्ता कराचा भरणा केला नव्हता. त्यामुळे ९ लाख ७१ हजार रुपयांची थकबाकी प्रलंबित होती. महानगरपालिकेकडून वारंवार नोटीस व सूचना देऊनही कर न भरल्याने अखेर सीलिंगची कारवाई करण्यात



आली.ही कारवाई सहायक आयुक्त नितीन बोबडे यांच्या नेतृत्वात कर वसुली पथकाने केली. महानगरपालिकेने सर्व कर थकबाकीदारांना तात्काळ कर भरण्याचे आवाहन केले असून, अन्यथा शहरभर अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सुरू राहतील, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. ☞(पान २ वर)

# टाकरखेडा संभू येथे भव्य बाल भजन संध्या आज



**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** येथे श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने भव्य बाल भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि.२१ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजता हा कार्यक्रम श्रीराम मंदिर संस्थान परिसरात संपन्न होणार आहे. या भजन संध्येत श्री गुरुदेव बाल-बालिका भजन मंडळ, राहित (जि. अकोला) येथील लहान कलाकार सहभागी होणार असून, ते आपल्या सुरेल आवाजात भक्तिगीते सादर करणार आहेत. या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.कार्यक्रमाचे संयोजन ह.भ.प. आर. आय. शेख गुरुजी व रामकुमार कुसतकर यांनी केले आहे. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शेख मुबीन कुरैशी बेपत्ता



**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील तारखेडा परिसरातील कुरैशी गल्ली मध्ये राहणारे शेख मुबीन शेख हबीब कुरेशी (वय ६०) गेल्या चार दिवसा पासून घरून बेपत्ता आहे. कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला पण ते नाही मिळाले. यामुळे ते कुठेही दिसल्यास संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहिती नुसार शेख मुबीन कुरैशी १६ मार्चच्या सायंकाळी घरून निघाले होते , पण गेल्या चार दिवसापासून ते घरी परत नाही आले. कुटुंबीयांनी त्यांना सर्वत्र शोधले. नातेवाईकांना विचारले पण ते नाही मिळाले. शेख मुबीन कुरैशी यांना बरोबर चालता येत नाही. ते बरोबर बोलू देखील नाही शकत. घरून निघताना त्यांनी फॉर्मल शर्ट आणि पॅन्ट घातलेला आहे. जर ते कुणाला दिसले किंवा त्यांच्याबद्दल कोणतीही माहिती असल्यास मो.नं. ९८६०१८३०२९ व ७७२०८५९५८५ वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आरएसएसच्या शताब्दीपूर्तीनिमित्त २२ ला भव्य मोफत रोगनिदान शिबिर

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सेवा, त्याग आणि समर्पणाला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने विश्व हिंदू परिषद, भारतीय जनता युवा मोर्चा, बजरंग दल आणि चंद्रकुमार उर्फ लप्पीभैया जाजोदिया यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, २२ मार्च रोजी एका भव्य मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.




हे शिबिर म्हाडा कॉलनी येथील हनुमान मंदिराजवळ आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात शहरातील नामवंत तज्ज्ञ डॉक्टर आपली सेवा देणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने बालरोग व नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रियंका मनसाली, बालरोग तज्ज्ञ डॉ. विशाल मनसाली, दंतरोग तज्ज्ञ डॉ. पल्लवी कटई, होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. साक्षी जिंतुरकर, शल्य चिकित्सक डॉ. सुभाषचंद्र वासनिक आणि डॉ. रश्मी घोरमाडे यांचा समावेश आहे.

नागरिकांनी या मोफत शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ. साक्षी जिंतुरकर आणि प्रोजेक्ट चेअरमन राजन आडतिया यांनी केले आहे.

# विषारी औषध प्राशन करून युवकाची आत्महत्या

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील विष्णूरा येथील एका ३५ वर्षीय युवकाने मौजा उदखेड येथील शेत शिवारात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना आज दि.२० मार्च रोजी उघडकीस आली.मृतक युवकाचे नाव सुरज अशोकराव पुंड रा.विष्णुरा असे आहे. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार विष्णूरा येथील सुरज अशोकराव पुंड यांची वडीलोपार्जित दोन एकर शेती ऊतखेड शेत शिवारात असून ही शेती सुरज पाहत होता. काल दि.१९ मार्च पासून सुरज हा घरी न सांगता निघून गेला होता. तो परत न आल्यामुळे आज दि. २० मार्च रोजी शिरखेड पोलीस स्टेशनला मिसिंगचा रिपोर्ट देण्यात येऊन नातेवाईकांनी सुरजची शोधाशोध सुरू केली. लोकेशन दरम्यान ऊतखेड शेतशिवारात असलेल्या सुरजच्या नातेवाईकांच्या शेतात सुरज हा विषारी औषध प्राशन करून मृतावस्थेत दिसला. लगेच या घटनेची माहिती मोर्शी पोलीस स्टेशनला देण्यात आल्यावरून ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली ☞(पान २ वर)

# दिव्यांग कर्मचारी-शिक्षकांना जनगणनेच्या कामातून वगळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई-३२ (जिल्हा शाखा, अमरावती) यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देत जिल्ह्यातील दिव्यांग कर्मचारी व शिक्षकांना जनगणनेच्या कामातून वगळण्याची मागणी करण्यात आली आहे.

संघटनेच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २७ सप्टेंबर २०२०



च्या निर्देशानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना जनगणनेच्या कामात न नेमण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगांना त्यांच्या क्षमतेनुसार अनुकूल कार्यपरिस्थिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे.

तथापि, प्रत्यक्षात काही ठिकाणी दिव्यांग कर्मचारी व शिक्षकांना जनगणनेच्या कामासाठी नियुक्त केले जात असल्याचे☞(पान २ वर)